म. ग्रं. सं. ठाणें
विषय : प्रवास
सं. क्र. २४८




REFBK-0010788

# दिसलेला रशिया

अ. पा. देशमुख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक ...................... नों: दि: ................



मॉस्कोंतील गाजलेला ' रेड स्क्वेअर ' वरील चित्रांत दिसत आहे. डाव्या बाजूला क्रेमलिनची इमारत दिसत असून त्यापुढील चौथऱ्यावर उभें राहून रशियन नेते १ मे दिनीं सैन्याची सलामी घेतात.

# मला दिसलेला रशिया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५५२१ वि: ५८-प्रवास
क्रमांक २४८ नों: दि: १५।११।५८

लेखक

ज. पां. देशमुख
सहसंपादक 'सकाळ', पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०५८८

मूल्य रु. २·००

REFBK-0010788

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
सप्टेंबर १९५९

●

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

●

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २

●

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणें २

# प्र स्ता व ना

रशियांत पत्रकारांनीं जाऊन कांहीं फायदा होण्यासारखा आहे का? असा प्रश्न नेहमींच विचारला जातो. तेथें दाखवितील तेंच पाहावयाचें, बोलतील तेवढें ऐकावयाचें, अशा रशियाविषयींच्या सर्वांच्या कल्पना अजूनहि आहेत. पण रशियांतून थोड्या दिवसांचा प्रवास करून आल्यानंतर तेथें राजकारणाशिवाय इतर पाहण्यासारखें पुष्कळ आहे, अशी खात्री पटल्यामुळें त्या देशाविषयींचें हें छोटेंसें पुस्तक मीं लिहिलें आहे.

पुस्तकांतील माहिती रशियास जाणाऱ्या प्रवाशांना उपयुक्त व्हावी असा हेतु यामागें आहे. माझ्या रशियांतील थोड्या दिवसांच्या प्रवासांत मी जें पाहिलें, ऐकलें व पत्रकाराच्या चौकस दृष्टीनें शोधून पाहिलें तें जसेंच्या तसें मी या पुस्तकांत मांडलें आहे. या वेळीं मला तेथें वाचावयास मिळालेल्या कांहीं पुस्तकांची पुष्कळच मदत झाली आहे. माझे मित्र 'व्हीनस प्रकाशन'चे श्री. स. कृ. पाध्ये यांनीं हें पुस्तक प्रकाशित करून अमोल सहाय्य केलें आहे.

तसेंच 'सकाळ'चे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर यांनीं ही परदेश-प्रवासाची दुसरी संधि मला दिली नसती तर आज मी जें कांहीं पाहिलें तें पाहणें शक्य झालें नसतें. तेव्हां या पुस्तकांत जर कांहीं चांगलें असेल तर त्याचें श्रेय सर्वस्वीं त्यांनाच आहे.


पुणें,
तारीख २५-९-१९५९

—ज. पां. देशमुख

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. एक वैशिष्ट्यपूर्ण देश | ... | १ |
| २. कामगारांचा देश | ... | ९ |
| ३. मॉस्कोचें प्राथमिक दर्शन | ... | १९ |
| ४. कौटुंबिक जीवन | ... | २७ |
| ५. शिक्षणाला दिलेलें महत्त्व | ... | ३५ |
| ६. लोक राहतात तरी कसे ? | ... | ४३ |
| ७. उद्योगधंदे | ... | ५१ |
| ८. रशियांतील शेती | ... | ५९ |
| ९. सांस्कृतिक प्रगति | ... | ६६ |
| १०. रशियास जाणारांसाठीं | ... | ७४ |
| परिशिष्ट | | |
| कांहीं रशियन शब्दप्रयोग | ... | ८१ |


◆◆◆




सोव्हिएट रशिया व त्याचे शेजारी

वा. क्र. १०.६८८

# १ : एक वैशिष्ट्यपूर्ण देश

गेल्या पंचवीस वर्षांच्या काळांत ज्या राष्ट्राविषयीं सर्व जगाला औत्सुक्य वाटतें, नानाविध सुधारणांविषयीं व प्रयोगांविषयीं अनेक अतर्क्य व अगम्य गोष्टी ऐकावयास मिळतात त्या देशाविषयीं माझ्यासारख्या पत्रकाराला औत्सुक्य असल्यास त्यांत फारसें नवल असें कांहींच नाहीं.

रशियांत १९१७ सालीं क्रान्ति झाल्या दिवसापासून लोकशाहीचें कंकण बांधून जगांत पुढें पाऊल टाकावयास निघालेला हा महत्त्वाचा देश या दिशेनें यशस्वीरीत्या कितपत प्रगति करतो याविषयीं अनेक गोष्टी ब्रिटिश-अमेरिकन लेखक व रशियन प्रचारखातें प्रसिद्ध करीत आहे, पण रशियांत जाऊन प्रत्यक्ष परिस्थिति पाहून येणारी मंडळी फारच थोडी असल्यामुळें या माहितीविषयीं साशंकता वाटते व हा पोलादी पडद्यामागील देश पाहण्याचें औत्सुक्य माझ्या मनांत गेल्या दहा वर्षें होतें. दुसऱ्या महायुद्धांत दोस्तांच्या बाजूनें रशियानें केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीमुळेंच हिटलरचा पराभव करणें त्यांना शक्य झालें ही गोष्ट सर्वांच्याच डोळ्यांसमोर आहे. या महायुद्धाच्या शेवटच्या वर्षांत १९४५ सालीं मध्यपूर्वेकडील दोस्तांच्या संरक्षक आघाडीचें काम करणाऱ्या निरनिराळ्या देशांच्या सैनिकांत कांहीं रशियन सेनानी व सैनिक यांना मी भेटलों होतों. तेहरानजवळील त्यांच्या छावण्यांतून कांहीं काळ काढण्याची संधि मला मिळाली होती, परंतु या छोट्याशा कालावधींत त्या कमी बोलक्या रशियन सैनिकांनीं मला त्यांच्या देशाविषयीं कांहीं विशेष माहिती दिली नाहीं, उलट वाटोळ्या तोंडाचे, इतरांपेक्षां निराळ्या वाटणाऱ्या या सैनिकांनीं माझ्या त्यांच्याविषयींच्या औत्सुक्यांत अधिक भरच टाकली.

यानंतर गेलीं दहा-बारा वर्षें रशियनांविषयीं अनेक गोष्टी मी ऐकल्या, पण त्यांना जवळून पाहणें शक्य झालें नाहीं. कधींहि देशाबाहेर न पडणारे रशियन नेते मार्शल बुल्गॉनिन व क्रुश्चेव्ह भारतामध्यें येऊन गेले. पं. नेहरूंनीं

त्यांच्या देशाला भेट दिली, व राजनैतिक उंबरठ्याच्या आंत चाललेले हे मित्रत्वाचे प्रसंग एकामागून एक येऊं लागले. आमचीं सांस्कृतिक शिष्टमंडळेंहि मॉस्कोला जाऊन येऊं लागलीं. पण सर्वांकडे चोखंदळ दृष्टीनें पाहणाऱ्या एखाद्या पत्रकाराला रशियांत जाऊन मोकळ्या मनानें हिंडण्याचा योग क्वचितच येई. त्यामुळें अगम्य वाटणारें हें मोठें राष्ट्र आतां किती दिवस भारतीय नागरिकांना अगम्य राहणार हा प्रश्न आमच्यापुढें नेहमींच होता.

१९५८ च्या ऑगस्ट महिन्याच्या १४ तारखेपासून 'एअर इंडिया इंटरनॅशनल'चीं विमानें मॉस्को ते दिल्लीमध्यें प्रवासी वाहतूक करूं लागणार व वाहतुकीचा एक १२ तासांचा जवळचा मार्ग सुरू होणार. ही बातमी मी दोनतीन महिने ऐकत होतों आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे १४ ऑगस्ट रोजीं सुरू होणाऱ्या विमान-वाहतुकींतील पहिल्या विमानांतून पाहुणे म्हणून मॉस्कोला येऊं शकाल का? असें निमंत्रण तारेनें ९ ऑगस्ट रोजीं एअर इंडिया इंटरनॅशनलकडून मिळालें. हें निमंत्रण 'सकाळ' पत्राला आलें होतें. अर्थात् सकाळचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर हे त्या वेळीं परदेशांत असल्यामुळें मला तें आमंत्रण स्वीकारणें भाग होतें व मराठी पत्रांचा प्रतिनिधि म्हणून जाण्यासाठीं या मोठ्या प्रवासाची तीन दिवसांत तयारी करणें आवश्यक होतें. परदेशची तयारी तीनच दिवसांत करणें किती कठीण असतें ही गोष्ट परदेशीं जाऊन आलेल्यांना नव्यानें सांगावयास नको. पण बऱ्याच दिवसांची रशिया पाहण्याची अतृप्त इच्छा पुरी होणार या एकाच इच्छेनें सुरुवातीच्या सर्व प्रारंभिक अडचणींना तोंड देऊन मी मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावर ता. १३ रोजीं दुपारीं येऊन हजर झालों. या प्रवासासाठीं बोलाविलेल्या निमंत्रितांत पुण्याचा मी एकटाच होतों. मुंबईचे 'जन्मभूमि' पत्राचे संपादक श्री. मोहनलाल देसाई व 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया'चे त्या वेळचे जनरल मॅनेजर श्री. डी. पी. वागळे, या मुंबई प्रांतांतील दोनच पत्रकार व्यक्ती माझ्याबरोबर होत्या. शिवाय मुंबईचे पोलीस प्रमुख श्री. प्रविणसिंगजी, कांहीं वाहतुक कंपन्यांचे प्रतिनिधि, कांहीं खासदार मंडळी असे एकूण ६२ पाहुणे आम्ही या विमानानें ता. १४ ऑगस्ट रोजीं निघालों. आमच्याबरोबर विमान कंपनीचे एक अधिकारी व स्वतः जनरल

मॅनेजर श्री. बी. आर. पटेल हेहि होते. त्यांनीं रशिया दाखविण्याची आमची सर्व तयारी पूर्णपणें केली होती.

दिल्लीच्या राजशाही 'अशोक' हॉटेलमध्यें रात्रौ मुक्काम केल्यानंतर सकाळीं ९ च्या सुमारास आम्ही पालम् विमानतळावर आलों, व तेथें जमलेल्या कलकत्ता, मद्रास व दिल्ली येथील पाहुण्यांची ओळख करून घेतल्यानंतर सकाळच्या सूर्यकिरणांत समोर दिसणारे, 'विजापूरची राणी' हें सुपर कॉन्स्टिलेशन विमान पालम् विमानतळावर थाटांत उभें असलेलें आम्हांला दिसलें. सर्व सुखसोयींनीं युक्त असें हें विमान मोठ्या डौलांत जणूं काय आपला नवा मार्ग आक्रमावयास सज्ज झालें होतें. विमानावर चढल्याबरोबर एअर इंडियाच्या सेवक मंडळींनीं आमचें स्वागत केलें व गोडशा हिंदींत एअर होस्टेसनें (विमान-सेविका) 'आपली विजापूरची राणी' मॉस्कोकडे निघाली, असें सांगितलें. 'आतां या दोन देशांतील नागरी स्नेहभावाला सुरुवात झाली बरं!' असें मोठ्या आनंदानें ती म्हणाली. पालमूच्या प्रशस्त तळावरून धांवणारें आमचें विमान आकाशांत झेप घेऊन उंच उंच जाऊं लागलें व त्याबरोबर निरनिराळ्या पेशांतील विमानांतील पाहुणे मंडळी रशियाविषयीं विचार करूं लागली. खरोखरच जगांतील हा अगम्य देश असेल तरी कसा हा एकच विषय आम्हां प्रत्येकाच्या डोळ्यांपुढें त्या वेळीं नाचत होता.

रशियाच्या नकाशावरून जर सहज नजर फिरविली तर त्यांत एक गोष्ट स्पष्ट दिसते कीं, जवळ जवळ तेरा देशांच्या सरहद्दीला या महान् राष्ट्राच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत. त्यांत नॉर्वे, फिनलंड, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान, चीन, मंगोलिया आणि कोरिया हे देश, त्याचे शेजारी म्हणून उभे आहेत. इतक्या शेजाऱ्यांच्या खांद्याला खांदा भिडवून उभा असलेला रशिया जवळ जवळ ८६,४६,४०० चौरसमैल भूमीवर पसरलेला असून जगांतील मानवी प्राण्यांनीं वस्ती केलेल्या प्रदेशापैकीं एकषष्ठांश भूमि यानें व्यापलेली आहे. रशियन सरहद्दीवरून जरी कोणी प्रवास करूं म्हणेल तर त्याला ३७२०० मैलांचा प्रवास करावा लागेल. साधारणपणें ताशीं ३०० मैल जाणारें विमान पांच-

साडेपांच दिवसांत या देशाला प्रदक्षिणा घालूं शकेल. यावरून या राष्ट्राच्या अवाढव्य लांबीरुंदीची कल्पना डोळ्यांसमोर येईल.

जगांतील सर्वांत मोठ्या राष्ट्राकडे आपण जात आहोंत. ही कल्पना आमच्या सर्वांच्या डोळ्यांपुढें होती. युरोप–आशियाशीं तुलना करून बोलावयाचें तर युरोपचा अर्धा व रशियाचा एकतृतीयांश भाग यांनीं व्यापला आहे. ज्या अमेरिकेशीं रशियाची नेहमीं तुलना केली जाते तिच्या तिप्पट मोठा हा देश आहे, तर युरोपमधील ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली व स्पेन हे देश एकत्रित करून बोलावयाचें म्हटलें तर हा देश त्यांच्या चौदापट मोठा आहे. मॉस्को हें शहर रशियाचें हृदय आहे असें धरून या रशियाच्या व्यापाराचा विचार करावयाचा म्हटलें तर मॉस्कोभोंवतीं पसरलेलें रेल्वे-रस्त्यांचें जाळें प्रथम डोळ्यांपुढें उभें राहतें. पूर्वेकडे एका टोकाला असलेल्या व्हॅलेडिओस्टाक या बंदरापासून मॉस्को शहरापर्यंत यावयास मॉस्कोमधील अतिशय वेगवान अशा एक्स्प्रेस आगगाडीलाहि सात दिवस आणि सात रात्री लागतात, यावरून या अंतराची कल्पना येईल. भौगोलिक दृष्ट्या अवाढव्य अशा पसरलेल्या या राष्ट्रांत दिवसरात्रीचे केवढे तरी मोठे मनोरंजक खेळ चाललेले असतात. अतिपूर्वेकडील सैबेरियांतील बैकल सरोवराजवळील प्रदेशांत मध्यरात्र झालेली असते तेव्हां मॉस्को शहरांत नुकतेच कोठें सायंकाळचे सात वाजलेले असतात, तर रशियाचे पूर्वेकडील चुकोटस्की विभागांत नुकतेच कोठें झुंजूमुंजू दिवस उजाडलेला असेल. एकाच राष्ट्रांतील हे दिनमानाचे फरक इतरत्र फारच थोड्या टिकाणीं पहावयास मिळतील. देशाच्या एका टोकाला उन्हाळ्याची झळ भाजून काढते, तर उत्तरेकडील कांहीं प्रदेशांत बारमाही बर्फाच्छादित डोंगराचे कडे याच वेळीं डोळ्यांना दिसत असतात.

निसर्गाची कृपाच रशियावर एवढी आहे कीं, त्याचे जवळजवळ अर्धे असे दोन भाग येनीसी नदीनें पाडले आहेत. ही नदी सैबेरियांतून वाहते. नदीच्या पश्चिमेकडील भाग हरित भूमींनीं व्यापलेला आहे. तर पूर्व भाग डोंगर-पठारांनीं व्यापलेला आहे. या पश्चिमेकडील हरित भूमीवर दक्षिणोत्तर अशी उरल पर्वताची रांग पसरलेली असून या पर्वताच्या आसपासच रशियाचा दाट वस्तीचा प्रदेश पसरलेला आहे. दक्षिणेकडेहि कार्पेथियन,

क्रीमियन, कॉकेशियन, पामीर, अल्ताई पर्वतांच्या रांगा पसरलेल्या असून यांतील सर्वांत उच्च शिखर म्हणजे पामीरचें शिखर होय. तें २४,९८३ फूट उंच असून उन्हाळ्यांतहि या शिखरावर पाणी गोठलेलें असतें तर या पर्वताच्या पायथ्याशीं उन्हाळ्यानंतर उष्णतामानानें उच्चांक गांठलेला असतो. हा उष्णतामानांतील असामान्य फरक रशियांत सर्व ठिकाणीं सारखा पाहावयास मिळतो. या पर्वतश्रेणींनीं रशियन शेतीला जरी फारशी मदत केलेली नसली, तरी या भूमीला अनेक खनिज धातूंनीं समृद्ध बनविलें आहे. याच पर्वतश्रेणींत रशियानें आपले गाजलेले उद्योगधंदे वसविले असून धान्योत्पादनासाठीं अनेक एकर जमीन मोकळी ठेविली आहे. डोंगराडोंगरांतून पसरलेला हा कारखान्यांचा पसारा पाहिला कीं, रशियन इंजिनियरांच्या कल्पकतेची पूर्णपणें कल्पना येते, आणि निसर्गनिर्मित पर्वतश्रेणीहि यांच्या कल्पकतेची कशी दाधी बनली आहे, हें पाहून मन थक्क होऊन जातें.

आम्ही भारतीय प्रवासी सकाळीं ९ च्या सुमारास पालम विमानतळावरून निघालों, पण आमचें विमान पहिलें दोन तास पाक व अफगाणिस्तानच्या आकाशावरूनच उड्डाण करीत होतें. एका काळीं आमच्या पण आतां पाकिस्तानच्या झालेल्या पंजाबच्या पंचनद्या ओलांडून आम्ही अफगाणिस्तानच्या भूमीवरून रशियाच्या रोखानें पुढें सरकूं लागलों. हिंदुकुश, काराकोरमसारख्या पर्वताच्या शेपट्यांनीं व्यापलेली आमची तटबंदी हां हां म्हणतां ओलांडून आमचें विमान पुढें धांवूं लागलें. विमानाच्या धुरकटलेल्या कांचांतून आम्ही समोर क्षितिजावर दिसणाऱ्या रशियन भूमीचें दर्शन घेत होतों. उझबेग या सोव्हिएट रशियाच्या दक्षिणेकडील प्रदेशांत दिसणारीं छोटीं छोटीं घरें आम्हांला दिसत होतीं. हें रशियन भूमीचें पहिलेंच दर्शन मोठें मनोरम होतें. आपल्याकडील कोणतेंहि शहर जरी घेतलें कीं, त्यांतील दोन-तीन टोलेजंग इमारती डोळ्यांसमोर विमानांतून चटकन् डोळ्यांत भरतात, पण रशियन प्रदेशाचा या दृष्टीनें दिसणारा वेगळेपणा कोणत्याहि परकीय प्रवाशाला जाणवल्याशिवाय राहत नाहीं. खालीं पसरलेलीं गांवें लांबवर पसरलेलीं दिसत तर हिरवीगार शेतें त्यांची शोभा वाढवीत, परंतु कोणतीहि इमारत दोन किंवा तीन मजल्यांच्या वर दिसत नसे. ज्याला आपण चाळीवजा इमारती म्हणूं अगर पत्र्याची थोड्या

खर्चीत होणारीं घरें अशा नांवानें संबोधूं, अशींच घरें या ठिकाणीं डोळ्यांना सभोंवार दिसतात. हा रशियन शहराचा साधेपणा मनांत प्रथमदर्शनीं भरल्याशिवाय राहात नाहीं. भारतासारख्या गरीब देशाला असा साधेपणा कां साधूं नये हा प्रश्न या वेळीं डोळ्यांसमोर येतो.

आज रशियन राज्यकर्त्यांनीं रशियाची विभागणी एकूण १५ विभागांत केली असून हे पंधरा विभाग म्हणजे आपल्याकडील पंधरा प्रांतांसारखे आहेत. या प्रत्येक प्रांताला एक एक स्वतंत्र रिपब्लिक या नांवानें संबोधण्यांत येतें. या पंधरा रिपब्लिकांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत:—( १ ) रशियन सोव्हिएट फेडरेटिव्ह सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( २ ) युक्रेनियन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ३ ) दी बायलो रशियन सोव्हिएट रिपब्लिक, ( ४ ) दी उझबेग सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ५ ) दी कझाक सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ६ ) दी जॉर्जियन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ७ ) दी आझरबैजान सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ८ ) दी लुथवानियन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ९ ) दी मालदीव्हिएन् सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( १० ) दी लाटव्हिएन् सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( ११ ) दी किरझीक सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( १२ ) दी तेझीक सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( १३ ) दी आरमेनियन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( १४ ) तुर्कोमन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक, ( १५ ) इस्तोनियन सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक.

या पंधरा स्वतंत्र रिपब्लिकांचें वैशिष्ट्य, ज्या ज्या ठिकाणीं रशियांत जावें तेथें तेथें पाहावयास मिळतें. प्रत्येक प्रदर्शनांत, प्रत्येक वस्तुसंग्रहालयांत या पंधरा संस्थानांच्या स्वतंत्र खोल्या आहेत. या संस्थानांची भौगोलिक वैशिष्ट्यें व त्यांचीं लोकांचीं वैशिष्ट्यपूर्ण राहणी याची कल्पना यावरून येते व सर्व देशाचें एकीकरण जरी रशियांत कितीहि साधण्यांत आलें असलें तरी प्रत्येक प्रांताची एकमेकांत आपल्या प्रगतीसाठीं थोडी फार चढाओढ सुरू असावी किंवा काय अशी शंका मनांत आल्याशिवाय राहत नाहीं.

रशियन हद्दींत प्रवेश केल्याबरोबर रशियाविषयींच्या आमच्या कल्पना फारशा उत्साहजनक झाल्या नाहींत. साधारणपणें मुंबई पाहावयास जाणारा

कोंकणचा मनुष्य, पुण्यासारख्या ठिकाणीं आल्यानंतर त्याला जशी मुंबईच्या अवाढव्यतेची कल्पना पुण्यावरून येत नाहीं. त्याला पुणें म्हणजे जिल्ह्याचे ठिकाणापेक्षां थोडें मोठें शहर असें वाटतें. त्याचप्रमाणें दक्षिण रशियांतील शहरांत प्रवेश केल्याबरोबर वाटूं लागतें. मध्यपूर्वेकडील इराक-इराणसारखीं राष्ट्रें ज्यांनीं पाहिलीं आहेत, त्याला हा प्रदेश म्हणजे या संस्कृतीचें एखादें पुढें आलेलें टोक असावें असें वाटतें. उत्तर भारतांतील लोकांच्या राहणीशीं या दक्षिण रशियांतील लोकांचें कांहीं साम्य तर नाहींना अशी शंका यांच्याकडे पाहतांना मनांत आल्याशिवाय राहत नाहीं. लाहोर अगर सरहद्द प्रांतांतील पठाण-पंजाबी नागरिकाइतके हे दक्षिण रशियांतील नागरिक धिप्पाड दिसत नसले तरी त्यांच्या वाटोळ्या चेहऱ्यांत उत्तर हिंदुस्तानी चमक दिसते. आम्ही या प्रदेशांतून पुढें पुढें सरकत ताशकंद शहराजवळ येत होतों. उझबेग प्रांताची राजधानी असें हें शहर आकाशांतून पाहतांना मोठें रमणीय वाटलें. डोंगरावरून पठाराकडे सरकतांना जसा उतरता प्रदेश समोर दिसतो तसेंच ताशकंद शहर डोळ्यांसमोर दिसूं लागतांच आमच्या विमानांतील सेविकेनें ‘ आपण रशियन भूमीवर उतरत आहोंत ’ अशी सूचना दिली.

ताशकंद हें वैमानिक वाहतुकीच्या दृष्टीनें रशियांतील अत्यंत महत्त्वाचें शहर असून भारताच्या जुन्या सरहद्दीपासून अवघ्या ३००–४०० मैलांवर सुसज्ज असा हा रशियाचा विमानतळ पाहिला कीं, या राष्ट्रांनीं आपल्या सरहद्दीजवळ केवढी मोठी वैमानिक तयारी करून ठेविली आहे याची कल्पना येते. जगांतल्या कोणत्याहि मोठ्या विमानाला येथें उतरतां येईल अशी जयत तयारी या तळावर आहे. विमान उतरूं लागलें कीं, त्यांना खुणांनीं पद्धतशीर मार्ग दाखविणारे रशियन विमानतळावरील नोकर तुम्हांला अगदीं शिस्तींत उभे असलेले येथें दिसतील. विमानतळावरील साधी पण लांबलचक इमारत, त्यांच्या बाजूला एक पाणघोड्याप्रमाणें वर मान करून डोकावणारें रडार यंत्र या गोष्टी या तळावर पाहिल्या कीं, रशियाच्या सुसज्ज लष्करी दृष्टिकोनाचा परिचय होतो. अवाढव्य विमान-तळावर आमची ‘ विजापूरची राणी ’ इतक्या सहज लीलेनें कॅप्टन् शिवराम यांनीं सहजासहजीं उतरविली कीं, विमानतळाच्या इमारतीसमोर

मोठ्या डौलानें ती येऊन चटकन उभी राहिली. जणूं काय भारतांतून सुरू होणारी ही पहिली विमान-वाहतूक पाहुण्यांना घेऊन तुमच्याकडे येत आहे असा इशाराच तिनें रशियाच्या शिस्तबद्ध नोकरांना दिला. विमान थांबल्या-बरोबर जिन्यावरून धांवत येणारा पहिला नागरिक कोण असेल तर तो एक रशियन पोलीस अधिकारी होता. दारांत उभें राहून त्यांनीं आम्हां सर्वांना अभिवादन केलें व विमानांतून उतरण्यापूर्वीं आमच्या विमान-सेविकेनें गोळा केलेले पासपोर्ट आपल्या हातीं घेतले व तो आपल्या सहकाऱ्यांसह शिस्तींत पांवलें टाकून निघून गेला. तो निघून गेल्यानंतर शहराचे मेयर पुढें झाले व त्यांनीं आम्हां सर्वांशीं हस्तांदोलन करून स्वागत केलें. ते कांहीं तरी रशियन बोलत, आम्ही न कळतां मान हालवीत असूं. आमचीं नांवें उच्चारिलीं जात, व आम्ही पुढें जात होतों. रशियांत आमच्या इंग्रजी भाषेला किती मान आहे हें आम्हांला चांगलें कळून आलें. रशियन हे रशियन भाषेला कसा मान देतात याची कल्पना आम्हांला येथें प्रथम आली. इतक्यांत फ्रेंच पद्धतींनीं इंग्रजी बोलणारी एक रशियन महिला पुढें आली व तिनें मेयर व एअर इंडियाचे अधिकारी, राजकुमारी अमृत कुंवर वगैरे मंडळींची ओळख करून दिली. आम्ही विमानतळाच्या इमारतीकडे निघालों. आमच्या स्वागतासाठीं तळावर आलेल्या नागरिकांच्या रांगांतून आम्ही पुढें चाललों होतों. लोक आम्हांला पाहून टाळ्या वाजवीत होते. ग्लाडीयॉलिससारख्या फुलांचे गुच्छ आमच्या हातांत देत होते. आम्हीं त्यांचें स्वागत स्वीकारीत विमानतळाच्या इमारतींतील भोजनाच्या टेबलापाशीं आलों व मेयरनीं छोटेंसें भाषण करून आमचें स्वागत केलें. या भोजनगृहांत फलाहारावर विशेष भर होता. उत्तम टरबुजें, गोड द्राक्षें व लालबुंद कलिंगडें मोठ्या मोहक तऱ्हेनें मांडून टेबलावर ठेविलीं होतीं. कांहींशा लालबुंद तोंडाच्या रशियन सेविका काळ्या झग्यावर इंग्लिश पद्धतीचे ॲप्रन गुंडाळून टेबलांतून आम्हांला आग्रह करीत हिंडत होत्या. त्यांना आमच्याशीं बोलतां येण्या-सारखी कोणतीहि भाषा येत नव्हती, पण त्यांचे चमकदार डोळे व अभिनयानें सर्व बोलून दाखविणारे हावभाव एवढ्या मोकळेपणानें चालू असत कीं त्याच्या मनांतील आशय आपोआप बोलला जात असे. थोडेंसें इंग्रजी जाणणाऱ्या एका उझबेग वृत्तपत्राचा बातमीदार टेपरेकॉर्डर गळ्यांत बांधून

हिंडत होता. त्यांनीं आमच्यांतील उद्योगपति कसे नेमके हेरले नकळे, पण त्यांनीं त्यांना रशियांत उतरल्याबरोबर काय वाटतें याविषयींचे विचार चटकन ध्वनिमुद्रित करून घेतले.

या ठिकाणचें आमचें स्वागत रशियन गृहस्थाश्रमाची आम्हांला पूर्ण जाणीव देणारें होतें. सर्वजण थोडाशा फलाहारानंतर शहर पाहण्यासाठीं निघालों, आणि या रशियन प्रवासांतील पूर्वार्धाला आम्हीं येथून सुरुवात केली.

# २ : कामगारांचा देश

रशिया म्हटला, कीं कामगारांचा देश अशी एक सर्वसाधरण हिंदी माणसाची समजूत असते. पण रशियाची प्रत्यक्ष माहिती करून घ्यावयास निघालेल्या व्यक्तीला या देशांत प्रवास केल्यानंतर या कल्पनेंत व व्याख्येंत थोडासा बदल करावासा वाटेल. रशिया हा देश नुसता कामगारांचा नाहीं. शेतकऱ्यांचा नाहीं, श्रमजीवींचा नाहीं, तर तो तेथें जन्मास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा देश आहे ! देशाचें भवितव्यांत आपलें सुख सामावलेलें आहे. या आत्मीयतेनें रशियांतील नागरिक आपल्या देशाकडे पहावयास शिकलेला असतो. त्यांच्या शिशु-मंदिरापासून पदवीपर्यंतच्या शिक्षणांत हीच भावना प्रज्वलित कशी केली जाईल याकडेच प्रामुख्यानें लक्ष दिलें जातें. यामुळें जीवनाच्या प्रत्येक दालनांत प्रवेश करतांना रशियन नागरिक याच आत्मीयतेनें आपल्या कार्याकडे पाहूं लागतो व त्याचेंच प्रतीक आज रशियाच्या प्रगतींत दिसत आहे.

कामगारांच्या या देशाकडे ज्या वेळीं मी पाहूं लागलों त्या वेळीं सुरुवातीला तरी माझ्या कल्पना हें एक मोठें व सुखी समाधानी राष्ट्र असावें अशा झाल्या नाहींत. ताशकंदच्या विमानतळावर आमच्या स्वागतासाठीं आलेले मेयर व त्यांच्याबरोबरचे २०-२५ प्रमुख सोडले तर कंपौंडाबाहेर २००-२५० शेतकरी पेशाचे रशियन नागरिक ज्या वेषांत माझ्यासमोर आले, त्यावरून त्यांचा वर्ग व मेयर म्हणून निवडून येणारी व्यक्ति या दोहोंमध्यें आमच्याकडील मंत्री व शेतकरी यांच्यामध्यें जो फरक दिसतो तेवढाच फरक मला तेथेंहि दिसत होता. तेथील हवामानाला साजेसे गंजीफ्रॉक व लांड्या विजारी त्यांनीं घातल्या होत्या, तर शेताच्या कडेवर विळे-कोयते घेऊन उभे असलेले शेतकरी आमच्याकडील शेतकऱ्यांसारखे उघडेबंब उभे होते. शेतकरी-कामकरी ज्या देशाची सत्ता हातांत ठेवून राज्यकारभार करीत आहेत त्या देशांत हें असें शेतकऱ्यांचें जीवन कां ?

२५७२९ २८९ ग्रंथालय १९-१०-५८

हा प्रश्न मला त्या वेळीं गोंधळांत टाकणारा होता. ताशकंदसारख्या रशियांतील नांवाजलेल्या शहरांतील नागरिकांशीं या वेळीं मला बोलण्याची संधि मिळाली. त्यांच्याशीं बोलतांना मात्र या माझ्या शंकेचें बरेंच निरसन झालें. मेयर, रशियन मंत्री, रशियन कामगार, रशियन शेतकरी, रशियन विद्यार्थी व रशियन प्रोफेसर यांचें जीवनसौख्य जर त्यांच्या पोषाखावरून ठरवावयाचें असेल तर या परिस्थितीचें मोजमाप तेथें नीट होऊं शकेल असें वाटत नाहीं. आपल्याकडे ' पैसा तसा पेशा ' हा जवळ-जवळ ठरलेला सिद्धान्त आहे, तर ' पेशा तसा वेश ' हें रशियन जीवनाचें सूत्र आहे. यामुळें साधा पोषाख केलेला विद्यार्थी अगर कामगारांचा वेष केलेला इसम मंत्र्याशेजारीं बसावयास कधींहि कचरत नाहीं. आपण फारच मोठ्या दर्जाच्या माणसाशेजारीं जाऊन बसलों, त्यांच्याबरोबर बसल्यानें आपला वेष कसा दिसेल, त्याला त्यामुळें कमीपणा येईल किंवा काय अशी शंकाहि त्याच्या मनांत येत असेल असें वाटत नाहीं. आमच्या स्वागतासाठीं उत्तम युरोपियन पद्धतीचा सूट व टाय पेहरलेले मेयर हॉलच्या बाहेर पडतांच एका शेतकऱ्याच्या खांद्यावर हात टाकून गप्पा मारतांना मला दिसले. त्या वेळीं ' समाजवादी समाज रचना ' म्हणजे काय याची कल्पना मला प्रथमच आली. नागरिकांच्या निरनिराळ्या थरांतील व्यक्ती अशा एकत्रित येऊन रशियांत कशा राहूं शकतात हें नीट समजावून घ्यावयाचें असेल तर त्यासाठीं रशिया हा श्रमजीवींचा देश कसा झाला याचा थोडा इतिहास पाहणें आवश्यक आहे. तरच आजच्या परिस्थितीची पार्श्वभूमि नीट डोळ्यासमोर येऊं शकेल.

आजच्या रशियाच्या जन्म १९१७ च्या रशियन क्रांतींतून झाला ही गोष्ट रशियांतील शाळांतून खेळणाऱ्या बालकांपासून सर्वांना मुद्दाम पढविली जाते. रशियन क्रांतीसाठीं प्राण देणाऱ्या वीरांचीं नांवें शाळांतील मुलांना पाठ असतात. क्रेमलीनमधील भिंतींवर स्टालिन-लेनिनच्या थडग्यामागें दगडादगडांतून तीं कोरलेलीं आहेत. व या दगडांवर लिहिलेल्या बोलक्या क्रांतींतून आजचा रशिया जन्मास आला ही गोष्ट डोळ्यांसमोर आली कीं, आजच्या या सुधारलेल्या प्रगतिपर देशामागें केवढी मोठी तयारी आहे याची कल्पना येते.

वाईट गोष्ट दिसली कीं, ती ताबडतोब उखडून काढावी. हें तत्त्वज्ञान रशियन राजनीतींत कामगारांच्या राज्यांत कामगारांच्या हातीं सत्ता येतांच ताबडतोब अमलांत आणण्यांत आलें. जमीनदारांच्या जमिनी ताबडतोब राजसत्तेनें ताब्यांत घेतल्या. त्यासाठीं त्यांनीं कूळकायदा केला नाहीं तर ज्यांच्याजवळ जमिनी नव्हत्या अशांना त्या ताबडतोब वांटून व त्याच्या मालकीच्या न होतां देशाच्या ठरल्या. त्यावर कामगार-राज्याची सत्ता प्रस्थापित झाली. बँका, रेल्वे, व्यापारी बोट कंपन्या व मोठमोठे कारखाने सरकारनें ताब्यांत घेतले. त्यासाठीं किंमत अगर नुकसानभरपाई देण्यांत आली नाहीं. उलट जो कष्ट करावयास तयार असेल त्याला उपाशी राहावें लागणार नाहीं, त्याच्या श्रमाची किंमत त्याला निश्चित मिळेल असें आश्वासन देण्यांत आलें झारशाहींत माजलेली भांडवलशाही प्रथम नाहींशी करण्यांत आली व त्याचें आज चाळीस वर्षांनंतरचें हें रूप पाहिलें म्हणजे समाजवादी समाजरचना म्हणजे काय, याची कल्पान प्रत्येकाला येते. आज मॉस्को, लेनिनग्राड, ताशकंद, क्रान्सोदार, ओडेसा, कीव्ह, स्टालिनग्राड वगैरे कोणत्याहि मोठ्या शहरांत प्रवेश केल्याबरोबर जर कांहीं विशेष दिसत असेल तर ही गोष्ट कीं, डोळ्यासमोर दिसणारी कोणतीहि गोष्ट खाजगी मालकीची नसते. समोर दिसणारें हॉटेल, सिनेमा थिएटर अगर मोटारगाडी, ट्राम्वे यांपैकीं कोणत्याहि वाहनाचा उपयोग करतांना रशियन नागरिक मोठ्या अभिमानानें सांगतो कीं माझ्या देशाची ही साधन-संपत्ति मी वापरीत आहें. माझ्या सुखसोयींसाठींच हें आहे. तें नीट राखण्यासाठीं मीं योग्य तो पैसा दिला पाहिजे. तें नीट वापरलें पाहिजे. ही भावना एवढी मनोमन त्यांच्यामध्यें भिनलेली असते कीं या आत्मीयतेच्या बळावरच रशियन राजवट सुरू आहे.

आज रशियांतहि निरनिराळ्या थरांतील माणसें दिसतात, पण त्यांचें शिक्षणांत व वैशिष्ट्यपूर्ण राहणींत एवढें कमी अंतर असतें कीं, एकापेक्षां दुसरा फार मोठा ही भावना तेथें जीव धरूं शकत नाहीं. कारखान्याचा कामगार व मुख्य इंजेनियर एका खोलींत बसून सिगारेट ओढूं शकतो. प्रोफेसर, मेजर जनरल, कामगारांचा एकादा फोरमन एकाच बंगल्यांत अगर एकाच चाळींत राहूं शकतात. त्यांचे स्नेहसंबंध असूं शकतात व अशा

स्नेहसंबंधांतून नव्या रशियाचा सामाजिक समाजवादाचा जन्म झाला आहे. या प्रयोगाच्या वैशिष्ट्यावरच आजच्या रशियन राज्यव्यवस्थेचें यशापयश अवलंबून आहे.

रशियाच्या १९३९ सालीं तयार झालेल्या नव्या घटनेनुसार रशिया म्हणजे कामगारांचा व शेतकऱ्यांचा देश हीच व्याख्या रूढ करण्यांत आली. सर्वच जमिनीचें व कारखान्याचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर जमीनदारवर्ग रशियन समाजांतून एकदम नाहींसा झाला. त्यामुळें लोकांमधील निरक्षरता नाहींशी करण्याकडे प्रथम राष्ट्राचें लक्ष वेधलें व त्या दृष्टीनें प्रयत्नाला सुरुवात झाली. याचा परिणाम असा झाला कीं, रशियाच्या सुप्रीम सोव्हिएटमध्यें निवडून येण्याइतकें सामर्थ्य सर्वसाधारण कामगारवर्गाच्या अंगांत आलें व त्यांच्या हातीं खरोखरच देशाची सत्ता आली. आज ज्याच्या हातीं सोव्हिएट रशियाची सत्ता आहे त्या सुप्रीम सोव्हिएटमध्यें पी. वायकोव्ह हा एक साधा टर्नर आहे. खाण-कामगार आय्. व्हालिगुरा, विणकर एम्. मटेरिकोव्हा, संयुक्त शेती संघाचे अध्यक्ष एम्. पॉस्मिनोनी, इंजीनियर झिबोनोव्ह, लेखक एस्. तोका व कवि सेवियोव्ह सेदोयी अशी मंडळी आहेत. यावरून रशियांतील या कार्यकर्त्यांचें प्रतिनिधित्व किती धंद्यांतील आहे याची कल्पना पूर्णपणें येतें. रशियांत वयांत आलेला प्रत्येक नागरिक या ना त्या प्रकारानें राज्यकारभारांत भाग घेत असतो. कारखान्यांत काम करणारा कामगार, अगर शेतांत काम करणारा शेतकरी आपलें पोट भरण्याबरोबर आपल्या देशाच्या संपत्तींत वाढ व्हावी म्हणून झटत असतो. त्यांनीं तसें झालें पाहिजे याची जाणीव त्याला पदोपदीं दिली जाते. यामुळें आपले राज्यकर्ते जरी कोणीहि असले तरी, आपण करीत असलेलें काम त्यांच्यासाठीं करीत नसून देशाच्या प्रगतीचा एक मार्ग म्हणून करीत आहोंत, ही भावना शाळेंतील मुलापासून तों रशियांतील वृद्धापर्यंत आहे. सुप्रीम सोव्हिएटच्या मदतीसाठीं असलेल्या चेम्बर ऑफ डेप्युटीजचें जें पार्लमेन्ट असतें व त्यामध्यें जनतेचे प्रतिनिधि म्हणून निवडून आलेले जे असतात ते बहुतेक ४० वर्षांच्या वरचे असतात. त्यांचा व्यावहारिक अनुभव हा मोठा असतो व त्यांना ' सोव्हियट यूनियनचे वीर ' अगर ' सोव्हिएट कामगारांतील वीर ' अशा पदव्या त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांतील महत्त्वाच्या कामगिरीबद्दल मिळालेल्या असतात.

आज निरनिराळ्या सोव्हिएट कायदे मंडळांतून १५ लक्ष प्रतिनिधी निवडून आले आहेत. ते आपल्या विभागांतील लोकांचा प्रगतीचा विशेष कार्यक्रम काय आहे याची नीट कल्पना घेऊन आलेले असतात. त्यांना आपल्या विभागांतील नागरिकांची कायदे मंडळापासून ते खेड्यांतील ग्रामपंचायती-सारखा कारभार हातीं घेणाऱ्या "व्हिलेज सोव्हिएट" पर्यंत सर्व लोकांनीं निवडलेले असल्यामुळें त्यांना आपल्या प्रतिनिधित्वाविषयीं नेहमीं जागृत राहावें लागतें. ते नेहमीं कम्युनिस्ट पक्षाचे सभासद असतातच असें नाहीं. पण कम्युनिस्ट धोरणानें चालणाऱ्या मंडळीचा स्वार्थत्याग मोठा असतो, ही भावना रशियन नागरिकांत असते. त्यांचें कोणतेंहि कार्य चुकलें तर त्यांना मार्गें खेचणारें पक्षबल मोठें सामर्थ्यवान असतें. म्हणूनच क्रुश्चेव्ह आपले निर्णय आपल्या पक्षाचे बळावर वाटेल त्या वेळीं कृतींत उतरवूं शकतो. १९५७ सालच्या निवडणुकींत निवडून आलेल्या ८४४३३७ रशियन प्रतिनिधींत ५४·५ इतके कोणत्याहि पक्षाचे सभासद नव्हते व स्वतंत्र विचाराचे होते. त्यांना त्यांचे विचार मांडावयास पूर्णपणें मुभा मिळते, पण कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाला एवढा मान रशियाच्या सर्वसाधारण जनतेंत आहे कीं, कोणतीहि घटना कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाला धरून असेल तरच ती कायदे मंडळाला मान्य होऊं शकते. रशियाच्या तरुण पिढींत तर कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होऊन पक्षाची आज्ञा पाळणें हा एक ध्येयवाद विद्यार्थी जीवनां-तूनच पुढें येऊं लागला आहे. रशियांत ठराविक विभागांतून एखादा प्रतिनिधि कायदेमंडळांत निवडून आला कीं, त्याची निवडणूक मुदत संपे-पर्यंत तो तेथें निश्चित राहील असें नाहीं, त्याच्या मतदार-संघाला तो नीट काम करीत नाहीं, आपले प्रतिनिधित्व ठराविक ठिकाणीं आपल्या मता-प्रमाणें संभाळीत नाहीं, असें आढळून आलें तर त्याला परत बोलावण्याचा अधिकार पूर्णपणें असतो. यामुळें कोणाचाहि प्रतिनिधि म्हणून निवडून गेल्यानंतर त्याला आपल्या स्वतःच्या कर्तव्याची जाणीव पूर्णपणें डोळ्यां-समोर ठेवून नेहमीं वागावें लागतें.

कोणत्याहि नगरपालिकेची—म्हणजे सिटी सोव्हिएटची निवड झाली कीं, नागरिकांचें कार्य संपलें असें नाहीं. प्रत्येक वॉर्डांतील सोव्हिएट प्रतिनिधीच्या मदतीसाठीं कमिट्या असतात व नागरिकांच्या कर्तव्याची जाणीव देण्याचें

कार्य या कमिट्या करीत असतात. गोर्की या एकट्या शहरांत ४०० कमिट्या काम करीत असल्याचें मला सांगण्यांत आलें. या कमिट्या आपल्या आळीं-तील स्वच्छतेकडे पाहतात. त्याच आपले नगरपालिकेच्या सॅनिटरी इन्स्पेक्टरचें काम करतात. या कमिटीच्या सहायानें आळींतील सुधारणा केल्या जातात. त्यांना रशियन भाषेंत 'स्ट्रीट कमिटीज्' या नांवानें संबोधण्यांत येतें. या आळींतील कमिट्या नुसती स्वच्छता पाहतात असें नाहीं तर आपल्या आळींतील कर वसूल झाला नाहीं तर त्यासाठींहि त्यांना प्रयत्न करावा लागतो. त्यांच्याकडेच आळींतील शाळेची व्यवस्था असते. कारण शाळा, दवाखाने याचा सर्व खर्च सोव्हियट सरकार करीत असतें. हा खर्च सर्व-साधारण माणसावर बसविलेल्या करामधून होत असल्यामुळें आपलाच पैसा यावर खर्च होत आहे व तो आपण नीट खर्च केला पाहिजे ही भावना प्रत्येक सोव्हिएट नागरिकाच्या मनांत असते व तो त्याची नीट काळजी घेत असतो. या खेड्यांतील व शहरांतील सोव्हिएट मंडळांना एवढा मान असतो कीं, सोव्हिएट राज्यघटनेंत पुढें येणारा एखादा कायदा या साध्या सोव्हिएटमधूनहि चर्चिला जातो व तेथील विचार वर कळविले जातात. सोव्हिएट सरकारची घटना सहा महिनेपर्यंत या शहरा-शहरांतील सोव्हिएट-मधून चर्चिली जात होती व तेथून आलेल्या सूचनानुसार योग्य ते फेरबदल करून नंतरच ती पास होऊं शकली.

हा मतस्वातंत्र्याचा हक्क जरी कितीहि खालच्या थरापर्यंत पोहोंचला असला तरी ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, या संघटनांची बहुतेक सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या हातीं आहे. सबंध रशियांत रशियन कम्युनिस्ट पक्षाची शपथ घेऊन कार्याला लागलेले जवळ जवळ ७० लक्ष सभासद असून या सर्वांना 'जागृत राजकारणी' म्हणण्याचा तेथें प्रघात आहे. हे जागृत राजकारणी कम्युनिस्ट, देशाच्या राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेत असल्यामुळें तेच निवडून येत असतात. प्रत्येक सरकारी कार्याच्या मागें त्या त्या स्थानिक संस्थांचा एक एक गट असतोच व त्यामुळें वरपासून अगदीं खालच्या थरापर्यंत सर्वच ठिकाणीं सत्ताधारी माणसें कम्युनिस्ट पक्षाचीं माणसें असतात. या पक्षाची दीक्षा घेतल्याशिवाय कोणालाहि रशियन राजकारणांत यशस्वीरीत्या

भाग घेतां येत नाहीं. त्यामुळें आजच्या रशियाची सर्वच सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या हातीं आहे हें स्पष्ट आहे.


रशिया कसा आहे याची कल्पना वरील विवेचनावरून येण्यासारखी आहे. आमची 'विजापूरची राणी' ताशकंद सोडल्यापासून मोठ्या डौलानें आकाशांतून ताशीं २५० मैलांच्या वेगानें चालली होती. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतीय लोकशाहीचे आम्ही नागरिक रशियाच्या राजधानीकडे—मॉस्कोकडे निघालों. ताशकंदपासून मॉस्कोपर्यंतच्या मार्गावर आम्हांला लहान खेडीं व शहरें मधूम मधून दिसत होतीं. रशियाच्या कझाकीस्तानांतून आम्ही पुढें उत्तरेकडे सरकत होतों. दिवस मावळावयाची वेळ आली होती, सभोंवार पसरलेल्या सुंदर शेतांवरून लांबलचक सावली टाकीत चाललेलें आमचें विमान दाट लोकवस्तीच्या प्रदेशांत प्रवेश करणार इतक्यांत आमच्या विमानाच्या कोकिळकंठी सेविकेनें आपल्या गोड इंग्रजी भाषेंत बोलावयास सुरुवात केली. 'रशियाच्या सौंदर्यांत व विकासाला कारणीभूत झालेली 'व्होल्गा माता' आपण आतां ओलांडीत आहोंत.' सायंकाळच्या रम्य किरणांत समुद्रासारखी दिसणारी ती अजस्त्र नदी आमचें विमान ओलांडीत होतें. २३०० मैल लांबीची युरोपांतील सर्वांत मोठी नदी म्हणून व्होल्गा या रशियन नदीचें वर्णन करण्यांत येतें, पण मला व्होल्गा मातेकडे पाहतांना गंगेच्या शुभ्रवर्णी पाण्याचा भास पदोपदीं होई. महाराष्ट्रांतील कृष्णा-गोदावरी नद्यांचा पावसाळी प्रवाह ज्यांनीं पाहिला आहे, त्यानाहि व्होल्गा नदीकडे पाहतांना केवढी मोठी ही नदी! म्हणून तोंडांत बोटेंच घालून पाहात रहावेंसें वाटेल. समुद्राच्या पाण्याचा अफाटपणा तिच्यांत होता, पण समुद्राचा खळबळाट नव्हता. बर्फ वितळूं लागलें कीं, व्होल्गा नदीला मोठमोठे पूर येतात. व्होल्गापेक्षां लांबीच्या दृष्टीनें मोठी अशी रशियन नदी म्हणजे अमूर ही होय. सैबेरियाच्या पठारावरील धरणी या नदीमुळें फुलली आहे व तिनें तेथील नागरिकांचें जीवन सुखमय केलें आहे. रशियाच्या प्रगतीच्या इतिहासांत या सर्वच नद्यांना एक महत्त्वाचें स्थान आहे. निपर, डॉन व पश्चिम डॅविना या अशाच आणखी नद्या रशियन भूमीवरून वाहत असून त्यांच्या साहचर्याचा पुरेपूर उपयोग रशियनांनीं केलेला आहे. या नद्यांतून रशियन लांकडांची वाहतूक तर




मॉस्को नदीच्या कांठावरून दिसणारी क्रेमलिनची भव्य इमारत.



जुन्या हिंदी घाटाच्या या इमारती मॉस्कोच्या
गार्डनरोडसारख्या भररस्त्यावर अजूनहि दिसतात.



मॉस्को शहरांतील औद्योगिक प्रदर्शनाचें प्रवेशद्वार.



मॉस्कोच्या एका जुन्या चर्चमधील हें दृश्य,
पूर्वीच्याच स्थितींत अजून कायम आहे.

अमर्यादपणें केली जातेच, पण नौकानयनाचें रेल्वेइतकेच महत्त्वाचे मार्ग या संथपणें वाहणाऱ्या नद्यांनीं रशियाला उपलब्ध करून दिले आहेत. जवळ जवळ ७५०० मैलांचे जलमार्ग या रशियन नद्यांतून आज सुरू असून ही वाहतूक रेल्वेइतकीच होईल. सर्व नद्यांची लांबी जर विचारांत घ्यावयाची असेल तर ती या मार्गाच्या चौपट होईल. यांतील $\frac{2}{3}$ जलमार्ग व्होल्गा नदींतून असून तिच्यामधील पाण्याचा भरपूर पुरवठा हें तर तिचें खरें ऐश्वर्य आहे. तिचा उपयोग तिच्या आसपासच्या प्रदेशाला होतो, एवढेंच नाहीं तर रशियन स्थापत्यविशारदांनीं तिच्या मुख्य पात्रापासून कित्येक मैल दूर अशा निरनिराळ्या नद्यांतून तिचें पाणी नेऊन सोडून तिचा पुरेपूर उपयोग शहरासाठीं केला आहे. मॉस्को शहरांतून वाहणारी मॉस्को नदी पुण्यांतील मुठा नदीप्रमाणें उन्हाळ्याच्या दिवसांत पूर्वीं शुष्कपात्र होत असे, पण रशियन इंजिनियरांनीं कालवे काढून व्होल्गा नदीचें पाणी या नदींत आणून सोडलें व आतां मॉस्को नदी म्हणजे भरपूर पाणी असणारी छोटी व्होल्गा नदीच बनली आहे. मॉस्को विद्यापीठाच्या समोरून जाणारा हिचा प्रवाह पुण्यांतील मुळामुठेच्या संगमावरील प्रवाहाइतकाच रुंद व सदैव पूर्ण भरलेला दिसतो.

रशियाची भूमि समृद्ध करण्याच्या दृष्टीनें या नद्यांचा तर उपयोग होतोच, शिवाय त्यांच्यावर उभारलेल्या वीज-पुरवठ्याच्या केन्द्रांनीं रशियांत वीजहि अगदीं स्वस्त झाली आहे. नदीच्या पाण्यावर विद्युदुत्पादन करणाऱ्या राष्ट्रांत जगांत रशियाचा पहिला नंबर लागतो. विशेषतः निपर व्होल्गा, सवार, व्होलोकोव्ह व रोपन् या नद्या या वीज-उत्पादनासाठीं अत्यंत उपयोगी असून निपर नदीवर उभारण्यांत आलेलें विद्युदुत्पादक-केंद्र तर युरोपांतील वीज-पुरवठ्याचें सर्वांत मोठें केन्द्र समजण्यांत येतें. रशियन क्रान्तीपूर्वीं जेवढी वीज रशियांत पैदा होत होती तेवढी वीज आज या एका केन्द्रांतून निर्माण होते. अजूनहि नव्या पंचवार्षिक योजनेंत विद्युदुत्पादनाच्या अनेक योजना रशियानें हातीं घेतल्या असून त्यांचा परिणाम त्यांच्या उद्योगधंद्यांवर होणार आहे.

व्होल्गेचें तें पात्र ओलांडून आम्ही पुढें सरकलों आणि एकामागून एक महत्त्वाचीं रशियन शहरें आमच्या खालून जाऊं लागलीं. काळोख पडेपर्यंत

आम्ही डोळे फाडफाडून त्यांकडे पाहत होतों. पण थोड्याच वेळांत लुक-लुकणाऱ्या विजेच्या दिव्यांव्यतिरिक्त तेथें कांहीं दिसेनासें होई. एका बाजूला हिरव्या तर दुसऱ्या बाजूला तांबड्या दिव्यानें उजेड टाकीत पुढें सरकणारें आमचें विमान नेहमींच्या पद्धतीनें चाललें होतें. रशियांतील धूसर आकाशावर पडणारे हे विमानाच्या दिव्यांचे रंग मोठे मजेदार दिसत होते. याच रंगीत शोभेचा आस्वाद घेत किती वेळ आम्ही आकाशाकडे पाहत होतों न कळे! पण मिस् वाडियाचा मधुर आवाज पुन्हां सर्व विमानांत घुमूं लागला,

" मॉस्को विमानतळाजवळ आपण येत आहोंत, दहा-पंधरा मिनिटांतच आपलें विमान उतरूं लागेल."

झोपेंतून जागें व्हावें, त्याप्रमाणें प्रत्येकजण आपले गरम कोट आवरीत होता. कमरेभोंवतालचे पट्टे बांधीत होता. विमान उतरण्याच्या तयारींत असतांनाच मॉस्कोच्या अवाढव्य विमान तळावरचे प्रकाशित दिवे आम्हांला दिसूं लागले जणूं काय दिव्यांतूनच या तांबड्या लोकशाहीचा साक्षात्कार आम्हां प्रत्येकाला होऊं लागला होता.

## ३ : मॉस्कोचें प्राथमिक दर्शन

रात्रीं १० च्या सुमार असेल तो! गेले चार तास कानांत घुमणारा विमानाचा आवाज शांत झाला होता. छोटासा धक्का देऊन मॉस्को विमान-तळावर मोठ्या ऐटींत उतरलेली आमची ' विजापूरची राणी ' मोटारीप्रमाणें मॉस्कोच्या तळावर वळणें घेत धांवत होती. क्षणार्धांत ती विमानतळाच्या इमारतीसमोर येऊन उभी राहिली. इमारतीवर तांबडा रशियन ध्वज फडकत होता. त्याच्यावर टाकलेल्या प्रकाश झोतात हातोडा-कोयत्याचें चित्र प्रामुख्यानें दिसत होतें. विमान थांबलें होतें व प्रथमच शिडीवरून पुढें येणाऱ्या रशियन पोलिसाला, विमान कंपनीचा जांभळा ऐटबाज कोट व टोपी घातलेली विमान-सेविका वाडिया मान वाकवून " दोब्रियी व्हिशीर " म्हणून सायं-अभिवादन करीत होती. त्याच्या मागोमाग कांहीं रशियन अधिकारी विमानांत आले. त्यांनीं आमच्या शिष्टमंडाळाच्या नेत्या राजकुमारी अमृतकुंवर व पंडित हृदयनाथ कुंझरू यांच्याबरोबर आदरानें हस्तांदोलन केलें व त्यांना ग्लॅडीऑलिससारख्या फुलांचा एक एक गुच्छ अर्पण केला. आपल्या-सारखी गळ्यांत हार घालण्याची प्रथा रशियांत नाहीं. कोणाच्याहि घरीं जा, बागेंतील अगर दुकानांतून आणलेल्या ताज्या फुलांचे गुच्छ तुमचें स्वागत करण्यासाठीं तुमच्या हातांत दिले जातील. आमच्या प्रमुख पाहुण्याच्या दोन्ही बाजूंना सुप्रीम सोव्हिएटमधील दोन अधिकारी चालत होते. पुढें एक पोलीस-अधिकारी होते. त्यांनीं आमच्या सेविकेच्या कानांत विमानांत किती पाहुणे आहेत असा प्रश्न विचारला व तो बाजूला उभा राहिला. आम्ही पुढें सरकत होतों. आमचीं नांवें त्याला सांगितलीं जात होतीं. हें काम इतकें जपून व नकळत चाललें होतें कीं, आमच्यापैकीं फार थोड्यांना त्याचा पत्ता लागला. विमानाच्या शिडीच्या शेवटच्या पायरीवर हात जोडून मार्शल झुकोव्ह हे रशियन मंत्री, सरकारी प्रतिनिधि व त्यांच्यामागें हिंदचे मॉस्कोंतील वकील श्री. के. पी. एस्. मेनन उभे होते. विमाना-

भोंवतालचे उंच उंच ठिकाणीं उभें राहून हिंदी पाहुण्यांचे उतरतांना फोटो घेणारे वृत्तपत्रांचे फोटोग्राफर आमच्यावर प्रकाशज्योति मधून मधून टाकीत होते. मार्शल झुकोव्ह हे पूर्वीं भारतांत येऊन गेल्यामुळें दिल्लीच्या मंडळींचे ते परिचयाचे होते व त्यांनीं हिंदी पद्धतीनें सर्वांना ' नमस्ते ' करून नंतर प्रत्येकाशीं हस्तांदोलन करावयास सुरुवात केली. थंडीचा कडाका तळावर चांगलाच पडला होता व प्रत्येकानें आपापले ग्रेट कोट चढवून मार्ग आक्रमावयास सुरुवात केली. झुकोव्ह यांनीं औपचारिक स्वागत केल्यानंतर विमानतळावर आमचे पासपोर्ट पाहिले जातील व सामान तपासलें जाईल असें वाटत होतें, पण हा औपचारिक विधि रशियनांनीं केला नाहीं. सामानाच्या बॅगा विमानांतून खालीं काढण्यांत येत असतां, त्यावर एक रशियन अधिकारी फक्त नजर टाकीत होता. आमच्यासाठीं तयार असलेल्या मोटारींतून आम्ही आमच्या हॉटेलकडे वेळ न घालवितां निघालों. विमान कंपनीचे एक अधिकारी माझ्या शेजारींच मोटारींत बसले होते. त्यांना मीं हळूच विचारलें, " पासपोर्ट पाहिल्याशिवाय यांनीं आपणांस सोडलें कसें ? " ते हंसून म्हणाले, " तुमच्या पासपोर्टमधील माहितीपेक्षां तुमच्या-संबंधींची सर्व माहिती रशियन पोलीस खात्यानें केव्हांच गोळा केली आहे. येथें देखल्या देवा दंडवत घालण्याची प्रथा नाहीं. सर्व कामें नकळत करणें हें रशियन गुप्तहेर खात्याचें वैशिष्ट्य आहे. "

विमानतळाची इमारत रशियाच्या साधेपणाच्या वैशिष्ट्याची साक्ष देणारी होती. आमच्या विमानतळावरील राजशाही सोफासेट व इतर ऐशारामीपणा येथें नव्हता. पण साधीं व स्वच्छ बाकें, उतारूंसाठीं मांडलेलीं होतीं. त्या बाकांवर बसणारे नागरिक आपल्याकडील विमानानें प्रवास करणाऱ्या नागरिकांपेक्षां फार निराळे होते. आपल्याकडे विमान-प्रवास समाजांतील ठराविक सधन वर्गाला करतां येतो, तर येथें तो सर्वसाधारण माणसाच्या आटोक्यांतला आगगाडींतील प्रवासासारखा असावा असें तेथें जमलेल्या प्रवाशांवरून वाटत होतें. पायमोजे न घालतां बूट घातलेल्या रशियन शेतकरी मुली त्यांत होत्या, तर दणकट चेहऱ्याचे कामगार छोट्याशा बॅगा घेऊन प्रवासासाठीं आलेले होते.

मॉस्को शहरापासून जवळ जवळ २० मैलांवर असलेला हा तळ

आम्हीं सोडला त्या वेळीं रात्रींचे साडेदहा वाजले होते. ही वेळ आपल्याकडील साधारण दोनची असेल. सर्वसाधारणपणें परकीय पाहुण्यांना उतरण्यास सोयीच्या असलेल्या 'पेकिंग' हॉटेलमध्यें आमची सोय करण्यांत आली होती. हॉटेलमध्यें आल्याबरोबर आमचे पासपोर्ट घेऊन त्यांचेवरील रशियन व्हिसावरून आमचीं नांवें उतरण्यांत एक रशियन तरुणी गुंतली होती. तिला इंग्रजी येत नव्हतें, पण ती आम्हांला भराभर आमच्या खोल्या एका चिठ्ठीवर लिहून देत होती. एकमेकांची भाषा न येतां हें कार्य सुरळित चाललें होतें. मॉस्कोच्या सामाजिक जीवनाची कल्पना या ठिकाणीं या राजेशाही हॉटेलमध्यें आल्यानंतर प्रथम आली. पाहावें तिकडे मुलीच मुली दिसत होत्या. सामान नेण्यासाठीं प्रत्येक युरोपियन हॉटेलमध्यें असणारा हॉलपोर्टर या ठिकाणीं नव्हता. प्रत्येक पाहुणा आपली जड बॅग ढकलीत लिफ्टपर्यंत नेत होता व तेथून तो आपल्या खोलीकडे ती घेऊन जाई. आम्ही भारतांतील मंडळी या स्वावलंबनाला अपरिचित आहोंत ही गोष्ट हॉटेलमधील आमच्या स्वागतार्थ आलेल्या हुशार मुलीच्या चटकन् लक्षांत आली व तिनें शेजारच्या खोलींत कोट व हॅट सांभाळण्यासाठीं ठेवलेल्या एका नोकराला बोलावून आणलें व तो आमच्या सामानावर खोलीचे नंबर घालून खोल्यांतून सामान नेऊं लागला. कौन्टरवर प्रत्येकांची नांवें लिहिण्यांत गुंतलेल्या रशियन मुली ही सामान उचलण्याबाबत झालेली आमची फजिती पाहून गालांतल्या गालांत हंसत होत्या, हें आमच्या लक्षांत आलें. आम्हीं लिफ्टकडे मोर्चा वळविला व मॉस्कोच्या सामाजिक स्वावलंबनाचा हा पहिला धडा हॉटेलच्या दारांतच आम्ही शिकलों.

आम्ही उतरलों होतों तें हॉटेल १४ मजली होतें. सहाव्या मजल्यावरील खोली माझ्या वांट्यास आली होती. तिचा नंबर ३११ होता. खोलीची लांबलचक किल्ली हातांत धरून लिफ्टमध्यें प्रवेश केला. तिथें एका ठेंगण्या रशियन महिलेनें 'कितवा मजला?' असें मला विचारलें. मी तिच्यापुढें सहा बोटें उभीं केलीं आणि या अभिनयानें माझा आशय पटवून देण्याची भाषा सुरू झाली. मी सहाव्या मजल्यावर गेलों तोंच जांभळा कोट घातलेली त्या मजल्याची मॅनेजर महिला, मला अभिवादन करण्यासाठीं उभी होती. तिनें वांकून मला अभिवादन केलें व शेजारच्या मुलीला माझी खोली दाखवावयास सांगितलें.

भोंवतालचे उंच उंच ठिकाणीं उभें राहून हिंदी पाहुण्यांचे उतरतांना फोटो घेणारे वृत्तपत्रांचे फोटोग्राफर आमच्यावर प्रकाशज्योति मधून मधून टाकीत होते. मार्शल झुकोव्ह हे पूर्वी भारतांत येऊन गेल्यामुळें दिल्लीच्या मंडळींचे ते परिचयाचे होते व त्यांनीं हिंदी पद्धतीनें सर्वांना ' नमस्ते ' करून नंतर प्रत्येकाशीं हस्तांदोलन करावयास सुरुवात केली. थंडीचा कडाका तळावर चांगलाच पडला होता व प्रत्येकानें आपापले ग्रेट कोट चढवून मार्ग आक्रमावयास सुरुवात केली. झुकोव्ह यांनीं औपचारिक स्वागत केल्यानंतर विमानतळावर आमचे पासपोर्ट पाहिले जातील व सामान तपासलें जाईल असें वाटत होतें, पण हा औपचारिक विधि रशियनांनीं केला नाहीं. सामानाच्या बॅगा विमानांतून खालीं काढण्यांत येत असतां, त्यावर एक रशियन अधिकारी फक्त नजर टाकीत होता. आमच्यासाठीं तयार असलेल्या मोटारींतून आम्ही आमच्या हॉटेलकडे वेळ न घालवितां निघालों. विमान कंपनीचे एक अधिकारी माझ्या शेजारींच मोटारींत बसले होते. त्यांना मीं हळूच विचारलें, " पासपोर्ट पाहिल्याशिवाय यांनीं आपणांस सोडलें कसें ? " ते हंसून म्हणाले, " तुमच्या पासपोर्टामधील माहितीपेक्षां तुमच्या-संबंधींची सर्व माहिती रशियन पोलीस खात्यानें केव्हांच गोळा केली आहे. येथें देखल्या देवा दंडवत घालण्याची प्रथा नाहीं. सर्व कामें नकळत करणें हें रशियन गुप्तहेर खात्याचें वैशिष्ट्य आहे. "

विमानतळाची इमारत रशियाच्या साधेपणाच्या वैशिष्ट्याची साक्ष देणारी होती. आमच्या विमानतळावरील राजशाही सोफासेट व इतर ऐशारामीपणा येथें नव्हता. पण साधीं व स्वच्छ बाकें, उतारूंसाठीं मांडलेलीं होतीं. त्या बाकांवर बसणारे नागरिक आपल्याकडील विमानानें प्रवास करणाऱ्या नागरिकांपेक्षां फार निराळे होते. आपल्याकडे विमान-प्रवास समाजांतील ठराविक सधन वर्गाला करतां येतो, तर येथें तो सर्वसाधारण माणसाच्या आटोक्यांतला आगगाडींतील प्रवासासारखा असावा असें तेथें जमलेल्या प्रवाशांवरून वाटत होतें. पायमोजे न घालतां बूट घातलेल्या रशियन शेतकरी मुली त्यांत होत्या, तर दणकट चेहऱ्याचे कामगार छोट्याशा बॅगा घेऊन प्रवासासाठीं आलेले होते.

मॉस्को शहरापासून जवळ जवळ २० मैलांवर असलेला हा तळ

आम्हीं सोडला त्या वेळीं रात्रींचे साडेदहा वाजले होते. ही वेळ आपल्या-कडील साधारण दोनची असेल. सर्वसाधारणपणें परकीय पाहुण्यांना उतरण्यास सोयीच्या असलेल्या 'पेकिंग' हॉटेलमध्यें आमची सोय करण्यांत आली होती. हॉटेलमध्यें आल्याबरोबर आमचे पासपोर्ट घेऊन त्यांचेवरील रशियन हिसावरून आमचीं नांवें उतरण्यांत एक रशियन तरुणी गुंतली होती. तिला इंग्रजी येत नव्हतें, पण ती आम्हांला भराभर आमच्या खोल्या एका चिठ्ठीवर लिहून देत होती. एकमेकांची भाषा न येतां हें कार्य सुरळित चाललें होतें. मॉस्कोच्या सामाजिक जीवनाची कल्पना या ठिकाणीं या राजेशाही हॉटेलमध्यें आल्यानंतर प्रथम आली. पाहावें तिकडे मुलीच मुली दिसत होत्या. सामान नेण्यासाठीं प्रत्येक युरोपियन हॉटेलमध्यें असणारा हॉलपोर्टर या ठिकाणीं नव्हता. प्रत्येक पाहुणा आपली जड बॅग ढकलीत लिफ्टपर्यंत नेत होता व तेथून तो आपल्या खोलीकडे ती घेऊन जाई. आम्ही भारतांतील मंडळी या स्वावलंबनाला अपरिचित आहोंत ही गोष्ट हॉटेलमधील आमच्या स्वागतार्थ आलेल्या हुशार मुलीच्या चटकन् लक्षांत आली व तिनें शेजारच्या खोलींत कोट व हॅट सांभाळण्यासाठीं ठेवलेल्या एका नोकराला बोलावून आणलें व तो आमच्या सामानावर खोलीचे नंबर घालून खोल्यांतून सामान नेऊं लागला. कौन्टरवर प्रत्येकांची नांवें लिहिण्यांत गुंतलेल्या रशियन मुली ही सामान उचलण्याबाबत झालेली आमची फजिती पाहून गालांतल्या गालांत हंसत होत्या, हें आमच्या लक्षांत आलें. आम्हीं लिफ्टकडे मोर्चा वळविला व मॉस्कोच्या सामाजिक स्वावलंबनाचा हा पहिला धडा हॉटेलच्या दारांतच आम्ही शिकलों.

आम्ही उतरलों होतों तें हॉटेल १४ मजली होतें. सहाव्या मजल्यावरील खोली माझ्या वांट्यास आली होती. तिचा नंबर ३११ होता. खोलीची लांबलचक किल्ली हातांत धरून लिफ्टमध्यें प्रवेश केला. तिथें एका ठेंगण्या रशियन महिलेनें 'कितवा मजला?' असें मला विचारलें. मी तिच्यापुढें सहा बोटें उभीं केलीं आणि या अभिनयानें माझा आशय पटवून देण्याची भाषा सुरू झाली. मी सहाव्या मजल्यावर गेलों तोंच जांभळा कोट घातलेली त्या मजल्याची मॅनेजर महिला, मला अभिवादन करण्यासाठीं उभी होती. तिनें वांकून मला अभिवादन केलें व शेजारच्या मुलीला माझी खोली दाखवावयास सांगितलें.

मी तिच्या मागोमाग खोलींत गेलों. खिडकीवरील मखमली पडदे तिनें दूर केले. खोलींतील दिवा लावला, रेडिओ सुरू केला, टेलिफोन दाखवून दिला व नोकराला बोलावण्याच्या समोरच्या तीन घंटा मला दाखवून दिल्या. तिला माझी भाषा येत नव्हती, पण तिचे डोळे व हातांनीं केलेले अभिनय इतके परिपूर्ण होते कीं, मला तिच्या सांगण्याचा अर्थ कळत होता. इतक्यांत " जेवणार का ? " असा सूचक प्रश्न तिनें तोंडाकडे हात नेऊन केला व तेराव्या मजल्यावर ही सोय असल्याचें तिनें सांगितलें. ती आली तशी दार लोटून बाहेर गेली. त्या खोलींतून समोर मॉस्कोची दिसणारी शोभा पाहात मी उभा होतों. शुभ्र प्रकाशानें तेजाळणारा २०० फुटी गार्डन रोड माझ्या खोलीसमोर दिसत होता. त्यांतून धांवणाऱ्या मोटारी, व प्रकाशाच्या साहाय्यानें पोलिसाशिवाय होणारी त्यांची वाहतूक मोठी रम्य दिसत होती. इतक्यांत टेबलावरील टेलिफोनवरून मला शुद्ध इंग्रजींत सूचना आली कीं, जेवणाला लवकर यावें. मॅनेजरची इंग्रजी दुभाषी आम्हांला सूचना देत होती. रस्त्यावर खिळलेली दृष्टि मोठ्या नाइलाजानें बाजूला करून १३ व्या मजल्यावरील भोजनगृहाकडे मी वळलों. रशियांत प्रवाशांना सर्वांना अवघड वाटणारा कोणता कार्यक्रम असेल तर तो जेवणाचा होय. युरोपांतील हॉटेलमध्यें ठराविक पद्धतीनें शाकाहारी अगर बिनशाकाहारी जेवण घेणारी मंडळी या रशियन जेवणाला कंटाळतात. तिखट अजिबात नसलेली, नुसत्या भाजलेल्या कोंबडीची एक तंगडी व कोरडा भात त्या दिवशीं आमच्यासमोर आला. तर शाकाहारी मंडळींना साधे उकडलेले बटाटे व टामाटोवर आपली भूक भागवावी लागली. साखर घातलेलें दही हा एक हिंदी आवडीला रुचणारा पदार्थ तेवढा त्या दिवशीं जेवणांत होता. बहुतेक युरोपियन देशांत ' सूप ' हें जेवणाची सुरुवात समजली जाते. पण रशियाला असल्या रीतिरिवाजांचें वावडें दिसलें. जेवणाच्या खोलींत कांहीं कामगार मंडळी नेकटाय न घालतांच जेवावयास येत. सर्वसाधारणपणें सुधारलेल्या देशांतील कोणतेच रीतिरिवाज येथें पाळलेले मला दिसले नाहींत. वाढणाऱ्या सेविका मात्र भाषा येत नव्हती तरी मोठ्या हंसतमुखानें आमची जेवढी विचारपूस करतां येईल तेवढी करीत व प्रत्येक पदार्थ आणून ठेविला कीं, त्यांचें नांव सांगत. त्याची खूण म्हणून डोक्यावर मधोमध एक रिबन बांधली होती. मद्यप्राशन हें

अशा मोठ्या हॉटेलांतून बऱ्याच मोठ्या प्रमाणांत चालतें. तेथें रशियन पद्धतीची व्होडकाच मिळते असें नाहीं, तर ब्रॅन्डी, रेड वाइन, बियर वगैरे युरोपांतील मद्याचे नाना प्रकार रशियांत मोठ्या हौसेनें पाहुण्यांपुढें ठेवले जातात, पण अतिशय घेतल्यामुळें झिंगलेला रशियन मात्र माझ्या पाहण्यांत येथें आला नाहीं. योग्य प्रमाणांत मद्य घेणें हें रशियन कुटुंबांतील एक आवश्यक बाब असते. तेथील थंड हवेला तें मानवत असावें असें एकूण परिस्थितीवरून वाटतें.

आम्ही गेलों तो महिना ऑगस्ट होता. साडेचारच्या सुमारास चांगलेंच उजाडलें म्हणून मी बाहेर पाहूं लागलों, तों धुक्यासारख्या पडणाऱ्या पावसानें रस्ते ओलेचिंब केले होते व त्यांतच जाड काळे कोट घातलेल्या महिला, पाण्यांचे फवारे होजपाइपनें सोडून रस्ते साफ करीत होत्या. त्या गारठ्यांत फारच तत्परतेनें आपल्या घरासमोरील रस्ते धूत होत्या. फूटपाथ-वरील फुललेल्या लालबुंद कुंड्यांना त्या पाणी सोडीत. या म्युनिसिपालिटीच्या नोकर असतील का अशी शंका माझ्या मनांत आली. पण तपास करतां नगरपालिकेशीं यांचा कांहीं संबंध नसतो असें कळलें. मॉस्कोंतीलच काय पण रशियांतील कोणत्याहि मोठ्या शहरांतील घरांची मालकी सरकारकडे असते आणि प्रत्येक घरावर लक्ष ठेवण्यासाठीं व तेथील व्यवस्था ठेवण्यासाठीं एक पगारी गव्हर्नेस–व्यवस्थापिका असते. हिचें काम घराभोंवतालचे व घरांतील स्वच्छता राखणें हें असतें, व तिनें तें काम नियमित न केल्यास ज्याप्रमाणें घरमालकावर खटले भरले जातात तसें या गव्हर्नेसवर पण खटले भरले जात असतात, याच गव्हर्नेसेस अशी पहांटेची वेळ झाली कीं, आपल्या घरासमोरील फूटपाथ व जवळजवळ १५-२० फूट रस्ता धुऊन काढीत असतात, यांतून ती कधींहि सुटूं शकत नाहीं. गांवीं अगर रजेवर गेल्यास तिला आपल्या कामाची व्यवस्था पगारी बाई ठेवून करावी लागते. पण याबाबत टाळाटाळ करून चालत नाहीं. कारण मॉस्को सोव्हिएटच्या ( नगरपालिकेचे ) माणसाची यावर मोठी कडक नजर असते. रहदारी सुरू होण्याच्या आंत म्हणजे सहा वाजण्यापूर्वी ही साफसफाई पुरी व्हावी लागते, हें यांतलें वैशिष्ट्य आहे. या रस्त्यावर होजपाईपनें पाणी मारणाऱ्या बायांनीं गमबुटासारखे गुडघ्यापर्यंत पायांत घातलेले बूट चढविलेलें

असतात व थंडीचा मोठा कोट घालून सारखें पाणी उडवून त्या रस्ते साफ करीत असतात. रस्ते झाडण्याची प्रथा मॉस्कोसारख्या शहरांत नाहीं. १५० ते २०० फूट रुंदीचे रस्ते साध्या केरसुणीनें झाडणें कठीण आहे. त्यासाठीं केर वाहून नेणाऱ्या पंखे असलेल्या मोटारी रस्त्यावरून फिरविल्या जातात. व या मोटारी थोड्याथोड्या वेळानें सारख्याच रस्त्यावरून फिरविल्या जात असल्यामुळें मॉस्कोचे रस्ते मोठे स्वच्छ दिसतात. रस्त्यांच्या कडेला फुलांचीं झाडें लावणें हा तर एक मोठा महत्त्वाचा कार्यक्रम मॉस्कोंत आहे. या झाडांना पाणी नियमित घातलें जावें म्हणून मोटारी फिरत असतात. त्यांच्यामध्यें फवाऱ्याची अशी योजना असते कीं, ड्रायव्हरनें बटन दाबलें कीं, मोटारच्या पाण्याच्या टाकींतून एक झारीसारखा हात बाहेर पडतो व तो झाडावर पाणी शिंपडतो. ही पाणी शिंपडणारी मोटार पाहिली कीं, रशियानें यांत्रिक साधनांचा आपल्या नेहमींच्या व्यवहारांत किती पुरेपूर उपयोग करून घेतला आहे, याची कल्पना येते. ऑगस्टमध्यें रस्त्यावर पाणी शिंपडणाऱ्या बायांचें काम हिंवाळ्यांत चांगलेंच वाढतें व भर बर्फांत बर्फ दूर करण्याचें काम त्यांना करावें लागतें. या वेळीं मात्र त्यांचें हाल फार होतात असें सांगण्यांत आलें.

ऑगस्ट महिन्यांत जवळ जवळ १६ तासांचा दिवस ( उजेड ) मॉस्कोंत असतो, त्यामुळें त्याचा पुरेपूर उपयोग करून आम्ही मॉस्को शहर जेवढें पाहतां येईल तेवढें पाहिलें. दिवस कितीहि मोठा अगर लहान झाला तरी मॉस्कोच्या नोकरवर्गाच्या कामाच्या वेळा मात्र कधींच बदलत नाहींत. सकाळीं ८ वाजले कीं, कामाला लागावें. १२ वाजतां जेवणाची सुटी व पुन्हां १ ते ५ काम, असें काम प्रत्येक व्यक्तीला हें करावेंच लागतें. मग तो बँकेंतला नोकर असो अगर पत्रकार असो, त्याच्याकडून ८ तास काम घेण्याचा राष्ट्राला हक्क आहे, अशीच भावना त्याच्यामध्यें आहे. सहा दिवसांच्या कामानंतर सातवा दिवस पूर्ण सुटी व त्याच्या आदल्या दिवशीं चार तास काम हा कामाचा शिरस्ता असतो. मे-दिन व रशियन क्रांतीचा जन्मदिन या वर्षांतून अवघ्या दोन सुट्या व वर्षाच्या शेवटच्या आठवड्यांत सात दिवस मोठी सुट्टी हा सर्व कचेऱ्यांचा कार्यक्रम. यामुळें १८ वर्षांवरील कोणतीहि व्यक्ति रशियांत वर्षांतून १० दिवसांपेक्षां मोकळी

नसते. पण हे दहा दिवस मात्र रशियन कुटुंबें एवढे आनंदांत घालवितात कीं, त्या वेळीं त्यांच्या आनंदाला पारावार नसतो व आपले वर्षांतील एवढेच मजा करावयाचे दिवस असे ते मानीत असतात. यामुळें सुट्टी व काम यासंबंधींच्या त्यांच्या कल्पना अगदीं एका चाकोरींतून गेल्यासारख्या वाटतात. एका रशियन सर्वसाधारण नागरिकाशीं बोलत असतां त्यानें आपली रशियन जीवनाची कल्पना खालील शब्दांत मांडली. तो म्हणाला,

आमच्याकडे स्वस्थ बसून कोणी खाऊं म्हणेल तर त्याला जगणें कठीण होईल. कारण भोंवतालीं त्याच्याप्रमाणें वेळ काढणारी एकहि व्यक्ति त्याला आढळणार नाहीं. आमच्याकडील मुलेंहि वाटेल तेव्हां खेळत बसलेलीं दिसणार नाहींत. लहानपणापासून ठराविक वेळीं शाळेंत जाणें, ठराविक वेळीं अभ्यास करणें व ठराविक वेळींच खेळणें एवढें त्यांच्या हाडींमांशीं खिळलेलें असतें कीं, कामांतील वक्तशीरपणा त्यांच्या अंगी लहानपणापासून भिनतो व याचमुळें रशियन कारखान्यांना इतक्या थोड्या काळांत एवढी प्रगति करणें शक्य झाले आहे. ''

मी ज्या 'पेकिंग' हॉटेलमध्यें उतरलों होतों, तेथें बहुतेक प्रवासी परकीय होते. सर्वांनाच लवकर उठून चहा घेण्याची संवय, पण कोणालाहि सकाळीं उठल्याबरोबर चहा मिळत नसे. रशियांत सर्वसाधारण कुटुंबांत चहा घेण्याची पद्धत नाहीं. ते झोंपतांना फार तर कॉफी घेतात. दूध घालून चहा व कॉफी तर कधींच घेतली जात नाहीं. कॉफींत सुद्धां लिंबाची फोड टाकण्याची प्रथा रशियांत आहे. कॉफी अगर चहांत आपण दूध टाकून घेतों ही कल्पना रशियनांना आम्ही गेलों त्या वेळीं नव्हती. ती आम्हांला त्यांना द्यावी लागली. आपल्या पाहुण्यांना काय लागतें, त्याच्या आवडीनिवडी काय आहेत त्या जाणून घेण्यांत रशियन महिला मोठ्या कुशल असतात. हॉटेलमधील तयार केलेला एकादा जिन्नस भारतीय हॉटेलांत एकाद्या पाहुण्याला आवडला नाहीं तर तुम्हांला वाढणारा वाढपी अगर वेटर कधीं दुःखी-कष्टी झालेला दिसणार नाहीं. पण रशियन हॉटेलांतील मुलगी तिनें आणलेली एकादी वस्तु तुम्हांला नको म्हणून

तुम्ही नाकारली, तर तुम्हांला खरोखरच हा पदार्थ आवडला नाहीं का ? दुसरें काय आणूं सांगा, असें मोठ्या आपलेपणानें विचारील. हिंदी गृहिणीच्या अंगीं जो आतिथ्यशीलपणा आढळतो तोच आतिथ्यशीलपणा रशियन हॉटेलांत काम करणाऱ्या रशियन मुलींच्या ठिकाणीं आम्हांला आढळला. आपण करीत असलेल्या व्यवसायाशीं त्या इतक्या एकरूप झालेल्या आढळतील कीं त्यांना घर आणि दार यांत फरक करावासा वाटणार नाहीं. पेकिंग हॉटेलमध्यें मला ही गोष्ट प्रथम नजरेस आली. रशियांत सकाळीं चहा घेण्याची प्रथा नाहीं, तरी पण आपल्या हिंदी पाहुण्यांना सकाळीं चहा लागतो हें त्यांच्या नजरेस येतांच दुसऱ्या दिवसापासून साडसहा-च्या सुमारास ग्लासमधून चहा घेऊन येणारी रशियन मुलगी रोज आमचें दार ठोठावूं लागली. त्या वेळीं मात्र परकीय पाहुण्यांशीं केवढ्या आस्थेनें या मुली वागतात याची कल्पना आम्हांला आली. त्यांना भारताविषयीं अनेक गोष्टी ऐकाव्याशा वाटत, पण भाषेचें माध्यम एक नसल्यामुळें त्यांना आम्ही बोललेलें कळत नसे. तुमच्याकडून कोणतीहि गोष्ट बक्षीस मिळाली तर ती परत कशी करावी याची त्यांना खंत लागलेली दिसे. आमच्यापैकीं कांहींनीं बांगड्या, लहान लहान स्फटिकाचे ताजमहाल रशियांत भेट देण्यासाठीं नेले होते. ते या मुलींना ते देऊं लागले कीं, त्यांच्याजवळची सिगारेटची पेटी 'माझी आठवण म्हणून तुम्ही जवळ ठेवा' असा त्या आग्रह करीत. कधीं तर गळ्यांतली नकली मोत्याची माळ काढून 'तुमच्या पत्नीला ही चांगली दिसेल, घेऊन जा' म्हणून त्या, तुम्हांला ती नेण्याचा आग्रह करतील, तर इंग्रजी पद्धतीनें चुंबनाचीहि मागणी करतील. रशियन मुलांमुलींतील हा लाघवीपणा सर्वसाधारणपणें सर्वत्र आढळतो. भारतीयां-विषयीं त्यांना प्रेम वाटतें. पण त्यांचेशीं मोकळेपणानें वागण्याइतकी भाषेचा मोकळेपणा या दोन्ही राष्ट्रांत आलेला नाहीं. हिंदी मैत्रीच्या या मुलें-मुली भोक्त्या आहेत. युरोपांतील कोणत्याहि राष्ट्रांपेक्षां या राष्ट्रांत हिंदी नागरिकांना अधिक मान आहे, ही गोष्ट मात्र प्रथमदर्शनींच येथें प्रत्ययास येते.

रशिया आणि तेथील कौटुंबिक जीवन हा एक सर्व जगाच्या औत्सुक्याचा झालेला विषय आहे. क्रान्तीनंतर बदललेल्या रशियांत प्रवेश करणारे प्रवासी फारच थोडे असल्यामुळें, तेथील अमेरिकन व ब्रिटिश लेखकांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें, सत्य परिस्थितीची निदर्शक आहेत असें वाटत नाहीं. मॉस्को व रशियांतील एकूण जीवनाविषयीं तेथें राहिलेल्या मंडळींनीं जे कांहीं विचार माझ्याजवळ प्रगट केले त्यांवरून पाहतां ब्रिटिश व अमेरिकन लेखकांनीं जें कांहीं आजपर्यंत सांगितलें त्याचें सार सर्वसाधारण असें आहे कीं कम्युनिस्ट रशिया विवाहबंधन फारसें मानीत नाहीं. विवाहोत्सुक मुलांमुलींचें वर्तन कांहींसें स्वैर असतें, अशीच रशियन कौटुंबिक जीवनाविषयींची कल्पना आहे, पण तेथील सामाजिक कायदे व घटस्फोटाचे कोर्टांतील खटले वाचलेल्याला आणि रशियन कौटुंबिक जीवन पाहिलेल्यांना तेथील जीवन इतर राष्ट्रांतील जीवनापेक्षां फारसें निराळें आहे असें वाटत नाहीं आणि इंग्रजी पुस्तकांतून दिलेली माहिती चुकीची आहे, हें ध्यानांत येतें.

रशियन महिला ही एक राष्ट्राचा महत्त्वाचा घटक समजली जाते. मुलांप्रमाणेंच लहानपणापासून तिचें शिक्षण झालेलें असल्यामुळें तिच्यामध्यें पुरुषांपेक्षां आपण कांहीं वेगळें आहोंत, राष्ट्राच्या उन्नतीच्या दिशेनें आपली जबाबदारी कांहीं कमी आहे असें तिला वाटत नाहीं. वयाच्या अडीच वर्षांपासून ती मुलांबरोबरच एकाच शाळेंत शिकलेली असते व मोठेपणीं मुलगे जे व्यवसाय करीत असतात तेच व्यवसाय ती करीत असते, एवढेंच नव्हे तर सर्वसाधारणपणें राष्ट्राच्या कित्येक उद्योगधंद्यांतील क्षेत्रें तिनें आपल्या हातीं घेतलेलीं आहेत स्टेशनवर उतरलें कीं, स्टेशन-मास्तर, रेल्वेगार्ड, तिकीट-कलेक्टर वगैरे सर्व कामें महिला करतांना दिसतील, रस्त्यावरील बसेस् त्या चालवितांना आढळतील, तर हॉटेलें व

दुकानांतील परिचारिका मुलीच असतील. स्टेशनवर सामान वाहून नेणारा हमाल सोडला तर जमिनीवरील अगर जमिनीखालील रेल्वेंतील नोकर रशियांत सर्वत्र स्त्रियाच आढळतील. इमारतीवरील बांधकामावर पुरुषाच्या खालोखाल महिला काम करतांना दिसतील. हें काम इतर राष्ट्रांत स्त्रिया करतांना दिसत नाहींत. एवढें करूनहि घरांतील माता म्हणून आपलें कर्तव्य पार पाडण्याच्या बाबतींत रशियन महिलेचें पाऊल कोठेंहि कमी पडलेलें नाहीं. सर्वसाधारणपणें रशियांतील ९८ टक्के स्त्रिया नोकरी करतात. तरी दर वर्षीं रशियन लोकसंख्या तीन लक्षांनीं वाढत आहे व देशाच्या प्रगतीला आवश्यक असणारी प्रजा या माता निर्माण करीत आहेत. त्यांचें काम या कर्तव्याच्या आड येतें म्हणून संततिनियमन करून चालत नाहीं. उलट जास्त संतति असणाऱ्या स्त्रियांना बक्षिसें देण्याचा प्रघात रशियांत आहे. १९५५ पर्यंत रशियांतील ४५००००० मातांना पांचांच्यावर मुलें झाल्यामुळें बक्षिसें मिळालीं आहेत. यावरून रशियन लोक आपल्या लोकसंख्येच्या वाढीला किती महत्त्व देतात याची कल्पना येण्यासारखी आहे. सर्वसाधारणपणें रशियन धोरण अशा तऱ्हेनें मुलांच्या जन्माला पोषक असलें तरी तेथील महिलेला आपणाला फार मुलें व्हावीं असें मात्र वाटत नाहीं. ज्या ज्या रशियन कुटुंबांत मी गेलों त्या त्या ठिकाणीं मुलांची संख्या दोन किंवा तीनच मला दिसली. याबाबत कांहीं कुटुंबियांशीं मला मोकळेपणानें बोलण्याची संधि मिळाल्यावरून असें वाटतें कीं, रशियन कायदे एवढे विचित्र आहेत कीं मुलांची जबाबदारी मातापित्यांवर फार मोठी असते. रशियांत प्रत्येक जन्मास येणाऱ्या मुलाला मातापित्यांनीं नीट वाढविलें पाहिजे, त्याचें शिक्षण, दुपारचें खाणेंपिणें, याची व्यवस्था सरकार करते, पण त्याची वाढ नीट व्हावी म्हणून त्याला जन्म देणाऱ्या मातापित्यांवरहि कांहीं दंडक घालण्यांत आले आहेत. कोणत्याहि मुलाला मातापिता नीट वागवीत नाहींत असा अर्ज कोणीहि केला तरी कोर्टातर्फे कायद्यानुसार त्याची चौकशी होऊं शकते व पतिपत्नीच्या उत्पन्नापैकीं ठराविक भाग मुलावर खर्च झाला पाहिजे, असें निर्बंध माता-पित्यांवर कोर्ट घालूं शकते. ज्या वेळीं रशियन पतिपत्नीला एक मूल होतें त्या वेळीं त्यांच्या उत्पन्नाचा एकचतुर्थांश भाग त्यांना त्याच्यावर खर्च

करावा लागतोच. दोन मुलें झालीं कीं, एकतृतीयांश भाग त्यांनीं त्यांच्यासाठीं दिलाच पाहिजे व तीन अगर तिनांपेक्षां जास्त मुलें झालीं कीं, त्यांच्यासाठीं त्यांना आपल्या उत्पन्नाचा अर्धा भाग खर्च करावा लागतो. यामुळें वैयक्तिक सुखांत बिघाड होऊं नये म्हणून बरींचशीं रशियन कुटुंबें एकदोन मुलांतच समाधान मानणारीं आहेत. ही भावना वाढीला लागूं नये म्हणून पांच अगर दहा मुलांच्या आईला बक्षिसें देण्याची प्रथा तेथील राज्यकर्त्यांनीं पाडली आहे.

आज राशियासारख्या जगांतील सर्वांत मोठ्या देशाला २० कोटी लोकसंख्या पुरेशी नाहीं. त्याची प्रगति व्हावयाची म्हणजे वाढणारी कारखानदारी चालविण्यास राशियाला माणसांची गरज आहे व ती मिळविण्यासाठीं रशियन नेते सारखे धडपडत आहेत. कम्युनिस्ट मतप्रणालीचा विचार केलेला चीनसारखा देश रशियाला इतका जवळचा वाटतो कीं, तेथील कित्येक चिनी तरुण रशियांत कारखान्यांतून काम करतांना मला दिसले. त्यांच्यापैकीं कित्येकजण आज काम शिकण्यासाठीं आले आहेत असें सांगण्यांत येतें, परंतु त्यांची दरवर्षी वाढणारी संख्या पाहिली कीं, हे जास्त लोक चीनची बेकारी कमी करण्यासाठीं येथें आले आहेत किंवा काय अशी शंका मनांत येते. आज कित्येक चिनी तरुणांशीं रशियन मुलींनीं लग्नें लाविलीं आहेत. त्यांच्या हातांत हात घालून रशियन मुली फिरतांना पाहिल्या कीं, कम्युनिस्ट विचाराची ही तरुण पिढी एकत्रित आली कीं, मध्ययुरोपांतून पॅसिफिकच्या किनाऱ्यापर्यंत दोन खंडांतील एक मोठा पट्टा या नव्या विचारप्रणालीनें सलग करण्याचा डाव यामागें रशियानें आंखला आहे किंवा काय अशी शंका मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. मॉस्को शहरांत मुलींची संख्या दहांत निदान सहा असते. मुलगे कमी आहेत. या परिस्थितींत परिकीयांचें स्वागत या मुलींकडून विशेष होते व त्यांतच चीनसारखा मित्रदेश त्यांना अधिक जवळचा वाटतो. या राष्ट्रीय प्रणयामागें राजकीय तत्त्वज्ञानाबरोबर आपले सामाजिक प्रश्न सोडविण्याची मोहीमहि रशियानें अंगीकारली असावी किंवा काय अशी शंका मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. एवढें निश्चित कीं, परकीयांशीं लग्न लावावयास निघालेल्या मुलींना देश संपूर्ण मान्यता देतो. रशियन मुलगी अगर मुलगा १४ वर्षांचा होई-

पर्यंत त्याच्या वाढीची काळजी फारच घेतली जात असल्यामुळें मुलाचें अगर मुलीचें जीवन मोठें शिस्तपूर्ण असतें. चांगला नागरिक व देशोपयोगी कार्यकर्ता होण्यासाठीं, शाळांतून काळजी घेतली जाते. सतरा वर्षांपर्यंत त्यांच्या मनाची घडणच अशी केली जाते, कीं या शिकलेल्या धंद्यांतूनच तो आपलें जीवन शोधूं शकतो व कर्तासवरता नागरिक म्हणून जगापुढें येऊं लागतो.

साधारणपणें रशियन स्त्रीच्या स्वत:विषयींच्या कल्पना कधींहि "चूल व मूल" या क्षेत्रापुरत्या मर्यादित नसतात. मुलगाहि जन्मास आल्यानंतर तो कोण होणार याविषयीं माता-पिता कधींहि अंदाज बांधीत असतील असें वाटत नाहीं. तो सहा महिन्यांपासून बालसंगोपनगृहांत वाढतो, कारण त्याच्या मातापित्याला जीवन जगण्यासाठीं दिवसांतले १० तास तरी बाहेर काढावे लागतात व त्यानंतर बालसंगोपनगृहांतून त्याला आणून हीं पतिपत्नी आपलें कौटुंबिक जीवन कंठीत असतात. एखाद्या छोट्याशा बाबागाडींत घालून मुलाला घराशेजारच्या पार्कमध्यें न्यावें व तेथेंच आपल्या या लहानग्याच्या लीला पाहात पतिपत्नींनीं बाकावर बसावें, असा सर्वसाधारण कुटुंबाचा कार्यक्रम असतो. एखाद्या क्लबांत जाऊन तेथें एकट्यापुरती अगर उभयतांनीं मजा मारतांना रशियांतील मातापिता फारशीं दिसत नाहींत. त्यांचीं मुलें जरी त्यांच्यापासून बराच काल वेगळीं राहात असलीं तरी सर्वसाधारण मातापित्याइतकेंच त्यांचें प्रेम आपल्या मुलांवर असतें. मुलेंहि त्यांना इतर मातांसारखीं चिकटलेलीं असतात. बालसंगोपनगृहांत अगर कारखान्यांतील बालगृहांत असणारी परिचारिका मुलांच्या संगोपन-शास्त्राची नीट अभ्यास केलेली असल्यामुळें मुलांविषयीं मातांना कधींच काळजी वाटत नाहीं. आपल्या देशानें त्यांच्या संगोपनाची नीट काळजी घेतलेली आहे याच आत्मविश्वासानें रशियन महिला आपल्या मुलाच्या आयुष्याकडे पाहात असते. एखाद्या बालगृहांत मुलाला नीट वागविलें जात नसेल तर ताबडतोब तक्रारी होतात.


रशियन स्त्री-पुरुषांच्या विवाहविषयक भावनाहि एका विशिष्ट तत्त्वावर आधारलेल्या आहेत. युवक व युवती विवाह-बंधनानें एकत्रित येण्यानें आपलें

व्यक्तिस्वातंत्र्य कोणत्याहि प्रकारें गमावीत नाहींत. त्यांचें लग्न फक्त ठराविक रशियन पद्धतीनें रजिस्टर होऊं शकतें. रशियन पत्नी विवाहानंतर पतीच्या घराण्याचें नांव लावतेच असें नाहीं. महिलांना नांव बदलावें लागत नाहीं. एवढेंच नव्हे तर आपलें जुनें नांव कायम ठेवण्याची त्यांना पूर्णपणें मुभा असते व त्यानुसार रशियन गृहिणी आपलें नांव कधींहि बदलत नाहीं. मुलाला कोणतें नांव द्यावें हाहि प्रश्न कायद्याच्या कक्षेनें बांधून ठेवलेला नाहीं. मुलगा अगर मुलगी आईच्या कुटुंबाचीं आडनांवें लावूं शकतात अगर दोघा पति-पत्नींच्या संमतीनें वडिलांच्या कुटुंबाचें नांव मुलें लावतात. साधारणपणें विवाहबंधनाव्यतिरिक्त झालेलीं मुलें मातेचीं नांवें लावतात व माता तेवढ्याच प्रेमानें त्यांचें संगोपन करते. राष्ट्र त्यांच्या शिक्षणाची व पालनपोषणाची काळजी घेते. विवाहबाह्य संतति म्हणून इतर मुलांपेक्षां तीं बाजूला पडत नाहींत. इतर मुलांइतक्याच मानसन्मानानें तीं वाढतात व माता तेवढ्याच अभिमानानें त्यांचें पालनपोषण करूं शकते. आज सोव्हिएट सरकार चर्चमध्यें होणारीं लग्नें कायदेशीर मानीत नसलें तरी चर्चवरील सर्वच नागरिकांचा विश्वास मात्र उडालेला नाहीं. खेड्यांतून लग्न रजिस्टर करणारी कित्येक शेतकरी पति-पत्नी पुन्हां चर्चमध्यें जाऊन धर्मोपदेशकापुढें शपथ घेतांना दिसतात. यावरून रशियांतून चर्चचें समूळ उच्चाटन झालेलें आहे असें मानतां येत नाहीं. रजिस्ट्रारपुढें विवाह नोंदतांना वधूवरांनीं घ्यावयाच्या शपथेंत एक गोष्ट स्पष्ट करण्यांत येते कीं, आम्ही एकमेकांच्या स्वातंत्र्यावर कधींच घाला घालणार नाहीं व ही शपथ घेतांना कोणतीहि गोष्ट मध्यें आली तरी ती बाजूला सारावयास रशियन पत्नी तयार असते. कायद्यानें तिचें लग्न लावलें असलें तरी तिनें पतीच्या घरीं जाऊन राहावें असें नाहीं. पण ही सवड असली तरी ९९ टक्के पतिपत्नी एकत्रित राहूनच संसार करतात. बाजूला राहणारी पतिपत्नी नोकरीमुळें बाजूला राहिलेलीं असतात, पण सर्वसाधारणपणें एकत्रित राहून कौटुंबिक जीवन कंठण्यांत पतिपत्नींना नेहमीं आनंद वाटतो. कायद्यानें त्यांना कोणतीहि परवानगी दिली असली तरी ती सर्वसाधारण स्त्रीप्रमाणें पतीवर प्रेम करून त्याच्या घरीं ती राहात असते. सोव्हिएट कायद्यानुसार विवाहाचें वय १८ वर्षें आहे. दोन्ही लग्न करणाऱ्या व्यक्तींचें

वय या वयोमर्यादेच्या वरती असलें पाहिजे असा दंडक आहे. या नियमांत प्रांतिक परिस्थितीनुसार फेरबदल करण्याची मुभा ठेवण्यांत आली आहे. ट्रान्सकॉकेशियांत १५ वर्षांचा मुलगा व १३ वर्षांची मुलगी असेल तर लग्नाला परवानगी मिळते. पूर्व सैबेरियांतील वर १६ वर्षांचा व वधू १४ वर्षांच्या वर असली कीं, विवाहास परवानगी दिली जाते. रशियांतील वधूवरांत एकदोन वर्षांपेक्षां जास्त अंतर असलेलें दिसत नाहीं. साधारणपणें समव्यवसायी मंडळी विवाह लावतांना दिसतात. कधींकधीं वधूचें वय वरापेक्षांहि अधिक असल्याचेंहि आढळून येतें. पण या गोष्टी अपवादात्मक म्हणूनच गणाव्या लागतील.

सर्वसाधारण रशियन कुटुंबांत दोन अगर तीन मुलें व पतिपत्नी एवढाच संसाराचा पसारा असतो. कामगारापासून तों मंत्र्यापर्यंत सर्व थरांतील मंडळींची राहण्याची जागा व वागण्याची पद्धति यांत आपल्याकडील पद्धतीप्रमाणें जमीन-अस्मानाचें अंतर तर कधींच नसतें. मंत्री अगर मुख्य मंत्री आपल्या कचेरीच्या शेजारच्या एकाद्या तीन किंवा चार खोल्यांच्या ब्लॉकमध्यें राहतांना मला दिसले. त्यांच्याकडील सामानसुमान आपल्या मलबार हीलवरील मंत्र्याच्या बंगल्यांतील सामानाइतकें किंमतवान् तर निश्चित नव्हतें. कोणताहि पाहुणा आला कीं, त्याचें स्वागत त्यांचा खाजगी चिटणीस करतो व आपल्या खोलींत घेऊन जातो. तेथें सोफासेट अगर गाद्यागिरद्यांच्या कोचावर बसून गप्पा मारण्याचें भाग्य मला कधींहि लाभलें नाहीं. एका वर्तुळाकार टेबलाभोंवतीं बसून आम्हां १० संपादकांसमवेत मंत्री नेहमीं बोलत. प्रत्येकाचा स्वतंत्र दुभाष्या नव्हता, तर आमच्याबरोबर असलेला बोरीस नांवाचा विद्यार्थी या ठिकाणीं दुभाष्याचें काम करी व आम्हांला काय सांगावयाचें ते मंत्री सांगून टाकीत.

सर्वसाधारणपणें मंत्री युरोपियन पद्धतीचा पोषाख घालीत, पण त्यांच्या कचेरींतील सहकारी अशाच पद्धतीचे कपडे घातलेले असत, असें नाहीं. रशियांतील हवामानाला साजेसे गरम सूट त्यांच्या अंगावर असत. पण त्यांच्यामध्यें युरोपियन पद्धतींत नेहमीं आढळणारा ‘ झोकनोक ’ मात्र नसे. ताशकंदपासून लेनिनग्राडपर्यंतच्या हजार-बाराशें मैलांचा प्रवास मीं रशियांत केला, पण ह्या पट्ट्यांतील तरुण रशियन मुलींतहि युरोपियन स्त्रियांप्रमाणें



मॉस्कोचें विहंगम दृश्य.

२५७०२१ ... २८ ... १८-१-५८

झोकनोकाची आवड मला आढळली नाहीं. नीटनेटकेपणा मात्र त्यांच्यामध्यें आढळतो. मॉस्कोच्या बाजारांत हिंडतांना रंगीबेरंगी झगे घालून सर्वसाधारण रशियन गृहिणी हिंडतांना मला दिसत, पण पॅरिस अगर लंडनच्या अगदीं अलीकडील फॅशन्स उचलून आपल्या देहाचें जास्तींत जास्त प्रदर्शन करतांना मला रशियन मुली कधींहि दिसल्या नाहींत. मॉस्को युनिव्हर्सिटीसारख्या तरुण-तरुणींच्या संमिश्र समूहांत मला अनेक वेषभूषा अगर केशभूषा करणाऱ्या मुली दिसल्या, पण त्यांच्यामध्यें युरोपांत आजकाल दिणारा भडकपणा कोठेंच दिसला नाहीं. एम्. ए. चा अभ्यास करणाऱ्या दोन मुली तर आमच्या दुभाषा म्हणून काम करीत. त्या दिवसांतील १४–१५ तास आमच्याबरोबर असत, पण त्यांची शालीनता, बोलण्याची विनयशील पद्धति भारतीय मुलींपेक्षां मला फारशी निराळी वाटली नाहीं. युरोपांतील मुलींपेक्षां या मुली जास्त जबाबदार वाटल्या. रशियांतील महिलावर्गाला कायद्यानें मिळालेलें स्वातंत्र्य लक्षांत घेतां महिलांतून आढळणारी ही शालीनता मोठी आश्चर्यजनक वाटली. ब्रिटिश व अमेरिकन ग्रंथकारांच्या ग्रंथांतून रशियन मुलींचें जें चित्र दाखविण्यांत आलें आहे, त्यापेक्षां फार निराळी परिस्थिति या वेळीं प्रत्यक्ष दिसली.

आज रशियन महिलेला व पुरुषाला एकमेकांशीं पटलें नाहीं तर घटस्फोट घेण्याची मुभा कायद्यानें ठेविलेली आहे, पण हा घटस्फोट देतांना किती कांटेतोलपणें या प्रश्नाकडे रशियन कोर्टें पाहात असतात याची कल्पना रशियन कोर्टांतील खालील कांहीं खटल्यांवरून येण्यासारखी आहे. हे खटले मी कोर्टांत बसून ऐकले आहेत :

एका विधवेनें लग्न लावल्यानंतर तिच्या पहिल्या पतीपासून झालेला मुलगा आपल्या घरीं आणला. या मुलाला आपला नवा पति नीट वागवीत नाहीं म्हणून तिनें घटस्फोटाची मागणी केली होती. पण कोर्टानें आसपास राहणाऱ्या कांहीं स्त्री-पुरुषांना साक्षीसाठीं बोलावून हा आरोप खरा आहे किंवा काय याची पाहणी केली तेव्हां तो खोटा असल्याचें सांगण्यांत आलें व पतीनेंहि आपण वाईट वागत नाहीं असें सांगितलें. बाईला घटस्फोट

नाकारण्यांत आला. या वेळीं कोर्टाची आज्ञा मानून ही पतिपत्नी हातांत हात घालून बाहेर पडलीं.

पतीची दुसऱ्या ठिकाणीं बदली होऊन तो दुसऱ्या गांवीं गेला म्हणून एका पत्नीनें घटस्फोटाची फिर्याद लाविली होती. पण कोर्टानें तिला घटस्फोटास नकार दिला. तिला दोन मुलें झालीं होतीं व बदली हें घटस्फोटाचें कारण होऊं शकत नाहीं असें सांगण्यांत आलें.

आणखी एका खटल्यांत आपल्या पत्नीनें शिक्षिकेची नोकरी करूं नये व घर सांभाळावें अशी पतीची इच्छा होती, पण ती पत्नीनें मान्य न करतां आपलें नोकरी करण्याचें स्वतंत्र्य कायम टिकविल्यामुळें पतीनें घटस्फोटाचा अर्ज दिला, पण तो अमान्य करण्यांत आला व यामागें आणखी कांहीं तरी मतभेदाचे मुद्दे आहेत कीं काय त्याचा तपास करावा असा सल्ला पोलिसांना देण्यांत आला.

वरील उदाहरणांवरून वाटेल तशा साध्या कारणावरून रशियांत घटस्फोट मिळतो ही कल्पना चुकीची आहे. तेथेंहि कौटुंबिक स्वास्थ्य टिकविण्याचे प्रयत्न होतात व त्याला कायद्याचा संपूर्ण पाठिंबा आहे.

बालांपासून वृद्धांपर्यंत कोणाचेहि हाल होऊं नयेत, जेवणाची त्यांना पंचाईत पडूं नये म्हणून रशियन कायद्यांत सोय आहे. ज्याप्रमाणें मुलांसाठीं मातेला व पित्याला खर्च करावा लागतो त्याप्रमाणें घरांतील वृद्ध व अपंगांचा खर्च त्यांच्या मुलांना व वेळ प्रसंगीं नातवांना व नातीला करावा लागतो. अशी सोय होणें शक्य नसेल तर मात्र सरकार या वृद्धांची काळजी घेण्यास तयार असतें. सरकारी गृहांत जाऊन अशा वृद्धांना राहतां येतें. मुलाशीं त्यांचें पटत नसलें तर मुलाकडून त्याचा खर्च कायदेशीरपणें घेतला जातो; पण रशियांत जन्मलेला कोणताहि नागरिक आपणाला आधार नाहीं म्हणून भिकारी होऊन हिंडूं शकत नाहीं अगर काम करण्याची शक्ति अंगांत असतां बेकार राहूं शकत नाहीं, हेंच रशियाच्या सामाजिक जीवनाचें वैशिष्ट्य आहे.

## ५ : शिक्षणाला दिलेलें महत्त्व

१९१७ च्या राज्यक्रान्तीनंतर गेल्या चाळीस वर्षांच्या काळांत रशियाची जी प्रगति झाली आहे तिचें मूळ तेथील शिक्षणाच्या विशिष्ट पद्धतींत आहे. ही गोष्ट कोणालाहि मान्य करावी लागेल. मॉस्कोच्या रस्त्यावर अगर रशियन खेड्यांत दिसणारा तरुण विवक्षित शैक्षणिक पातळीचा असतो. आमच्या खेड्यांतील शेतकऱ्याला रशिया हा एक देश आहे हें सांगूनहि कळणार नाहीं. पृथ्वीच्या पाठीवरील त्याचें वैशिष्ट्य सांगण्याची गोष्ट दूरच राहो, पण रशियांत आम्ही कोठेंहि गेलों तरी तेथील सर्वसाधारण लोक आमच्याकडे भारतीय नागरिक म्हणून सांगितलें कीं विशिष्ट औत्सुक्यानें पाहत. त्यांना आम्ही त्यांचे दक्षिणेकडील सरहद्दीजवळील एका मोठ्या देशांतून आलों आहोंत हें ठाऊक असे. नेहरू हा शब्द उच्चारून तें आमचें स्वागत करीत. मॉस्कोच्या थिएटरमधून राजकपूर व नर्गीस यांचे बोलपट लागत असत व हिंदी भाषा जरी अवगत नसे तरी आपल्या चित्रपटांतील गाणीं तेथील कारखान्यांतील विश्रांतिगृहांतून आम्हांला ऐकूं येत. यावरून भारतीयांविषयीं रशियनांना किती माहिती आहे याची कल्पना येण्यासारखी आहे. रशियांतील सर्वसाधारण मनुष्य गेल्या २५–३० वर्षांच्या काळांत एवढा जाणता कसा झाला याची कल्पना रशियन शिक्षण-पद्धतीचा नीट अभ्यास केल्याशिवाय येणार नाहीं.

रशियन क्रान्तीपूर्वीची भारताची व रशियाची स्थिति एकमेकांशीं तुलना करतां एकमेकांपासून फारशी वेगळी नव्हती. जवळ जवळ ७५–८० टक्के जनता निरक्षर होती. पण क्रान्तीनंतरच्या सुधारणांनीं व विशेषतः सक्तीच्या प्राथमिक नव्हे तर दुय्यम शिक्षणामुळें रशियांतील साक्षरता एवढ्या झपाट्यानें वाढत गेली कीं, निरनिराळ्या ५९ भाषांतून दिलें जाणारें दुय्यम शाळेंतील शिक्षण, खेडोंपाडीं संपूर्ण व्यापून राहिलें व नव्या पिढींतील प्रत्येक विद्यार्थी शाळेंत जाऊं लागला. या दुय्यम शाळेंतून २० कोटी

रशियन लोकसंख्येपैकीं ५ कोटी मुलें शिकत आहेत. याच शाळांतील विशिष्ट तांत्रिक शिक्षण घेतलेले ६० लक्ष ५० हजार विद्यार्थी निरनिराळ्या कारखान्यांतून काम करीत आहेत. यावरून रशियन राज्यकर्ते आपणाला हवें तें नेमकें शिक्षण आपल्या तरुण पिढीला देण्यांत कसे वाकबगार आहेत याची कल्पना येते. शाळेचें आवश्यक तें ७ अगर १० वर्षांचें शिक्षण संपविल्या-नंतर तांत्रिक शिक्षण देणाऱ्या ८४ शाळा रशियांत आहेत. व ४१० संशोधनशाळांतून त्यांना नवनवीन प्रयोग करणें शक्य असतें. या शाळांतून पुढें आलेला विद्यार्थी नेमका कोठें पाठवावा, म्हणजे त्याच्या शिक्षणाचें चीज होईल ही गोष्ट जाणणारे तंत्रज्ञ आज रशियाजवळ असल्यामुळें मिळालेल्या शिक्षणाचा मोबदला देशांतील मुलांना नीट मिळूं शकतो. आपल्याकडे बी. एस्सी. झालेला विद्यार्थी जसा कारकुनी करतांना दिसतो अगर कॉमर्सचा अभ्यास केलेला विद्यार्थी जमीन-महसूल खात्यांत कारकून होतो, तसा प्रसंग रशियांत कधींच येत नसल्यामुळें घेतलेल्या शिक्षणाचें चीज होतें व मनुष्य आपल्या आवडीच्या क्षेत्रांत पुढें येऊं शकतो.

रशियन मुलांच्या शिक्षणाची सोय बालपणापासून होत असते. सर्व-साधारणपणें माता बाळंतपणानंतर ६ महिन्यांनंतर कारखान्यांत अगर कचेरींत आपल्या कामाला जाऊं लागतात. या वेळीं तिच्या घरीं मूल सांभाळण्याची सोय नसल्यास ती आपलें मूल कचेरींत असलेल्या बाल-संगोपनगृहांत ठेवूं शकते व तेथेंच आसपासच्या मुलांत शिक्षित सेविकेच्या-बरोबर मुलाचा वेळ जातो. तीं आसपासच्या शिस्तबद्ध वातावरणांत वाढूं लागतात. बरींचशीं मुलें या संगोपनगृहांत ठराविक वेळीं अन्न, ठराविक वेळीं आरोग्य-परीक्षा वगैरे गोष्टींमुळें पद्धतशीरपणें वाढत असतात. मूल अडीच वर्षांचें झालें कीं, त्यांच्या किंडर गार्टन शिक्षणाला सुरुवात होते. या किंडर गार्टन शाळेचें महत्त्व रशियांत फार असून क्रांतीनंतर त्यांची संख्या १५ पटींनीं वाढली आहे. आज या किंडर गार्टन शाळा एकूण ५८,८६३ असून त्यांत एकूण २० लक्ष ७० हजार मुलांची शिकण्याची सोय आहे. यांतील २७२६७ शाळा शेतकऱ्यांसाठीं सामुदायिक शेतीच्या ठिकाणीं चालविल्या असून कारखान्यांच्या वसाहतींतून योग्य तेवढ्या किंडर गार्टन शाळा चालविणें हें कामगाराचें जीवन-विषयक अंग समजलें

जातें. किंडर गार्टन शिक्षण म्हणजे शाळेंत जाण्यापूर्वीचें पूर्वप्राथमिक शिक्षण समजलें जातें. या शाळांचे मुख्य कार्यक्रम म्हणजे मुलांची वाढ योग्य व्हावी म्हणून त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणें, त्यांची बौद्धिक वाढ करण्यासाठीं खटपट करणें, त्यांची मातृभाषा त्याला नीट पद्धतशीरपणें बोलावयास शिकविणें होय. या शाळेंतून बाहेर पडण्याच्या वेळीं त्याला फार तर दहा अंकांपर्यंत आंकडे मोजावयास शिकविले जातात. हाच त्याचा शिक्षणाचा मोठा कार्यक्रम असतो. बाकीचें शिक्षण त्यांच्या सर्व इंद्रियांचें कार्य नीट व्हावें म्हणून असतें.

रशियन शिक्षणांत विशेष काय असेल तर मुलगा अगर मुलगी शिकावयास लागल्यापासून तीं स्वतःच्या पायावर उभीं राहवयास समर्थ होईपर्यंत तिला सरकारच्या खर्चानेंच शिक्षण मिळालें पाहिजे. याबाबत कुटुंबावर कोणतीच आर्थिक जबाबदारी पडत नाहीं. १९५७ सालीं रशियन सरकारनें आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं ७८९० कोटी रुबल्स ( १ रुबल म्हणजे १ रुपया २ आणे ) खर्ची घातले आहेत. एवढा जबर खर्च रशियन सरकार आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठीं करीत असतें.

रशियांत सक्तीनें दुय्यम शिक्षण द्यावयाचा कायदा १४ ऑगस्ट १९३३ रोजीं जारी झाला व त्या वेळेपासून सक्तीनें शिक्षण देणाऱ्या दुय्यम म्हणजे माध्यमिक शाळांत मुलें येऊं लागलीं व त्यांच्यासाठीं नव्या शाळा उघडण्यांत येऊं लागल्या. पहिल्या चार इयत्तांचा एक विभाग व नंतर पांचवी ते सातवी-पर्यंत एक विभाग याप्रमाणें शाळेचें तेथें दोन विभाग पाडलेले असतात. या पहिल्या चार इयत्तांत २ कोटी मुलें शिकण्याची सोय रशियांत आहे. वरच्या वर्गांतून शिकणाऱ्या मुलांमुलींची संख्या ३० लाखांच्यावर नाहीं. म्हणजे हीं मुलें ज्याला आपण वाङ्मयीन अगर वैज्ञानिक शिक्षण म्हणतों तें घेण्याच्या योग्यतेचीं असतात. समाजांत ज्यांना बुद्धिप्रधान कार्य करावयाचें असतें त्यांना आवश्यक असणारें कॉलेजचें शिक्षण घेण्यासाठीं हीं मुलें निवडलेलीं असतात. २ कोटींपैकीं अवघीं ३० लक्ष मुलें या निवडींत पुढें येतात व जवळजवळ १॥ कोटी मुलें आवश्यक तें सार्वजनिक शिक्षण मिळवून तांत्रिक अगर इतर आपल्या आवडीप्रमाणें निरनिराळ्या धंद्यांच्या शिक्षणासाठीं तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या शाळेकडे वळत असतात. चौथ्या इयत्तेपर्यंतच्या

शिक्षणावरून त्या मुलाच्या आवडीची व बुद्धीची परीक्षा रशियन शिक्षकाला होते व त्याचें आयुष्य वाटेल तो अभ्यास करून फुकट जाऊं नये म्हणूनच त्याला आवश्यक तें मार्गदर्शन करून त्याला योग्य तेंच शिक्षण घेणें भाग पाडलें जातें. याबाबत पालक कोणताहि अडथळा आणीत नाहींत व आणल्यास तो चालू दिला जात नाहीं.

सर्वसाधारणपणें चौथ्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण मुलाला त्याच्या गांवीं म्हणजे राहत्या ठिकाणीं मिळूं शकतें. पण त्याची चौथीनंतर ठराविक शिक्षणासाठीं निवड झाल्यानंतर तो जेथें ती सोय असेल तेथें जातो व तेथें कांहीं वेळ त्याला बोर्डिंगमध्यें राहून शिकावें लागतें व त्यासाठीं बऱ्याच शाळांना वसतिगृहें जोडलेलीं असून या शाळांतून तांत्रिक व इतर शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुलांमुलींची संख्या १२,२५,००० आहे. यांना तिकडे 'स्कूल ग्रॅज्युएटस्' मानण्यांत येतें व तेथून तीं निरनिराळे कारखाने व कचेऱ्यांत व्यावहारिक शिक्षणासाठीं जातात. या वेळीं मुलाचें वय साधारणपणें आपल्याकडील एस्. एस्. सी. झालेल्या मुलाइतकें असतें. आपल्या देशाचें व सर्वसाधारण राजकीय परिस्थितीचें परीपूर्ण ज्ञान त्याला या वेळीं होतें. ज्याला कामगार अगर शेतकरीच व्हावयाचें असेल त्याला शिक्षण देण्यासाठींहि रशियांत स्वतंत्र शाळा असून त्यांची संख्या जवळजवळ १६,७४८ आहे. यावरून रशियन शेतकरी अगर कामगार शेतावर अगर कारखान्यांत जातो, तेव्हां तो आपल्या शाळेंत आपले आपल्या व्यवसाया-तील प्राथमिक शास्त्रीय शिक्षण घेऊन जातो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

रशियन क्रांतीनंतर १९१९ सालीं रशियांत एक शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा जाहीरनामा काढण्यांत आला. त्यांत ८ वर्षांपासून ५० वर्षांपर्यंत प्रत्येक रशियन नागरिकाला रशियन भाषेंत लिहितां-वाचतां व बोलतां आलेंच पाहिजे असे निर्बंध घालण्यांत आले. या जाहीरनाम्याला रशियन नागरिकांचा एवढा पाठिंबा मिळाला कीं, साक्षरतेची मोहीम सर्वत्र सुरू झाली. १९२० पासून १९४० पर्यंतच्या काळांत हा साक्षरतेचा प्रसार एवढा जोरांत झाला कीं, १९४० सालीं ९० टक्के रशियन जनता साक्षर झाली होती. यांत ५ कोटी वयांत आलेले नागरिक होते. दुय्यम शाळेंत शिकणाऱ्या मुलांची संख्या जशी वाढत गेली तशी प्रौढांची साक्षरता—मोहीमहि सारखी

सुरू होती. पण याला मोठा धक्का पुन्हां जर्मनीविरुद्ध झालेल्या दुसऱ्या महायुद्धांत बसला. नाझी विमानांच्या बॉंब-हल्ल्यामुळें जवळ जवळ ८२००० शाळागृहें जळून खाक झालीं व १ कोटी ५० लक्ष मुलांचे शिक्षणाचे हाल सुरू झाले. पण या हल्ल्याला रशियन शिक्षकांनीं दाद दिली नाहीं. जेथें जागा मिळेल तेथें मुलें जमवून झाडाखालींहि त्यांच्याकडून शिक्षणक्रम पुरा करून घेत. यानंतरच्या दोन पंचवार्षिक योजनांत शाळागृहांची बांधणी हा एक मोठा कार्यक्रम होता व १९५७ अखेर पडलेल्या ३० हजार शाळा बांधून तयार झाल्या असून त्यांत मुलें पूर्ववत् शिकूं लागलीं आहेत. सहाव्या पंचवार्षिक योजनेंत नव्या नव्या शाळा–बांधणीची संख्या आणखी वाढणार आहे. १९४० पासून रशियानें शिक्षणावरील आपला खर्च वाढवावयास सुरुवात केली; तो २३२ कोटींवरून, १९५७ पर्यंत ७३१ कोटी रुबल्सवर नेण्यांत आला आहे. शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांना आपलीं मुलें पूर्ण काळ शाळेंत पाठवून त्यांच्याकडून शिक्षण करून घेणें शक्य नसतें म्हणून त्यांच्या सोईच्या वेळानुसार त्यांच्या खेड्यांत शाळा भरून आवश्यक शैक्षणिक कार्यक्रम उरकावयाची सोयहि सोव्हिएट सरकारनें खेड्यांखेड्यांतून केली आहे. याचा परिणाम आज असा झाला आहे कीं, रशियाचा कोणत्याहि कोपऱ्यांतल्या खेड्यांतला शेतकरी आपली अडचण सोव्हिएट सरकारच्या मुख्य कचेरीला लिहून कळवूं शकतो. त्यांची लेखन–वाचनाची आवड वाढल्याबरोबर त्यांचें ज्ञान वाढविण्याचे प्रयत्न झाले व त्यामुळें रशियन वृत्तपत्रें खेड्याखेड्यांतून जाऊं लागलीं. राजधानींत होणाऱ्या घडामोडी दूरदूरच्या शेतकऱ्यांना कळूं लागल्या. राजसत्तेचें मत व प्रचार त्यांच्या कानीं पडूं लागला व त्यांची साक्षरता नुसती पुस्तकापुरती न राहतां सर्वसाधारण रशियन नागरिकांची पातळी एवढी वाढली कीं, त्यांतून नवें राष्ट्र उत्पन्न होऊं लागलें. आज त्यांच्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत रशियाच्या सर्वसाधारण नागरिकांचीं बौद्धिक उंची वाढविणें हा एक मोठा कार्यक्रम असून त्यासाठीं पुस्तकें तयार करण्यावरहि सरकारनें फारच पैसा घातलेला आहे. १९१८ पासून १९५५ पर्यंतच्या काळांत रशियांत एकूण १२,६८,००० पुस्तकें निरनिराळ्या विषयांवर लिहिलीं गेलीं असून त्यांच्या १८०० कोटी प्रती छापून निघाल्या आहेत. अत्यंत थोड्या किंमतींत क्वचित् प्रसंगीं फुकट

अशीं वाटण्यांत येणारीं हीं पुस्तकें रशियन नागरिक मोठ्या हौसेनें वाचतात. आतां वर्षाकाठीं निदान ५४००० नवीं पुस्तकें रशियांत प्रसिद्ध होतात. तीं रशियांतील व परदेशी मिळून १२२ भाषांतून प्रसिद्ध होतात व त्यांच्या १०० कोटी प्रती विक्रीसाठीं निघतात व हें सर्व अर्थात् रशियन पद्धतीनुसार सरकार करतें. लोकांना वाचनाची गोडी लागावी म्हणून रशियांत ९५५ सालीं २८ कोटी ७० लक्ष कादंबऱ्या छापण्यांत आल्या. त्यांतील कित्येक जगांतील निरनिराळ्या भाषांतील भाषांतरें आहेत. रशियांत लायब्ऱ्या व वाचनालयांची संख्या २४१००० आहे व त्यांत वाचनासाठीं ठेवण्यांत येणाऱ्या पुस्तकांची संख्या १३१ कोटी आहे. ताशकंद शहरांत १८७६ सालीं स्थापन झालेली एक लायब्ररी असून अजूनहि ती मोठ्या ऊर्जितावस्थेंत आहे. तेथें रोज कमींत कमी ५०० ते ६०० वाचक पुस्तकें वाचण्यासाठीं येतात, यावरून या लायब्ररीचें मोठेपण लक्षांत येईल.

रशियांतील सर्वांत मोठी लायब्ररी मॉस्को येथें आहे. ही लायब्ररी जगांतील सर्वांत मोठ्या लायब्ऱ्यांपैकीं एक आहे. वाचनाची अगदीं आधुनिक पद्धतीची व्यवस्था येथें करण्यांत आली असून अगदीं १२ वर्षांच्या मुलापासून तों ७० वर्षांच्या वृद्ध प्रोफेसरापर्यंत सर्व वयांचे लोक आपापलें आवडीचें पुस्तक घेऊन येथें वाचीत बसलेले दिसतात. १६० भाषांतील जवळजवळ १ कोटी ९० लक्ष पुस्तकें या लायब्ररींत असून परदेशी मासिकांच्या २२ लक्ष प्रती येथें ठेवलेल्या आहेत. याशिवाय जवळजवळ ३०० अमोल जुनीं पुस्तकें येथें जतन करून ठेवलेलीं आहेत. याशिवाय वृत्तपत्रें व मासिकांच्या सहाय्यानें जनतेचें सर्व शिक्षण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथें होत असतो. रशियन नागरिकांना वृत्तपत्र-वाचनाचें वेडच आहे. रस्त्यारस्त्यांतून लावलेल्या कपाटांतून तो रोज सकाळीं वृत्तपत्रें वाचीत उभा असलेला दिसेल. रशियांत एकूण ५७ भाषांतील ७२४६ वृत्तपत्रें छापलीं जातात व त्यांचा एकूण खप ४ कोटी ८० लाखांवर आहे. या शिवाय २००० मासिकें या ठिकाणीं प्रसिद्ध होतात तें निराळेंच एकूण रेडिओ-केन्द्रें ३० हजारांवर असून सर्वसाधारण रशियन माणसाच्या घरीं रेडिओ अगर टेलिव्हिजन सेट बहुतेक आढळतो. यामुळें शहरांतील

घडामोडींशीं रशियन शेतकरी अगर खेड्यांतील नागरिक एवढा एकरूप झालेला असतो कीं, त्यांना आपण शहरांतील सुधारणांपासून फारसें लांब आहोंत असें वाटत नाहीं. जगांतील प्रत्येक घडामोड रशियांतील बहुसंख्य नागरिकांना ठाऊक असते.

मॉस्कोचें शैक्षणिक ऐश्वर्याचें प्रतीक म्हणून मॉस्को विद्यापीठाच्या इमारतीकडे प्रामुख्यानें बोट दाखवावें लागेल. या बत्तीस मजली टोलेजंग इमारतींत १२ निरनिराळ्या विषयांवरील अभ्यासाचीं खातीं असून १५५०० विद्यार्थी तेथें शिकत आहेत. सहा हजार विद्यार्थी मॉस्को विद्यापीठांत राहून शिकतात व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांची संख्या २००० वर आहे. रशियांतील निरनिराळ्या ६९ ठिकाणचे विद्यार्थी व कित्येक परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठीं येथें आलेले आहेत रशियांत १९४८ सालीं ११ हिंदी विद्यार्थी शिकत होते ते रशियन भाषेंतून शिकत आहेत. विद्यापीठांत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची संख्या जवळ जवळ सारखी दिसली आपल्याप्रमाणेंच प्रत्येक विषयाचें स्वतंत्र खातें रशियन विद्यापीठांत आहे. तेथें अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या विद्यार्थिदशेंतील चरितार्थाला पुरेशी शिष्यवृत्ति मिळते. त्याची राहण्याची खोली, एवढी सुखसोयींनीं युक्त असते कीं, कोणताहि त्रास न होतां तो शांतपणें आपला अभ्यास करू शकतो. नाट्यशास्त्रापासून तों स्फुटनिक बनविणाऱ्या जगद्विख्यात संशोधकांपर्यंत सर्व शाखांतील संशोधनांचें शिक्षण व संशोधन या ठिकाणीं होत असते या ठिकाणीं शिक्षण घेतांना अगर संशोधन करतांना आवश्यक असलेली शांतता व स्वास्थ्य विद्यार्थ्याला नेहमीं मिळतें. बेशिस्तीचा प्रकार येथें क्वचितच होतो. राजकारणाचें वारेंहि येथें फिरकत नाहीं. किंबहुना मॉस्को विद्यापीठ म्हणजे विद्यादेवीची पूजाअर्चा करण्याचें एक पवित्र मंदिर याच भावनेनें रशियांतील या विद्यापीठाकडे पाहिलें जातें. विद्यापीठाच्या इमारतीसमोर दिसणारी मॉस्को ही रम्य नदी व तिच्या पुढें सुंदर बागा व त्यामागें अवाढव्य अशी पसरलेली मॉस्को विद्यापीठाची जागा हें वातावरणच मोठें रम्य दिसतें. आम्ही गेलों त्या वेळीं येथें जगांतील ज्योतिष्यांची एक परिषद सुरू होती. ज्या देशाचा प्रतिनिधि परिषदेस हजर

होते त्या त्या देशाचीं निशाणें बाहेर फडकत होतीं. त्यांत भारताचे निशाणहि मानानें डोलत होतें. लेनिनग्राड विद्यापीठांत प्रामुख्यानें भाषाशास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी दिसले. तेथील व्यवस्थाहि मॉस्कोप्रमाणेंच होती. रशियाचें सांस्कृतिक व वैज्ञानिक भवितव्य ठरविणाऱ्या व्यक्ति या विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या आहेत. त्यामुळें कोणाहि परकीयाची मान या विद्यामंदिरापुढें नमल्याशिवाय राहात नाहीं.

## ६ : लोक राहतात तरी कसे?

कोणत्याहि देशाचें वैशिष्ट्य तेथील नागरिकांच्या राहण्याच्या पद्धतीवर अवलंबून असतें. देशांतील लोक खरोखरच सुखी आहेत का? हें सर्वसाधारण मनुष्याच्या राहणीच्या मानावरून परकीय मनुष्य ठरवीत असतो. त्यामुळें रशियांत प्रवेश केल्याबरोबर तेथील सर्वसाधारण मनुष्य सुखासमाधानांत आहे का? हें जाणून घेण्याची इच्छा आमच्या मनांत होती. विमानतळावर उतरल्यापासून समोर दिसणाऱ्या रशियनांकडे आम्ही याच उत्सुकतेनें पाहात होतों. प्रत्येक मनुष्याच्या चेहऱ्यावर जरी आम्हांला समाधानाचें हास्य दिसत नव्हतें, तरी त्याच्यामागें उद्याचें कसें होईल ही काळजी नसावी असें त्यांच्या वागणुकीवरून वाटे. सकाळच्या प्रहरीं पेकिंग हॉटेलमधील माझ्या खोलींतील गॅलरींत उभें राहून मी रस्त्याकडे पाहूं लागलों कीं, माझ्या समोरून अनेक तरुण मुलें मुली कामाला जातांना दिसत. त्यांच्या हातांत एक-दोन वर्तमानपत्रें असत. साधासुधा पण नीटनेटका पोषाख त्यांनीं केलेला असे, पण आपल्याकडील जेवणानंतर पानपट्टी अगर सुपारी चघळीत कचेरीकडे जाणारा तरुण व हा तरुण याचेमध्यें मला फरक जर कोणता दिसला असेल तर तो हा कीं, या तरुणाचीं पावलें कारखान्यांत लवकर जाण्यासाठीं झपझप पडत असावींत असें वाटे, त्याला काळजी फक्त वेळेवर पोहोंचण्याची असावी असें दिसे. जातां जातां कोणाला तो हात वरती करून अभिवादन करील, पण त्याचेशीं रस्त्यावर बोलत उभें राहण्याची त्याची तयारी असावी असें वाटलें नाहीं. यावरून नोकरीविषयीं त्याच्या मनांत उत्सुकता दिसे, बेपर्वाई वाटत नसे. खरें पाहिलें असतां रशियांत १९३० पासून बेकारी हा शब्द संपूर्णपणें नाहींसा झालेला आहे. नोकऱ्या सारख्या निर्माण होत आहेत. मग अशी परिस्थिति असतांना नोकरीविषयीं बेपर्वाई रशियन तरुणाच्या मनांत कां उत्पन्न होत नाहीं? हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे व याचें उत्तर

रशियांतील नोकरीच्या परिस्थितींत आहे. रशियांतील प्रत्येक नागरिक ठराविक नोकरीसाठीं तयार होतो. जी नोकरी तो करतो ती त्याला आवडते म्हणून त्यासाठीं तो तेथें येतो, त्याला तिचा कंटाळा येऊन चालत नाहीं. माझी ही नोकरी सुटली तर मला दुसरी नोकरी सहज मिळेल अशी भावना त्याच्या मनांत नसते, कारण आपणासाठीं दिलेलें कार्य आपणाला केलें पाहिजे, त्यांत ज्या अडचणी असतील त्या दूर करणें शक्य आहे, ही गोष्ट त्याला ठाऊक असते, त्यामुळें आपणाला नोकरी सोडण्यास पुरेसें कारण त्याला सांपडत नाहीं. त्यामुळें आपण जें काम करतों तें नीट करणें त्याला भाग पडतें. उशिरा येणाऱ्या नोकराला फारच कडक शासन रशियन कारखान्यांत केलें जातें.

सतरा वर्षांचा रशियन मुलगा अगर मुलगी व भारतांतील त्या वयाची मुलगा-मुलगी यांच्या विचारांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. आपले आईवडील आपल्या डोक्यावर आहेत, अशा भावनेनें आपल्याकडील मुलगा अगर मुलगी या वयांत कॉलेजमध्यें शिकत असतात. मुलगी असेल तर लग्नाचा विचार तिच्या मनांत डोकावत असतो, तर रशियन मुलें-मुली या वेळीं फक्त एकच विचार करीत असतात. तो म्हणजे आपलें भावी व्यवसायासाठीं शिक्षण पुरें करून ज्याला आपण ॲपरेन्टिसशिप म्हणतों ती करण्याच्या ते तयारींत असतात. त्या वेळीं त्याला आपल्या जिवनमानानुसार पगार घेऊन दिवस काढावे लागतात. एखादा हुषार मुलगा या वेळीं कॉलेज-शिक्षणासाठीं कॉलेजांत गेला, तर त्याचाहि खर्च त्यांच्या आई-वडिलांवर पडत नाहीं. कॉलेजांत प्रवेश करून शिक्षक, डॉक्टर, इंजिनियर अगर इतर उच्च पदवीचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला सरकारी शिष्यवृत्त्या मिळतात व त्यांत त्याला आपला सर्व खर्च भागवून आपला अभ्यास पूर्ण करावा लागतो. अमेरिकेप्रमाणें फावल्या वेळांत कोठेंहि काम करून शिक्षण घेण्याची पद्धति रशियांत फारशी नाहीं. रशियन कॉलेजांतील मुलाला आपला खर्च, मिळणाऱ्या कॉलेजांतील शिष्यवृत्तीवर भागवावा लागतो. त्याच्यांत त्याला आपल्याकडील कॉलेज-विद्यार्थ्यांप्रमाणें झोकानोकांत राहतां येत नाहीं. ठराविक पैसा खर्च करून आवश्यक ती गरज फक्त त्याला भागवावी लागते. त्याच्या हौशीपुरते सिनेमा व नाटकें त्याला युनिव्हर्सिटी थिएटरमध्यें पहावयास

मिळतात. रशियांतील सिनेमा अगर नाटकगृहांत आपण सहज गेलों तर तेथें येणारे प्रेक्षक बहुधा कौटुंबिक वृत्तीचे दिसतात. मुलें तर त्यांच्याबरोबर नसतातच अगर कॉलेजचे तरुण तर क्वचित् दिसतात, यामुळें या ठिकाणीं दाखविले जाणारे बोलपट ठराविकच दाखवावे अगर '१८ वर्षांचे वरील मुलांसाठीं हे खेळ नव्हेत' असे निर्बंध बोलपटावर घालावे लागत नाहींत. नूतन विवाहित पतिपत्नीपासून ७० वर्षांच्या वृद्ध आजोबा आजीपर्यन्तचे सर्व थरांतील कौटुंबिक, रशियन थिएटरांतून अगर सिनेमांतून करमणुकीचे कार्यक्रम पाहावयास आलेले दिसतील. रशियन नागरिक हे नाटक, सिनेमा व नृत्य आदि करमणुकीचे अतिशय शोकीन आहेत. क्लबांत बसून चार-पांच जणांनीं अगर १०-१२ जणांनीं गप्पा मारण्यापेक्षां घराशेजारीं असलेल्या पार्कमध्यें जाऊन आपल्या पत्नीसमवेत अगर इतर कुटुंबियांसमवेत गप्पा मारीत बसणें बहुसंख्य जास्त पसंत करतात. साधारणपणें १८ वर्षांवरील मुलापासून २५ वर्षांच्या तरुणतरुणीपर्यंतचे गट यांच्या करमणुकीचा विषय म्हणजे नृत्य होय. उघड्या पार्कमध्यें सुरू असलेल्या बँडच्या तालावर मित्रमैत्रिणींनीं खूप खूप नाचावें हाच त्यांचा आवडीचा छंद. अशाच एका पार्कमध्यें आम्ही गेलों असतां, मुलांमुलींनीं आमचेबरोबर नृत्य करण्याची इच्छा असल्याचें सांगितलें. आमच्यापैकीं पाश्चिमात्य नृत्य करूं शकणारी मंडळी त्यांच्याबरोबर थोडा वेळ नाचली, आणि यामुळें त्या मंडळींना केवढा आनंद झाला. 'नेहरूंचे देशांतील मंडळींनीं आम्हांला ही संधि दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत' असें त्यांनीं मोठ्या आनंदानें आम्हांला सांगितलें. आम्ही तेथून परतलों, पण त्या तरुण मंडळींच्या मनांतील उत्साह व आनंद आम्ही भारतीय कधींहि विसरणार नाहींत. अशातऱ्हेनें रशियन कुटुंबियांच्या करमणुकीच्या क्षेत्रांत पडणारे दोन वर्ग रशियांतील प्रत्येक क्षेत्रांत पाहावयास मिळतात. यामुळें कौटुंबिक जीवन कंठणारे एकीकडे व अविवाहित तरुण मंडळी एकीकडे असे दोन वर्ग त्यांच्यामध्यें स्पष्ट पडलेले दिसतात.

दोन मुलें व पति-पत्नी यांच्या संसाराचीं कांहीं चित्रें मीं माझ्या मॉस्कोंतील मुक्कामांत जवळून पाहिलीं. मॉस्कोंत राहणाऱ्या या दोन मुलांच्या पति-पत्नीच्या सर्वसाधारण कुटुंबाला महिन्याकांठीं आपल्या संसारासाठीं १२०० ते १५०० रुबल्स खर्च करावे लागतात. तेव्हां सर्व खर्च नीट-

नेटका चालतो. यासाठीं पति-पत्नीला दोघांनाहि नोकऱ्या कराव्या लागतात. व ती एक आवश्यक गोष्ट म्हणून ते आनंदानें करतात. संध्याकाळीं कचेरींतून दोघेंहि परत आलीं कीं, तीं आपल्या लाडक्या लहानग्याच्या कौतुकांत गढलेलीं दिसतील. त्याचेसाठीं कोणत्या नवीन वस्तु आणावयाच्या यांच्या योजना आंखतील. मॉस्कोंतील राहणी जशी खर्चीक आहे तसें तेथील जीवनहि मोठें रम्य आहे. हीं मुलें आपल्यापाशीं फारच थोडा वेळ राहतात व त्यांना बराच वेळ आपल्यापासून दूर शाळेंत घालवावा लागतो याची जाणीव नेहमीं पति-पत्नीला असते, म्हणून त्यांच्या जागेपणीं ती आपल्यापासून त्यांना फार दूर जाऊं नयेत असें या पति-पत्नींना वाटत असते. मॉस्को शहरांत मुलांसाठीं एक स्वतंत्र मोठा स्टोअर आहे. या ठिकाणीं मुलांना लागणाऱ्या सर्व वस्तू एका ठिकाणीं मिळतात. या वस्तू मुलांना घेऊन जाऊन विकत घ्याव्या हा कित्येक पालकांचा नेहमींचा कार्यक्रम असतो. ह्या स्टोअरमध्यें मुलें फार रमतात.

येथें कौटुंबिक राहणींतील सुखाच्या कल्पना सर्वसाधारणपणें आपल्यासारख्याच आहेत. शाळेंत शिकविणारा शिक्षक ज्या बागेंत आपल्या कुटुंबासह पिकनिकला जाईल त्या ठिकाणींच एखादा लेफ्टनंट कर्नल, वा एखादा प्रोफेसर सहलीसाठीं येतांना दिसेल. फार तर तो आपल्या मोटारींतून येईल. त्यांच्या राहण्याच्या जागांत फारसा फरक नसतो. घरांत कुटुंबांत जेवढीं माणसें असतात तेवढ्याच प्रमाणांत त्याला जागा मिळत असते. ( माणशीं ठराविक फूटप्रमाणें. ) एखाद्या कर्नलच्या कुटुंबांत ४ माणसें असतील व कामगाराच्या कुटुंबांत दहा माणसें असतील तर त्याला कामगारापेक्षां कमी जागा मिळते व पगारानुसार भाडें पडतें. कर्नल आपल्या जागेंत जास्त किंमतीवान सोफासेट ठेवील, टेलिफोन वापरील व कामगार आपल्या जागेंत साध्या खुर्च्या ठेवील, एवढाच फरक यांच्यामध्यें असतो. यामुळें आपल्याकडील उच्च व मध्यमवर्गीय मंडळी व सर्वसाधारणपणें कामगार यांच्या राहणींत जसें जमीन-अस्मानाचें अंतर दिसतें तसा फरक रशियांत या समाजांतील दोन थरांत आढळून येत नाहीं. प्रत्येक माणसाच्या कामाच्या महत्त्वाप्रमाणें त्याला पगार व पैसा मिळतो, पण त्याला आपल्या पगाराच्या प्रमाणांत भाडें भरावें लागतें. बाजारांतील वस्तु सर्वांना सारख्या


किंमतीस मिळत असल्या तरी त्या घेण्याचें प्रमाण अगर दर्जा निराळा असूं शकतो. जास्त पैसा मिळविणारा मनुष्य पैसा थोडा अधिक सांठवूं शकतो. व उंची वस्तू विकत घेतो, पण कोणीहि चैनींत राहण्यासाठीं अमर्यादपणें, पैसा खर्च करतांना दिसत नाहीं. कारण, रशियन समाजाची आर्थिक घडणच अशी आहे कीं, मिळालेल्या पैशाचा व्यय असा करावा लागतो कीं, कोणालाहि दुसऱ्याचें वैषम्य वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण होऊं शकत नाहीं. महायुद्धानंतर १९४७ सालीं रशियांतील वस्तूंच्या किंमती ज्या होत्या त्यापेक्षां गेल्या दहा वर्षांच्या काळांत त्या किती तरी पटींनीं कमी झाल्या आहेत. मॉस्को शहरांत हिंडतांना मला कित्येक वस्तूंच्या किंमती भारतापेक्षां जास्त वाटल्या. जी बुटाची जोडी आपण १२ ते १५ रुपयांपर्यंत विकत घेतों तिला मॉस्को शहरांत ४० ते ४५ रुबल्स पडत होते. उलट जी कॅमेरासारखी वस्तु आपल्याकडे ४०० ते ४५० रुपयांपर्यंत मिळणार नाहीं ती मॉस्को शहरांत १०० ते १२५ रुबल्सला मिळत होती. ( रुबल व रुपया यांची किंमत जवळ जवळ सारखी आहे. ) तरी या किंमती दहा वर्षांपूर्वी होत्या त्यापेक्षां बऱ्याच कमी आल्या आहेत असें एका रशियन गृहिणीनें मला सांगितलें. ती म्हणाली, " १९४७ सालीं घरचें महिन्याचें सामान आणावयास १०० रुबल्स महिन्याकाठीं द्यावे लागत. तेंच सामान आतां मी ४२ रुबल्समध्यें आणूं शकतें. " यावरून आपल्या व तेथील परिस्थितींत किती फरक आहे याची कल्पना येईल. उत्पादन वाढल्यामुळें किंमती कमी झाल्या असाव्या असें वाटतें. दुसरें एक रशियन शिक्षक मला म्हणाले, " १९४७ सालीं शाळेंत जाण्यासाठीं मला जो उत्तम सूट शिवावा लागे त्याच्या किंमतींत आज माझा सूट, एक बूट-जोडी व आमच्या छोट्या लहानग्याचे आणखी दोन बूट मिळतात. यावरून दहा वर्षांत किंमती येथें किती कमी आल्या आहेत याची कल्पना येईल. आपल्याकडील परिस्थिति अशी नाहीं. या किंमती कमी आल्या तरी रशियन कामगार अगर सर्वसाधारण माणसाचें उत्पन्न कांहीं कमी झालेलें नाहीं. त्याचा परिणाम तो अधिक झोकांत राहूं लागला असें नाहीं, उलट, त्याची पैसा जपून ठेवून आपल्या म्हातारपणची तरतूद करून ठेवण्याकडे कल अधिक वाढला आहे. आज रशियांतील ३ कोटी ७० लक्ष लोकांचें सेव्हिंग्ज बँकखातीं

बँकांतून असून त्या खात्यांवर असलेली एकूण रक्कम ६३०० कोटी रूबल्स आहे. यावरून सर्वसाधारण नागरिकाची आर्थिक स्थिति तो जसजसें आपलें उत्पन्न वाढवीत आहे तसतशी सुधारूं लागल्याचें स्पष्ट दिसतें.


या कमी किंमतीचें कारण रशियानें आपली निर्मिति सारखी वाढवीत नेली आहे. आपण काम जास्त केलें तर आपलें उत्पादन वाढेल व आपणाला अधिक सुखांत राहतां येईल ही गोष्ट रशियन नागरिकांच्या मनावर लहानपणापासून बिंबविली जाते व त्याचा परिणाम गेल्या दहा वर्षांत खालीलप्रमाणें दिसत आहे. मासे ९२ टक्के जास्त मिळूं लागले. शेळ्या-मेंढ्यांची पैदास ६२ टक्क्यांनीं वाढली. कोंबड्या-बदकें व दुधाचें उत्पादन १०० टक्क्यांनीं वाढलें. साखर ८७ टक्के, अंडीं ८६ टक्के वाढलीं.

अशा तऱ्हेनें उत्पादन वाढत आहे व त्यामुळें एके काळीं हालांत दिवस काढणारा रशियन नागरिक सुखासमाधानानें आतां वागूं लागला. उत्पन्न वाढलें कीं, आपणाला सुखासमाधानानें राहतां येतें. आपलें वाढतें उत्पादन मग कारखान्यांतील असो अगर संयुक्त शेतीमधील असो, तें आपल्याच उपयोगासाठीं प्रथम खर्च होईल. परदेशांत चढाओढ करून अधिक पैसा मिळविण्यासाठीं तें पाठविलें जाणार नाहीं, याची जाणीव प्रत्येक नागरिकाला आहे व त्यामुळेंच तो आत्मविश्वासानें काम करूं शकतो. याच विश्वासावर त्याचें सर्व सुख संपादन करण्याची शक्ति परिस्थितीनें निर्माण केली आहे.

त्यांच्या कौटुंबिक आयुष्यांत मला एक गोष्ट विशेष दिसली. ती म्हणजे, रशियन माणसाचें आयुष्य एखाद्या यंत्रासारखें चालतें ही होय. त्याला कोणत्याहि गोष्टीसाठीं चढाओढ करावी लागत नाहीं. ज्याला कष्टप्रद आयुष्य म्हणतां येईल तें तर त्याला कधींच भोगावें लागत नाहीं. आरोग्य बिघडलें तर सर्व आधुनिक उपचार त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे असतात. मुलाला शिक्षण कसें देऊं हा प्रश्न त्याच्यापुढें नसतो. वृद्धापकाळीं आपलें कसें होईल याची काळजी त्याला नसते. यामुळें आहे या आयुष्यांत जास्तींत जास्त सुखानें राहण्यांत त्याला कधींच खंत वाटत नाहीं. आपला पैसा संपला तर रस्त्यावर भिकारी म्हणून पडण्याची पाळी आपल्यावर येणार




झारच्या या एका राजवाड्यांत आतां कामगारांच्या दुपारच्या जेवणाची सोय केलेली आहे. तेथें ते जेवत बसलेले दिसत आहेत.



मोंगली थाटाचें हें बांधकाम रशियांतील पिटस्बर्ग येथील जुन्या राजवाड्यांतून पाहावयास मिळतें.


☆



पिटस्बर्ग येथील झारच्या राजवाड्यांतील एक दालन.




मॉस्को शहरांतील कामगार-वसाहतींतील एक सजविलेली खोली.



एका जुन्या रशियन लेखकाची अभ्यासिका पूर्वीच्याच स्थितींत जतन करून ठेविली आहे.

☆



इमारतीच्या दारावरील हें नक्षीकाम इराणी पद्धतीचें आहे.

नाहीं. आपल्या अंगांत जोंपर्यंत काम करण्याची ताकद आहे, तोंपर्यंत आपलें सरकार आपणाला काम देईल व काम करण्यास असमर्थ ठरलों तर उपाशी मरूं देणार नाहीं. कोठें तरी आपली सोय लावून आपली काळजी घेईल. आपल्या मुलांबाळांवर हालांत दिवस काढण्याची पाळी येणार नाहीं. या गोष्टी त्याला स्पष्ट दिसत असल्यामुळें एका मृत्यूशिवाय सर्वसाधारण रशियन माणसाला कधीं कोठली भीति वाटत नाहीं व याचा परिणाम त्याच्या राहणीवर झालेला आहे. मिळालेलें मानवी आयुष्य सुखासमाधानांत घालवावें, ही आनंदी वृत्ति त्याच्यामध्यें नेहमीं असते. त्यामुळें कोणताहि करमणुकीचा कार्यक्रम रसिकांविना सुना जात नाहीं. प्रत्येक थिएटरांत, प्रत्येक सर्कशींत, प्रत्येक बॉल-डान्स थिएटरांत सहसा खुर्ची रिकामी दिसत नाहीं. भरपूर मनःस्वास्थ्य लाभणारा प्राणी म्हणूनच रशियन माणसाकडे बोट दाखवावें लागेल.

सर्वसाधारणपणें ८० टक्के रशियन कुटुंबें शहरांत तरी, तीन ते चार खोल्यांच्या ब्लॉकमध्यें राहतात. मॉस्को शहरांत मोठी जागा अगर बंगल्यांत राहणारी मंडळी म्हणजे परराष्ट्रीय वकिलातींतील मंडळी होत. रशियन मंत्रीहि आपल्या कचेरींतील चार ते पांच खोल्यांच्या ब्लॉकमध्यें राहतात. त्यांची भेटावयास आलेल्या लोकांना भेटण्याची खोली मोठी शृंगारलेली असते असें नाहीं. एखाद्या वाटोळ्या टेबलाभोंवतीं बसून कुटुंबियांनीं अगर आलेल्या पाहुण्यांनीं गप्पा माराव्या असा सर्वसाधारण परिपाठ कार्यकर्त्यांच्या कुटुंबांत नेहमीं दिसतो. यांत रशियनांच्या स्वभावाचें वैशिष्ट्य स्पष्ट दिसतें. मुलगा-मुलगी, माता व वडील अशीच एका टेबलाभोंवतीं बसून गप्पा मारूं लागलीं कीं, सर्वसाधारण मित्रमंडळींपेक्षां तीं निराळीं वाटत नाहींत. त्यांच्या वयामधील अंतर या वेळीं त्यांच्या आड येऊं शकत नाहीं. वडिलांना हजरजबाबीपणानें प्रश्न विचारणारी मुलगी, वडिलांची सिगारेट पेटवून आपणहि त्यांच्याबरोबर सिगारेट ओढीत बसणारीं मुलें, मला कांहीं कुटुंबांत मॉस्कोंत पाहावयास मिळालीं. मुलगा व वडील यांच्यामधील हे मित्रत्वाचे संबंध इतरत्र फारच क्वचित् पाहावयास मिळतात. रशियांत दिसणारें हें दृश्य तेथील समाजवादी समाजरचनेचें प्रतीक आहे.

आणखीहि आपणाकडे न दिसणारीं कांहीं दृश्यें या कुटुंबांतून पाहावयास मिळतात. त्यांतील एक महत्त्वाचें दृश्य म्हणजे अविवाहित मातेचें. एखादी मिळवती अविवाहित मुलगी आपल्या लहानग्या मुलाला घेऊन किंडरगार्टन शाळेंत जातांना तुम्हांला दिसली तर तिनें कांहीं वाईट केलें असेल असें म्हणण्याचें धैर्य रशियांत कोणाला करवत नाहीं. अविवाहित मातांचा प्रश्न रशियांत मुलींना भेडसावीत नाहीं. इतर मुलाइतकेंच अविवाहीत मातेच्या मुलाला मानानें रशियांत राहातां येतें. त्याला त्याच्या वडिलाचें नांव कोणी विचारीत नाहीं आणि विचारलेंच तर मला वडील नाहींत, आईच आहे, असेंच तो न डगमगतां सांगतो. त्याला समाजांत सन्मानानें वावरतां येतें आणि रशियन जीवनाचें हें वैशिष्ट्य मनांत भरल्याशिवाय राहात नाहीं.

# ७ उद्योगधंदे

रशियाच्या प्रगतीचें खरें वैशिष्ट्य कशांत आहे? असा प्रश्न जर कोणीं विचारला तर त्याला उत्तर द्यावें लागेल कीं, तेथील उद्योगधंदे व शेती यांत, या देशाला मिळालेल्या यशामुळेंच अवघ्या ४० वर्षांच्या काळांत पहिल्या दर्जाच्या राष्ट्रांत रशियाला जाऊन बसतां आलें. आज रशियांतील प्रत्येक उद्योगधंद्यांतील भांडवल सरकारी असतें व त्याची घडण मोठी पद्धतशीर केलेली असते. कम्युनिस्ट पक्षाचें प्राबल्य असलेल्या सुप्रीम सोव्हिएटच्या हातांत या धंद्यांचीं सर्व सूत्रें असतात व जेथें आवश्यक तेवढेंच धंदे काढले जातात. सरकारी उद्योगधंद्यांवर पाहणी करण्यासाठीं एक विभागीय समिति असते. त्यांत उद्योगधंद्यांतील कित्येक तज्ज्ञ असतात. दरवर्षी प्रत्येक विभागांत उद्योगधंदे काढण्यासाठीं ठराविक भांडवल दिलें जातें व विभागीय समितीच्या सूचनेनुसार ते काढले जातात. त्यांची पाहणी नेहमीं विभागीय कौन्सिलतर्फे होत असते. ठराविक भांडवल, ठराविक धंद्यांत घातलें कीं, त्यांतून ठराविक उत्पादन निघालें पाहिजे अशा अपेक्षेनें विभागीय समिति या धंद्यांकडे पाहात असते. तिची मोठी कांटेतोल नजर कारखान्यांत होणाऱ्या कामावर असते व कारखान्याच्या प्रमुखांना याबाबत समिति जबाबदार धरते. अपेक्षेप्रमाणें ठराविक उत्पादन या उद्योगधंद्यांत मिळूं शकलें नाहीं तर तो धंदा बंद करून कारखान्याची यंत्रसामुग्री निराळ्या धंद्यासाठीं वापरली जाते व समिति आपला प्रयोग फुकट गेला असें स्पष्टपणें सांगते. दरवर्षी प्रत्येक विभागीय समितीला आपल्या विभागांतील उद्योगधंद्याच्या प्रगतीची नीट कल्पना, मध्यवर्ती उद्योग समितीला द्यावी लागते व त्यावरून सुप्रीम सोव्हिएटला मध्यवर्ती उद्योग-समिति आपल्या व्यवसायाचें स्पष्ट चित्र देते व पुढें काय करावयाचें, मिळालेला फायदा नव्या कारखान्यांत कसा घालावयाचा याचा विचार सुरू होतो. रशियांतील प्रत्येक उद्योगधंदा अपरिमित फायदा मिळविण्यासाठीं नाहीं, योग्य

तो फायदा घेऊन तोच फायदा रशियन सरकार नव्या उद्योगधंद्यांत अगर धंद्याच्या वाढीसाठीं उपयोगांत आणीत असल्यामुळें रशियाला भांडवलाचा कधींहि तुटवडा पडलेला नाहीं. मॉस्कोसारख्या औद्योगिक केन्द्राच्या समितीच्या प्रामुखाशीं याबाबत सहज बोलत असतांना तो म्हणाला, "आमचे उद्योगधंदे आम्ही आमच्या तज्ज्ञांच्या सल्ल्यानें चालवितों. आमच्याकडे धंद्यांत पुढें असलेल्या राष्ट्राच्या प्रगतीचा नीट अभ्यास करून ते वसवितों, पण या वेळींहि नुसते अंदाजीं अडाखे बांधून आम्ही कधींच पैसा उधळीत नाहीं. वैज्ञानिक प्रगति, आतांपर्यंत केलेले निरनिराळे प्रयोग याचा उपयोग नवे उद्योगधंदे उभारतांना आमच्या डोळ्यांसमोर असतात. आज आमच्या औद्योगिक प्रयोगशाळांतून जे प्रयोग सुरू आहेत त्यांचे यशापयशावर आमच्या या क्षेत्रांतील यश सर्वस्वीं अवलंबून असतें."

सदर समितीचे अध्यक्ष पुढें म्हणाले, "उद्योगधंद्याची वाढ करतांना आम्हांला त्यांच्याबरोबर निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचा विचार करावा लागतो. त्यांत घेण्यांत येणारीं माणसें, त्यांच्या राहण्याची सोय व या कारखान्यांच्या सान्निध्यामुळें आसपासच्या शहरांना होणारा त्रास, या सर्व गोष्टी आम्ही विचारांत घेऊन नंतरच आमचे कारखाने आम्ही काढीत असतों. मॉस्कोसारख्या शहरांत आज अशी परिस्थिति आहे कीं, तेथें जास्त उद्योगधंदे वाढविणें आम्हांला शक्य नाहीं, कारण आधींच या शहरांत कारखान्यांची कल्पनेबाहेर दाटी झाली आहे, असें आमच्या तज्ज्ञाचें मत असल्यामुळें आतां यापुढें मॉस्कोंत कोणताहि कारखाना उभारावयाचा नाहीं अशी योजना आम्हीं या वर्षापासून आंखली आहे. अर्थात् आवश्यक ती उद्योगधंद्याची वाढ यामुळें खुंटेल असें नाहीं, तर इतर ठिकाणीं ती योजनेनुसार होणार आहे."

रशिया वैज्ञानिक ज्ञानाच्या प्रयोगाचा किती कांटेतोल उपयोग करतो त्याचा अनुभव या वेळीं आम्हांला आला. भारत सरकारचे व्यापारी व उद्योगधंदे खात्याचे एक तरुण आय्. ए. एस्. चिटणीस आमच्याबरोबर होते. त्यांनीं, आम्ही एका कारखान्यांत गेलों असतां, "आम्ही एक ठराविक कारखाना भारतांत उभारणार आहोंत त्याला पाण्याचा पुरवठा किती लागेल याचा अंदाज द्याल का?" अशी मागणी केली. रशियन

इंजिनियरांनीं ती माहिती आपले प्रयोगशाळेंतील तज्ज्ञांकडून आम्हांला दहा मिनिटांत आणून दिली.

ज्याप्रमाणें परराष्ट्रांच्या राजकारणावर रशियाची मोठी कांटेतोल नजर असते. त्याचप्रमाणें इतरांच्या उद्योगधंद्यांच्या वाढीकडेहि मोठ्या कांटेतोलपणें रशियन उद्योगधंद्यांतील तज्ज्ञ पाहत असतात. नवीन म्हणून तयार झालेली कोणतीहि, कोणत्याहि देशांतील वस्तू कशी मिळवावी व तिच्यापेक्षां अधिक सोयीची अशी वस्तु आपण कशी बनवावी याचा ध्यास रशियन तज्ज्ञांना सारखा लागलेला असतो. यामुळें वर्षाकांठीं निदान ७०० ते ९०० यांत्रिक नमुने रशियन औद्योगिक तंत्रज्ञ नेहमीं तयार करीत असतात. तेलाच्या खाणीं-साठीं लागणारीं विविध यंत्रें तर रशियानें एवढीं तयार केलीं आहेत कीं कोणत्याहि देशापेक्षां रशियन शास्त्रज्ञ याबाबतींत पुढें गेले आहेत. या उद्योगधंद्याची वाढ किती मोठ्या प्रमाणांत झाली आहे, याचें थोडक्यांत चित्र मॉस्को येथील औद्योगिक प्रदर्शनांत पाहावयास मिळतें. रशियांतील कोना-कोपऱ्यांतील नागरिक हें प्रदर्शन वर्षातून एकदां तरी पाहून जात असतो. एकूण २० निरनिराळ्या इमारतींत तें मांडण्यांत आलें असून त्यांत सर्वसाधारण हत्यारापासून मोटारीच्या मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या यंत्रापर्यंत सर्व साधनसामुग्रीनें परिपूर्ण अशीं यंत्रें येथें एकत्रित पाहावयास मिळतात. अलिकडे अलिकडे तर रशियाचीं मित्रराष्ट्रें वाढल्यानें रशियन तज्ज्ञांचें या वाढत्या यांत्रिक ज्ञानाचा फायदा निरनिराळ्या राष्ट्रांत मिळूं लागला असून भारत हें त्यांतील एक प्रमुख राष्ट्र आहे. लुनेज येथील तेल बाहेर काढण्याचें मोठें कार्य भारतांत रशियन इंजिनियरांनीं केलें आहे, ही गोष्ट आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. या रशियन ज्ञानाचा खरा फायदा जर कोणी घेतला असेल, तर तो चीन या देशानें होय. तेथील तरुण पिढी तर रशियांत शिक्षण घेण्यांत गुंतली आहेच, पण तेथें ५६१ नवे मोठाले कारखाने बांधण्याचें अभिवचन रशियानें चीनला दिलें असून १९५८ अखेर २११ कारखाने रशियन तंत्रज्ञांच्या मदतीनें चीनमध्यें उभे करण्यांत आले आहेत. भारतांतील भिलाई येथील पोलाद-कारखान्यासाठीं रशियानें काय केलें याची माहिती रशियानें प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेंत पुढीलप्रमाणें दिली आहे : "या कारखान्याचा आराखडा तयार करणें, योग्य ती सामुग्री पुरविणें व प्रत्यक्ष

निर्मितीला मदत करणें, एवढी कामें भारतासाठीं रशियानें पत्करलीं आहेत. या कारखान्याच्या भांडवलांत आमचा कोणताच हिस्सा नाहीं अगर कारखान्याच्या व्यवस्थेंतहि कोणताहि हात रशियाला येथें घालावयाचा नाहीं."

कांहीं पाश्चिमात्य राष्ट्रांसाठीं रशियानें अनेक यंत्रें तयार केलीं असून आपलीं निर्यात वाढविण्यासाठीं निरनिराळे उपाय योजिले आहेत. यंत्राला लागणारी साधनसामुग्री पुरविण्याचा रशिया सारखा प्रयत्न करीत आहे. १९५७ सालीं रशियाची २५ टक्के निर्यात अशाच तऱ्हेची यंत्रसामुग्री होती. जवळजवळ ६५ देशांशीं या यंत्रसामुग्रीच्या बाबतींत रशियानें करार केलेले असून येथील यंत्रसामुग्री तिकडे नियमितपणें जात आहे.

उद्योगधंद्याच्या दृष्टीनें पाहावयाचें तर रशिया हा क्रांतीपूर्वी एक मागासलेला देश होता. ग्रेट ब्रिटन, जर्मनी, अमेरिका यांच्यासारख्या पुढें गेलेल्या देशांशीं ज्याची कधींहि तुलना करतां येणार नाहीं असा मागासलेला देश म्हणून जगांत रशियाचा उल्लेख होत असे, पण हा काळ बदलून जगांतील एका पुढारलेल्या उद्योगप्रिय राष्ट्रांत रशिया कसा आला याचा इतिहास मोठा पाहण्यासारखा आहे.

यासाठींच रशियांतील राजसत्तेनें जमीन, कारखाने, वाहतूक, बँका, परराष्ट्रीय व स्वदेशी व्यापार प्रथम आपल्या ताब्यांत घेतला. त्यांतून मिळणारा नफा प्रथम राष्ट्राची आर्थिक घडी नीट बसविण्यासाठीं खर्ची घातला. याचा परिणाम असा झाला कीं, रशियांतील सर्व साधनसामुग्री व संपत्ति सरकारी मालकीची झाली. शिवाय जनतेची सांठविलेली ठेव बँकेंत असल्यामुळें तीहि सरकारी सुधारणांसाठीं सरकारला वापरतां येऊं लागली व खरेंखुरें जनतेचें सरकार या उद्योगधंद्याचे बाबतींत तरी अस्तित्वांत आलें.

रशियांतील उद्योगधंद्याच्या प्रगतीची कल्पना फक्त कारखान्यांतील उत्पादनाच्या आंकड्यांवरून येण्यासारखी आहे. १९१७ च्या क्रांतीनंतर रशियाच्या उद्योगधंद्याच्या वाढीला एकदम सुरुवात झाली असें म्हणतां येणार नाहीं. १९२८ सालीं रशियानें आपली पहिली पंचवार्षिक योजना पुढें आणली व त्यांत उद्योगधंदे व शेती यांना आधुनिक यंत्रसामुग्री पुरवा-

वयाची हीच एक योजना प्रमुख होती. परदेशांत ही योजना ऐकून रशियाची चेष्टा करणारेच अधिक होते. आमच्या योजनांची जशी कांहीं ठिकाणीं अजूनहि चेष्टा होते, त्याप्रमाणें रशियाच्या योजनांचीहि त्या वेळीं चेष्टा झाली. पण या देशानें या चेष्टेला दाद दिली नाहीं. प्रत्येक कामगार नवनव्या कारखान्यांत ईर्ष्येनें कामास लागला. खारकोव्ह व स्टालिनग्राड येथें ट्रॅक्टरचे कारखाने सुरू झाल्यावर मॉस्को शहरानें आपला मोटारी बनविण्याचा धंदा ऊर्जितावस्थेस आणला. याबरोबरच पोलादाची पैदास जास्तींत जास्त कशी करावी यावर अनेक प्रयोग रशिया करीत होता व त्याचा परिणाम योग्य तोच होऊं लागला. आज दर तासाला रशियांत ५५०० टन पोलादाची पैदास होते. हा आंकडा पाहिला कीं या प्रयत्नांत किती यश आलें आहे याची कल्पना येते. १९४० सालीं वर्षाकाठीं १ कोटी ५० लक्ष टन पोलाद रशिया निर्माण करीत असे. म्हणजे गेल्या १५ वर्षांत या वाढीचें प्रमाण कसें वाढतें आहे हें दिसून येईल.

ही वाढ १९४० सालापर्यंत चांगली चालू होती. पण दुसऱ्या महायुद्धांत दोस्तांच्याबरोबर पुढें पाऊल टाकून नाझी जर्मनीविरुद्ध रशिया लढूं लागल्यापासून रशियाची औद्योगिक नुकसानी फार मोठी झाली. या वेळीं जर्मनीनें व्यापलेल्या प्रदेशांतील ३१८५० कारखाने मागें पाऊल घेतांना जर्मनीनें उधळून लावलें, यामुळें या कारखान्यांचें मोठें नुकसान झालें. यांत रशियाची ६० टक्के कोळसा व ५० लक्ष किलोवॅट वीज निर्माण करणारी यंत्रसामुग्री नष्ट झाली. ६७९०० कोटी रुबल्सचें रशियन उद्योगधंद्यांचें नुकसान झालें, असें अधिकृत पत्रकांत वाचावयास मिळतें. हें नुकसान रशियाच्या प्रगतीच्या मानानें फारच मोठें होतें. परंतु जर्मन सेना रशियांतून बाहेर पडल्यानंतर एका पंचवार्षिक योजनेंत ही नुकसानी आपल्या कष्टाळू कामगारांच्या जिवावर या देशानें परत भरून काढली. दक्षिणेकडील लोखंड व पोलाद यांचे कारखाने ताबडतोब उभारले गेले व त्यांची आजची निर्मिति पूर्वीपेक्षां जास्त आहे. या वेळीं पुन्हां पूर्ववत् काम सुरू करण्यासाठीं ६००० कारखाने पुन्हां बांधून काढावे लागले. या पुनर्रचनेंत राष्ट्राचा बराच पैसा खर्चीं पडल्यामुळें नवी वाढ थोडीबहुत या वेळीं खुंटली. रशियाला १९५० पर्यंत आपल्या प्रगतीच्या दृष्टीनें फारसें वर डोकें काढतां

आलें नाहीं. या लढ्यांत झालेली हानि हा तर रशियाला बसलेला फार मोठा धक्का होता व त्यामुळेंच रशियाला आपली सर्व पुरुषशक्ति आपल्या कारखान्यांकडे केन्द्रित करावी लागली व जेवढीं जास्तींत जास्त इतर कामें स्त्रियांना देतां येतील तेवढीं देण्याकडे रशियांत राज्यकर्त्यांचा कल वाढला आहे. त्यामुळेंच बरेच व्यवसाय आपल्या देशाची अडचण जाणून आतां स्त्रियांनीं हातीं घेतले आहेत.

रशियांतील आजच्या प्रगतीचे आंकडे उद्योगधंद्यासंबंधींच्या माहितीच्या पुस्तकांत पुढीलप्रमाणें देण्यांत आले आहेत.

वर्षाकांठीं १५ हॉर्स पॉवरचे निदान ३ लक्ष ट्रॅक्टर्स येथें तयार होतात. १९६० पर्यंत वर्षाकांठीं ६॥ लक्ष मोटारी तयार करण्याची योजना येथें आंखली आहे. ६०० कोटी यार्ड कापसाचा धागा, २८ कोटी यार्ड लोंकर, ४३५०००० टन साखर रशियांत वर्षाकांठीं पैदा होते. आणि हे सर्व उद्योगधंदे नुसते शहरांच्या आसपासच वाढत आहेत असें नाहीं, तर दक्षिणेकडे आझरबैजानपासून उत्तरेकडे फिनलंड आखातापर्यंत तर पश्चिमेकडे पोलिश किनाऱ्यापर्यंत जेथें जेथें जागा मिळेल तेथें तेथें रशियाच्या १६ संस्थानांपैकीं प्रत्येक संस्थानांत हे उद्योगधंदे घर करून बसले असून प्रत्येक प्रांत आपल्या उद्योगधंद्यावर स्वतंत्रपणें लक्ष देत असल्यामुळें या प्रगतींत एक प्रकारची चढाओढ लागलेली दिसते व या चढाओढीचें दृश्य चित्र मॉस्कोच्या औद्योगिक प्रदर्शनांत पहावयास मिळतें.

उद्योगधंद्याबरोबरच रशियानें ऊर्जितावस्थेंत आणलेली दुसरी गोष्ट कोणती असेल तर ती वाहतूक ही होय. कारण वाहतुकीशिवाय कोणत्याहि देशाचे धंदे पुढे येणें शक्य नाहीं. आमचें गुळाचें उत्पादन भरपूर होतें. मोसंबीं बागांतून भरपूर येतात, पण तीं वाहून दूर नेण्यास वॅगन्स मिळत नाहींत हा ओरडा दर वर्षीचा आहे. ही अडचण रशियांत पडत नाहीं. कारण, उद्योगधंद्याबरोबर रेल्वेवाहतूक रशियानें भरपूर वाढविली असून जवळ जवळ ७५००० मैलांच्या प्रदेशांत ती आतां अत्यंत सुव्यवस्थितपणें चालू आहे. याची रचनाच अशी करण्यांत आली आहे कीं, नेमका कोळसा खाणी विभागांतील कोळसा योग्य कारखानदारीचे शहरांत पोहोंचू

शकेल. कोळशाअभावीं गिरण्या बंद ठेवण्याची पाळी तेथील कारखान्यांवर क्वचितच येते. रेल्वे-वाहतुकींत कोळसा विनाकारण खर्चीं पडूं नये म्हणून रशियानें भरपूर विद्युत् उत्पादनाचा उपयोग केला आहे. १४०० मैलांचें रेल्वे रस्त्यावर ही वीज खेळविण्यांत आली असून कोळशावर चालणाऱ्या इंजिनांची निर्मिति आतां थांबविण्यांत आली आहे. या चालू पंचवार्षिक योजनेंत ५०३० मैलांच्या रेल्वे रस्त्यावर विजेचीं इंजिनें धांवूं लागतील. या मुदतींत विजेवर चालणारीं २००० रेल्वे इंजिनें रशिया तयार करूं शकेल असा अंदाज आहे. याशिवाय डिझेलची निर्मिति रशियांत भरपूर असल्यानें त्यावर चालणारीं इंजिनें रशियानें तयार केलीं असून पंधरा हजार मैलांच्या टापूंत तीं वाहतूक करीत आहेत.

समाजवादी समाजरचना म्हणून रशियांतील रेल्वेंतील सुखसोयी अगदीं योग्य तेवढ्याच असतील अशी कल्पना बऱ्याच जणांचीं असते, पण ती अत्यंत चुकीची आहे. मॉस्को ते लेनिनग्राडपर्यंतचा ४०० मैलांचा प्रवास मीं रेल्वेनें त्यांच्या ' स्लिपर्स ' म्हणजे झोपण्याची सोय असलेल्या " रेड ॲरो " तांबडा बाण नांवाच्या गाडींतून केला, पण कोणत्याहि देशांतील रेल्वे डब्यांतील सुखसोयींपेक्षां मला त्या जास्त आरामशीर आढळल्या. रबरी सोफा कुशन्स पद्धतीचे दोन बिछाने प्रत्येक डब्यांत असत. डब्याच्या खिडक्यांवरील पडदे मखमलीचे होते. रेडिओ वाजत होता. ताजे गुच्छ ठेवलेल्या फुलदाण्या भरून वाचण्याच्या टेबलावर ठेवलेल्या होत्या. अशा १३ डब्यांत मिळून एक रशियन गव्हर्नेस व्यवस्था पाहण्यासाठीं होती ती रात्रीहि जागी राहून प्रवाशांच्या सुखसोयी पाहात होती. आपल्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या दरापेक्षां हे दर मात्र सव्वापटीनें जास्त होते. या चारशें मैलांचा प्रवास करावयास मला १२० रुबल्स पडले. पण कोठेंहि न थांबतां लेनिनग्राडपर्यंत प्रवाशांना नेणारी ही गाडी कोणत्याहि भांडवलशाही देशांतील गाडीइतकींच पूर्णपणें ऐषआरामी थाटाची होती. सर्वसाधारण उत्पन्नाच्या प्रवाशाला जेवढ्या जास्तींत जास्त सोयी देतां येतील तेवढ्या देणारी गाडीहि या मार्गावर मीं पाहिली. तेथें बसून जाण्याची सोय होती, पण आपले पहिल्या वर्गाइतक्या सुखसोयी यांत होत्या व मोठ्या आनंदांत पत्ते खेळत रशियन प्रवाशी प्रवास करीत होते.

रशियाचें ऐश्वर्य व सर्वसाधारण माणसाच्या उपयोगाचें मोठें साधन म्हणजे मॉस्को व लेनिनग्राड शहरांत मी पाहिलेली मेट्रो ही जमिनीखालील आगगाडी होय. मॉस्कोच्या परिसरांत जमिनीखालीं १०० ते २०० फुटांचा २० मैलांचा रेल्वे-रस्ता म्हणजे रशियानें एक अत्यंत व्यवस्थित चालविलेली वाहतूक आहे. साधारणपणें तीन आण्यांत या रेल्वेंतून कोठेंहि जातां येतें. अत्यंत स्वच्छ ठेवलेली उत्तम प्रकाशित रेल्वे म्हणजे मॉस्कोच्या कामगार-जीवनाचा एक आधार. साधारणपणें २ मिनिटाला प्रत्येक स्टेशनांत ही गाडी येते. चटकन कामगार आंत शिरतात व अर्ध्या मिनिटांत गाडीचे दरवाजे जसे उघडले तसे विजेनें लागतात. ते झटकन लागत असले तरी अपघात होत नाहींत अगर कोणी धांवत जाऊन गाडी पकडण्याचा प्रयत्न करीत नाहीं. या रेल्वेचा इतका वेग असूनहि अपघाताचें प्रमाण फारच कमी आहे. आणि विशेष म्हणजे या रेल्वेवर सर्व काम करणाऱ्या महिलाच आहेत.

रशियांतील २० कोटी लोकसंख्येला पुरेसें धनधान्य ज्या जमिनींतून निघूं शकेल अशी भूमि रशियाजवळ भरपूर आहे. पण रशियांतील शेतकऱ्यांनीं या भूमीवर पद्धतशीर पीक न काढल्यामुळें तेथेंहि ५० वर्षांपूर्वी भारतासारखीच परिस्थिति होती. तेथील जनता अत्यंत गरिबींत दिवस काढीत होती. पण रशियांतील शेतीची आजची सुधारणा पाहिली कीं तेथील शेतकरी इतर नागरिकांपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहीं. उलट तो अधिक सुखांत असावा, असें निश्चित वाटूं लागतें. झारच्या राजवटींत रशियांतील नागरिक शेतीवर जगत होते. १८ कोटी ९० लक्ष एकर जमीन त्या काळीं लागवडीखालीं होती. पण मालकांचे नोकर म्हणून या जमिनींत राबणारे शेतकरी जेमतेम कसेंबसें दोन वेळां जेवूं शकत. लाज रक्षणापुरतींच वस्त्रें त्यांना मिळत. १०० शेतकऱ्यांत ६५ शेतकरी आमच्या कोंकणच्या शेतकऱ्यासारखे झोपडींतून राहात. पण आतां त्यांची परिस्थिति संपूर्णपणें बदलली आहे. सर्वत्र शेतकऱ्यांची राजवट आतां शेतांतून सुरू झाली असून त्यांच्या कष्टानुसार त्यांना भरपूर धान्य मिळत असून सुखी व संतुष्ट कुटुंबाचीं चित्रें रशियांतील प्रत्येक खेड्यांतून आतां यामुळें दिसूं लागलीं आहेत. याचें सर्व श्रेय रशियाच्या नव्या सामुदायिक शेतीला व तेथील निरनिराळ्या लागवडीच्या पद्धतींना आहे. क्रांतीनंतर दुसऱ्याच वर्षीं रशियांत १६०० शेतकऱ्यांच्या सहकारी संघटना, सरकारी योजनेनुसार तयार झाल्या. त्यानंतर निघालेली सामुदायिक शेतीची योजना रशियांतील शेतकऱ्याला एवढी मानवली कीं, १९३७ अखेर ९३ टक्के शेतकरी या सामुदायिक शेती-योजनेंत सामील झाले. १९५८ सालीं २ कोटी ७० लक्ष टन धान्य रशियन शेतकऱ्यांनीं आपल्या शेतामधून काढलें व हें दरवर्षीपेक्षां ६४ लक्षांनीं जास्त होतें.

या सामुदायिक शेतीचा परिणाम एवढा झाला कीं, १९४० सालीं

१ कोटी शेतकरी या शेती-योजनेंत सामील झाले व त्यांचें उत्पन्न या वेळीं १९१३ च्या उत्पन्नापेक्षां प्रत्येकीं ३॥ टक्क्यांनीं वाढलें होतें. ते सुखी शेतकरी म्हणून पुढें येऊं लागले. त्यांचें शिक्षण होऊं लागलें आणि रशियन राज्यकारभारांतहि ते भाग घेऊं लागले. झोपड्यांतून राहण्या-ऐवजीं छोट्या छोट्या कौलारू घरांतून त्यांनीं राहावयास सुरुवात केली व शेतकऱ्यांचीं मुलें मॉस्कोच्या शेतकी शाळेंत शेतीच्या उच्च शिक्षणासाठीं येऊं लागलीं. पण ही वाढती भरभराट त्यांच्या दैवाला त्या वेळीं पाहवली नाहीं असें दिसतें. दुसऱ्या महायुद्धांत कित्येक शेतांवर काम करणाऱ्या तरुणांना लढाईवर जावें लागलें. रशियांत घुसलेल्या जर्मनांनीं शेतामागून शेतें आपल्या सैन्याच्या तळासाठीं मोकळीं केलीं. त्यांनीं जवळ जवळ ९८००० सामुदायिक शेती-केंद्रें लुटलीं. रशियांतील सामुदायिक शेती करणारीं ७० हजार खेडीं या वेळीं जर्मन अंमलाखालीं होतीं. त्यांनीं तेथील ट्रॅक्टर-देखील युद्धोपयोगी कामासाठीं लावले व शेतांतून निघालेलें धान्य जर्मन सैनिक लुटून नेऊं लागले. जर्मन सैन्य मागें घेण्यांत आल्यानंतर थोडी स्थीरस्थावर होते ना होते तोंच पावसाच्या तुटवड्यामुळें १९४६ सालीं शेतीचें नुकसान झालें. त्या वेळीं पाणीपुरवठ्याच्या योजना पूर्ण झाल्या नव्हत्या. पण यांतूनहि मान वर काढून रशियानें केलेली गेल्या १०–११ वर्षांतील प्रगति केव्हांहि भूषणावह आहे व त्यामुळें आजचा नवा रशिया आपल्या देशाला पुरेंसें धान्य ठेवून जगांतील तुटीच्या देशाला धान्यपुरवठा करावयास तयार आहे.

सहकारी शेतीच्या पद्धतीबरोबरच रशियांत "स्टेट फार्म्स" नांवाचीं पूर्ण सरकारी फार्म्स आहेत. या शेतीवसाहतीवर नुसतें धान्यच निघत नाहीं तर दूधदुभतें, कोंबड्या, बकरीं, कापूस, लोंकर, भाजी व फळें यांची एकत्रित निर्मिति करण्याची सोय केलेली असते. या शेतीवसाहती जमीनदारांकडून मिळालेली जमीन व तेथें ओसाड जमिनींतून निर्माण केलेली शेती यांवर निर्माण झाल्या असून त्यांचें जुनें रूप सरकारी खर्चानें पगारी शेतकरी माणसें ठेवून पूर्णपणें बदलून टाकलेलें आहे. याच शेती वसाहतीवर पिकासंबंधीं निरनिराळे प्रयोग करण्यांत येतात व ते पाहण्यासाठीं दूरदूरच्या शेतकऱ्यांना मुद्दाम

बोलाविलें जातें. या ठिकाणीं उत्तम प्रतीचें बीं-बियाणें, कोंबड्या, गुरें व शेळ्यांच्या नवनवीन जातींची पैदास होत असते. अशा तऱ्हेच्या ५००० वर शेतीवसाहती रशियांत असून त्यांनीं जवळजवळ ३० कोटी एकर जमीन व्यापलेली आहे. या वसाहतींत आधुनिक यंत्रासामुग्री व रशियांत शेतीसंबंधींचा लागणारा प्रत्येक प्रयोग प्रत्यक्षांत उतरविला जातो. या वसाहतीवर एक डायरेक्टर असतो. तो शेती तज्ज्ञ असतो व त्याची नेमणूक सरकारकडून होत असते. शेतीवर काम करणाऱ्या कामगारांना कारखान्यांत काम करणाऱ्या कामगाराप्रमाणें पगार असतो. रजेचे व इतर सुखसोयीचे कारखान्याचे सर्व नियम या शेती-कामगारांनाहि लागू असतात. शिवाय हंगामांत ज्या वेळीं या कामगारांना जास्त काम करावें लागतें त्या वेळीं त्यांना जादा पगार देण्यांत येतो. याशिवाय एखादा ट्रॅक्टर-ड्रायव्हर जर नेहमींच्या अपेक्षित कामापेक्षां जास्त काम करील अगर उत्तम नांगरट ठराविक वेळांत करील, तर त्यालाहि जादा बक्षिस देण्याची प्रथा या शेतीवर आहे. अशा चढाओढीमुळें नेहमींच्या पगारापेक्षांहि २० ते ३० टक्के जादा पगार हुशार कामगार मिळवूं शकतात.

या शेतीवसाहतीची नीट कल्पना वसाहतीला भेट दिल्याशिवाय येणार नाहीं, असें सांगण्यांत आल्यावरून अशाच एका नांवाजलेल्या फार्मला आम्हीं भेट दिली. या वसाहतींत ४४२१३ एकर जमीन होती. त्यांतील ३० हजार एकर जमीन लागवडीखालीं होती. यांत प्रामुख्यानें गहूं व मका लावलेला होता. उत्तम जातीचीं सूर्यफुलें एका बाजूला डोलत होतीं, तर १५०० गुरें या फार्मवर होतीं. २००० डुकरें व ४००० मेंढ्या व कित्येक कोंबड्या या वसाहतींत वाढत होत्या. या आंकड्यांवरून या फार्मची कल्पना येईल. वसाहतींतील ८० टक्के काम यंत्रानें करण्याची सोय होती. ६० ट्रॅक्टर्स या शेतीसाठीं ठेविलेले होते. शिवाय तयार होणारें धान्य वाहून नेण्यासाठीं व व इतर सामानाची ने-आण करण्यासाठीं ३० लॉऱ्या वसाहतीवर होत्या. ११०० किलोवॅट वीज उत्पादन-केन्द्रें येथें मुद्दाम बसविलेलीं होतीं. या केन्द्रांवर १ बुशेल गहूं पैदाशीला ४ रूबल ( म्हणजे आजचे ४।। रुपये ) खर्च येत होता असें सांगण्यांत आलें. एकरामागें २८ बुशेल गहूं येथें निघतो व गेलीं ६ वर्षें ज्याला आपण भरपूर पीक म्हणतों असें पीक या वसाहतींत

काढल्याचें सांगण्यांत आलें. शेतीवर काम करणाऱ्या शेतकऱ्यांचें उत्पन्न चांगलें असल्यामुळें त्यांचीं छोटीं छोटीं, पण मॉस्कोप्रमाणेंच सर्व आधुनिक साधनसामुग्रीनें परिपूर्ण अशीं घरें येथें थाटलेलीं होतीं. या वसाहतींत सायंकाळीं आनंदांत वेळ घालविण्यासाठीं क्लब होता. एक सिनेमागृह होतें, एक लायब्ररी होती व रशियनांना नेहमीं आवडणारे पार्कहि गांवाशेजारींच वसविलेलें होतें. इतर शहरांप्रमाणें ही वसाहत म्हणजे एक शहरच वाटे व तेथें शाळा व हॉस्पिटल्स तर रशियन शहराप्रमाणें पूर्ण आधुनिक पद्धतीनें थाटलेलीं असून त्यांत एक्स-रे पासून मोठमोठालीं ऑपरेशन्स करण्याची सोय होती. अशा मोठाल्या शेती-वसाहतींतून वर्षाकांठीं १६ ते २४ हजार टन धान्य पैदास होते, असें सांगण्यांत आलें. मॉस्को शहराला भाजीपाला पुरविणारें 'माफिनो स्टेट फार्म' नांवाचें एक फारच मोठें फार्म असून तेथील ताजा भाजीपाला मॉस्को शहरांत रोज मोटारीनें भरभरून येतो. या शेती-वसाहतींना रशियन शेती योजनांतून फार मोठें स्थान असून १९५४ ते ५६ च्या दरम्यान रशियांतील मोकळ्या व ओसाड पडलेल्या जमिनीवर एकूण ४२० मोठ्या शेती-वसाहती वसविण्यांत आल्या आहेत. ही सर्व जमीन रासायनिक खतें व यंत्रसामुग्री यांच्या वापरामुळें उत्तम पिकें देत आहे. त्यांचा फायदा देशाला पुरेपूर झालेला आहे.

सामुदाइक शेती हा रशियांतील शेतीचा प्रयोग भारताच्या दृष्टीनें मला विशेष महत्त्वाचा वाटला. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार शेत पिकविणाऱ्या माणसांच्या ताब्यांत शेती देऊन (त्याची ती पिकविण्याची पात्रता आहे किंवा नाहीं हें न पाहतां) त्याला उत्पन्न काढावयास पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा प्रयोग आमच्याकडे सुरू झाला आहे. पण त्या प्रयोगांत व रशियांतील प्रयोगांत महत्त्वाचें अंतर आहे. निर्धन अशिक्षित अशा शेतकऱ्याच्या ताब्यांत तेथें रशियन सरकारनें जमिनी दिलेल्या नाहींत तर त्यावर अजून सरकारी मालकी आहे. आपल्या सहकारी संस्थांप्रमाणें तेथें शेतकऱ्यांच्या सामुदाइक संस्था आहेत. या संस्थांच्या ताब्यांत कसण्यासाठीं आपल्या ताब्यांतील मालकीची शेतजमीन सरकार देते. ती जमीन नीट कसली गेली नाहीं, तर ती काढून घेण्याचा अधिकार सरकारला असतो. अशा ८७५०० सामुदाइक शेतीच्या संघटना असून त्या प्रत्येक

संघटनेजवळ १५००० एकर जमीन पिकविण्यासाठीं दिलेली आहे. या फार्मवरील सर्व इमारती व सामुदाइक शेतीचीं साधनें या संस्थेच्या मालकीचीं असतात व संस्थेचे सभासद होणाऱ्या शेतकऱ्याला २० ते ४० रुबल्स प्रवेश-फी भरून संस्थेचे सभासद होतां येतें. सामुदाइक शेतींत अडीच एकरांपर्यंत एक एक गट पाडलेले असतात. हा प्रत्येक विभाग किती एकरांचा पाडावयाचा हें सर्व सामुदाइक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे सभेंत ठरविलें जातें. या शेतावर बांधण्यांत येणारीं घरें, गुरेढोरें, कोंबड्या व शेतकऱ्यांचीं सर्वसाधारण हत्यारें मात्र त्या त्या शेतकऱ्यांचें वैयक्तिक मालकीचीं असतात. परंतु घर केवढें बांधावें, गुरेढोरें किती ठेवावीं, कोणत्या जमिनींत किती व कोणतें धान्य लावावें याबद्दलचे सर्व निर्णय या सामुदाइक शेती सभासदांच्या सभेंत घेतला जातो. याशिवाय सामुदाइक स्वरूपाच्या कित्येक गोष्टी या फार्मवर कराव्या लागतात. उदाहरणार्थ, शाळा, हॉस्पिटलें वगैरे त्यांना येणारा खर्च शेतांतील १५ ते २० टक्के उत्पन्न बाजूला काढून ठेवून त्यांतून केला जातो. या फार्मवरील येणाऱ्या उत्पन्नांतून असा सामुदाइक फंड बाजूला काढून नंतर प्रत्येकाच्या चरितार्थासाठीं त्याचे कष्टाखालीं असलेल्या फार्मवरील कामानुसार तें वांटलें जातें. एकाद्याच्या घरांत खपणारीं चार माणसें असतील तर तो आपले लागवडीसाठीं पाडलेल्या एका विभागाऐवजीं दोन विभाग मागून घेतो. १९५५ सालचें या सामुदाइक शेतीवाल्यांचे ताळेबंद पाहतां या शेतीवर १८०० कोटी रुबल्स भांडवल गुंतविण्यांत आलें आहे. पांच वर्षांपूर्वीं हें भांडवल ११०० कोटी रुबल्सच्या वर नव्हतें. यावरून या क्षेत्रांतहि रशियानें किती प्रगति केली आहे याची कल्पना येते.

या सामुदायिक शेतीची व्यवस्था संघटनेच्या सभासदांकरवीं लाविली जाते. त्यांचेमध्यें पैसे खाणारे शेतकरी निघत नाहींत. कारण, त्यांवर मोठें कांटेतोल सरकारी नियंत्रण असतें. या शेतीवर निवडणुका घेऊन एक व्यवस्थापक मंडळ निवडलें जातें व तें बोर्डच आपला अध्यक्ष निवडीत असतें. याशिवाय चांगल्या शिक्षित शेतकऱ्यांचें ऑडिटिंग कमिशन असतें. या ऑडिटिंग कमिशनचा सरकारी देखरेख मंडळाशीं संबंध असतो. तसेंच सामुदायिक शेतीचा अध्यक्ष म्हणून ज्याची निवड होते. तो बहुतके शेतकी शाखेंतील

चांगला पदवीधर असतो. या अध्यक्षाच्या नेतृत्वाखालीं बोर्ड काम करतें. व सर्वसाधारण सभेंत पिकाची योजना आंखली जाते. तसेंच कोणत्या शेतकऱ्याला त्यांनीं पिकविलेल्या शेतींतील किती भाग द्यावयाचा हेंहि हें बोर्डच ठरवीत असतें. आज बऱ्याच वर्षांच्या अनुभवानंतर कोणत्या कामाबद्दल किती उत्पन्न व्यावें यासंबंधींचे सामुदायिक शेतीचे नियम ठरविण्यांत आले असून, दर दिवशीं प्रत्येक माणसानें किती काम केलें पाहिजे, त्यांत वैयक्तिक किती असावें व सामुदाइक किती असावें याचें प्रमाणहि ठरवून देण्यांत आलेलें असतें.

सामुदाइक शेतीचे विभाग पाडून जरी ते कसण्यास देण्यांत येत असले तरी या शेतींत पिकणाऱ्या धान्यावर सामुदाइक शेती संघटनेची मालकी असते व या संघटना सरकारला हें धान्य ठरलेल्या किंमतीला विकीत असतात. कारण, धान्य विकत घेणें हें काम रशियन सरकार करतें. यानंतर वापरलेल्या यंत्रसामुग्रीचें भाडें या उत्पन्नांतून सरकारला दिलें जातें. यानंतर मात्र शेतांतील जें उत्पन्न शिल्लक राहील तें सर्व शेत कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीचें असतें. एखाद्या शेतकऱ्याच्या वांट्यास एखाद्या वर्षीं थोडें धान्य आवर्षणामुळें कमी आलें अगर इतर कांहीं कारणांमुळें नुकसानी झाली तर त्या शेतकऱ्याला उपाशी राहण्याची पाळी या सामुदाइक शेतींत येत नाहीं. कारण त्याची काळजी सामुदाइक शेतींत घेतली जाते. एवढेंच नव्हे तर या सामुदाइक शेतींत चढाओढ निर्माण व्हावी म्हणून एक प्रकारची चढाओढहि सरकारनें ठेविलेली असते व जास्त पीक काढणाऱ्या शेतीला बक्षीस दिलें जातें. आमची जमीन वाईट म्हणून आमच्या शेतींत कितीहि कष्ट केले तरी उत्पन्न कमीच येणार असें बोलून तेथें चालत नाहीं. कमी पीक देणाऱ्या प्रत्येक जमिनीची पाहणी कसोशीनें शेतीवाडींत केली जाते, नंतर परिस्थिति सुधारण्यासाठीं योग्य ते उपाय सुचविले जातात. रशियांतील सर्वच सामुदाइक शेती-केन्द्रें उत्तम उत्पन्न देतात असें नाहीं, कांहीं फार्म्स जेमतेम पीक देतात, पण त्यावर दहा दहा वर्षे प्रयोग केले जातात. शेतांतील उत्पन्नानुसार तेथील सुखसोयी असतात. कांहीं ठिकाणीं टेलिफोन व इतर सुखसोयी असतात. कांहीं झालें तरी सामुदायिक शेतींतील ऊर्जितावस्था तेथील शेतकऱ्यांच्या कर्तृत्वावर

अवलंबून असते व यासाठीं हे शेतकरी कर्तबगार व व्यवस्थित काम करणारे कसे होतील या गोष्टीकडे रशियन सरकारचें लक्ष असतें यामुळें कोणी मागासलेला राहात नाहीं व शेतीचें उत्पन्न वाढत राहतें. आज रशियांत जगांतील कोणत्याहि देशानें पाहाण्यासारखा शेतीचा प्रयोग केला आहे. समाजवादी समाजरचना येथें पाहावयास मिळते. तेथें वैयक्तिक मताला योग्य तेवढाच मान आहे. पण सर्व सामुदायिक जबाबदारी अंगावर घेतांना बहुमत व अध्यक्षांचा निर्णय अखेरचा मानावा लागत असल्यानें भांडणाचे प्रसंग क्वचित् येतात.

चांगला पदवीधर असतो. या अध्यक्षाच्या नेतृत्वाखालीं बोर्ड काम करतें. व सर्वसाधारण सभेंत पिकाची योजना आंखली जाते. तसेंच कोणत्या शेतकऱ्याला त्यांनीं पिकविलेल्या शेतींतील किती भाग द्यावयाचा हेंहि हें बोर्डच ठरवीत असतें. आज बऱ्याच वर्षांच्या अनुभवानंतर कोणत्या कामाबद्दल किती उत्पन्न घ्यावें यासंबंधींचे सामुदायिक शेतीचे नियम ठरविण्यांत आले असून, दर दिवशीं प्रत्येक माणसानें किती काम केलें पाहिजे, त्यांत वैयक्तिक किती असावें व सामुदाइक किती असावें याचें प्रमाणहि ठरवून देण्यांत आलेलें असतें.

सामुदाइक शेतीचे विभाग पाडून जरी ते कसण्यास देण्यांत येत असले तरी या शेतींत पिकणाऱ्या धान्यावर सामुदाइक शेती संघटनेची मालकी असते व या संघटना सरकारला हें धान्य ठरलेल्या किंमतीला विकीत असतात. कारण, धान्य विकत घेणें हें काम रशियन सरकार करतें. यानंतर वापरलेल्या यंत्रसामुग्रीचें भाडें या उत्पन्नांतून सरकारला दिलें जातें. यानंतर मात्र शेतांतील जें उत्पन्न शिल्लक राहील तें सर्व शेत कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीचें असतें. एखाद्या शेतकऱ्याच्या वांट्यास एखाद्या वर्षीं थोडें धान्य आवर्षणामुळें कमी आलें अगर इतर कांहीं कारणांमुळें नुकसानी झाली तर त्या शेतकऱ्याला उपाशी राहण्याची पाळी या सामुदाइक शेतींत येत नाहीं. कारण त्याची काळजी सामुदाइक शेतींत घेतली जाते. एवढेंच नव्हे तर या सामुदाइक शेतींत चढाओढ निर्माण व्हावी म्हणून एक प्रकारची चढाओढहि सरकारनें ठेविलेली असते व जास्त पीक काढणाऱ्या शेतीला बक्षीस दिलें जातें. आमची जमीन वाईट म्हणून आमच्या शेतींत कितीहि कष्ट केले तरी उत्पन्न कमीच येणार असें बोलून तेथें चालत नाहीं. कमी पीक देणाऱ्या प्रत्येक जमिनीची पाहणी कसोशीनें शेतीवाडींत केली जाते, नंतर परिस्थिति सुधारण्यासाठीं योग्य ते उपाय सुचविले जातात. रशियांतील सर्वच सामुदाइक शेती-केन्द्रें उत्तम उत्पन्न देतात असें नाहीं, कांहीं फार्म्स जेमतेम पीक देतात, पण त्यावर दहा दहा वर्षे प्रयोग केले जातात. शेतांतील उत्पन्नानुसार तेथील सुखसोयी असतात. कांहीं ठिकाणीं टेलिफोन व इतर सुखसोयी असतात. कांहीं झालें तरी सामुदायिक शेतींतील ऊर्जितावस्था तेथील शेतकऱ्यांच्या कर्तृत्वावर

अवलंबून असते व यासाठीं हे शेतकरी कर्तबगार व व्यवस्थित काम करणारे कसे होतील या गोष्टीकडे रशियन सरकारचें लक्ष असतें यामुळें कोणी मागासलेला राहात नाहीं व शेतीचें उत्पन्न वाढत राहतें. आज रशियांत जगांतील कोणत्याहि देशानें पाहाण्यासारखा शेतीचा प्रयोग केला आहे. समाजवादी समाजरचना येथें पाहावयास मिळते. तेथें वैयक्तिक मताला योग्य तेवढाच मान आहे. पण सर्व सामुदायिक जबाबदारी अंगावर घेतांना बहुमत व अध्यक्षांचा निर्णय अखेरचा मानावा लागत असल्यानें भांडणाचे प्रसंग क्वचित् येतात.

# ९ : सांस्कृतिक प्रगति

सर्वसाधारणपणें मानवी मनाचा कल करमणुकीकडे जेव्हां अधिक वळतो त्या वेळीं माणसाला मनःस्वास्थ्य अधिक असतें असें समजावें, असा समाजशास्त्राचा नियम आहे. हा नियम रशियाच्या बाबतींत तरी खरा असावा असें वाटतें. गाणें, नाच, सिनेमा, नाटकें व सर्कस यांचे शोकीन लोक रशियाइतके इतर देशांत क्वचितच सांपडतील. आठ तास भरपूर काम केल्यानंतर इतरत्र मन गुंतविण्याचें एक आवश्यक साधन म्हणून रशियन मनुष्य करमणुकीकडे पाहातो, त्यामुळें त्याला करमणूक ही गोष्ट जेवणाखाण्याइतकींच आवश्यक वाटते. मॉस्को व लेनिनग्राड शहरांत जेवढे दिवस मी काढले त्या दिवशीं कोणत्या तरी करमणुकीच्या कार्यक्रमाला जाऊन त्या करमणुकींतील विविधता प्रत्यक्ष डोळ्यांनीं न्याहाळावयाची हा आमचा कार्यक्रम असे. सिनेमा, नाटक, नाच अगर सर्कस या कोणत्याहि ठिकाणीं ज्या ज्या वेळीं आम्ही गेलों त्या त्या वेळीं तिकिटें मिळविण्याची आम्हांला नेहमीं पंचाईत पडत असे. कारण, मॉस्कोंतील थिएटरांतून अगर सर्कशीच्या तंबूंतून कमी-जास्त दराचीं तिकिटें नसतात. जो प्रथम येऊन तिकिटें खरेदी करतो त्याला पुढचीं तिकिटें मिळतात व तोच तेथें बसूं शकतो, मग एखाद्या बड्या अधिकाऱ्याशेजारीं त्याला स्वयंपाक करून वाढणारी स्वयंपाकीण बाईलाहि खुर्ची मिळूं शकेल. यामुळें भारतांत ज्यांना आज पहिल्या दर्जाचे प्रतिष्ठित म्हणून समजलें जातें त्यांना, रशियन थिएटरांत मिळेल त्या खुर्चीवर बसावें लागल्यामुळें या समाजवादी राष्ट्रांतील एक निराळा अनुभव अनुभवावयास मिळाला. आमच्याबरोबरचे कोट्यधीश, व्यापारी व भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांचे चिटणीस, राजकुमारी अमृतकुंवर यांच्यासारख्या माजी मंत्री, डॉ. हृदयनाथ कुंझरू यांच्यासारखे पहिल्या दर्जाचे पुढारी यांना रशियन कामगाराशेजारीं अगर मिळेल त्या जागेवर बसून समाजवादी समतेच्या

तत्त्वानुसार नाटक अगर सिनेमा पाहावा लागे. कोणत्याहि खेळाला अगर कार्यक्रमाला गर्दी नाहीं असा कार्यक्रम मला रशियांत कोठें आढळलाच नाहीं. यावरून आहेत तीं सिनेमागृहें अगर थिएटरें जनतेच्या कलाविषयक आवडीला कमी पडतात किंवा काय अशी शंका मनांत आल्याशिवाय राहात नाहीं.

रशियांत नाट्य, नृत्य व संगीत या तिन्ही कलांचा अभ्यास अत्यंत काळजीपूर्वक होत असावा असें एकूण परिस्थितीवरून वाटते. विशेषतः "बॅले डान्सिग"च्या बाबतींत रशियन कलाकारांनीं जें यश मिळविलें आहे तें पाहातां नृत्यांत रशिया सर्व जगापेक्षां फार पुढें आहे असें वाटूं लागतें. तीनतीन तासांचीं नाटकें तोंडांतून एक शब्दहि न काढतां नुसतीं अभिनय व नृत्याच्या सहाय्यानें वठवून लोकांना गुंगवून ठेवण्याचें कार्य रशियन कलाकार करूं शकतात. नेपथ्य, सजावट, प्रकाशांची योजना व स्टेजवर नानाविध देखावे वठविण्याच्या बाबतींत रशिया इटालियन नाट्यापेक्षां फारसा पुढें गेलेला आहे असें मला वाटत नाहीं. इटालियन कलाकारांचीं कांहीं नाटकें मीं पाहिलीं आहेत. तेथें सायंकाळ दाखवितांना आकाशांतील प्रकाशाचें परिवर्तन पाहावयास प्रत्यक्ष मिळतें. रशियांत नेपथ्य, कला व नाट्य-सजावट तितकीशी पुढें गेलेली दिसली नाहीं. रशियांत तशा तऱ्हेचें दृश्य पाहावयास मिळत नाहीं. रशियन रंगभूमीवरील नेपथ्यरचना रशियन जनतेइतकीच मला साधी वाटली.

पण सोव्हिएट जनतेला नाटकाचें एवढें वेड आहे कीं, जवळ जवळ ५०० नाटक कंपन्या निरनिराळ्या ठिकाणीं आपले खेळ करण्यासाठीं रशियांतून वर्षानुवर्षे हिंडत असतात. १९५५ सालीं त्यांचीं नाटकें ७ कोटी ८० लक्ष लोकांनीं पाहिल्याचा उल्लेख त्यांच्या अहवालांत आहे. रशियांतील नट व कंपन्या यांचा खर्च इतर उद्योगधंद्यांप्रमाणें सरकारच करते. त्याला कामगारांचे कायदे लागूं असतात. एवढेंच काय पण म्हातारपणीं कलाकारांना त्याच्या दर्जाप्रमाणें आयुष्य लाभावें म्हणून कलाकारांसाठीं स्वतंत्र वसाहती रशियन सरकारनें स्थापन केल्या असून तेथें रशियन नाटककार, नट, कवि, ग्रंथकार वगैरे, राष्ट्राचे जबाबदार नागरिक म्हणून राहतांना दिसतात. ज्यांचीं पुस्तकें व कलाकृति लक्षावधि लोकांनीं वाचल्या असतील असें कित्येक वृद्ध

लेखक या वसाहतींत आपलें राहिलेलें आयुष्य शांततेनें काढतांना दिसतात. आपल्या कलावंताची काळजी रशियाइतकी इतर राष्ट्रांत क्वचितच घेतली जात असेल.

नाटकाच्या खालोखाल रशियांत रेडिओ, टेलिव्हिजन व सिनेमा यांनीं आपला पगडा जनतेच्या मनावर चांगलाच बसविला आहे. रशियांत ३० हजार रेडिओ-केन्द्रें आहेत. लाखों रेडिओ सेटस् रशियन जनता घरोघर वापरीत असून रेडिओ ही सर्वसाधारण आवश्यक गोष्ट म्हणून तिच्याकडे पाहिलें जातें. रशियांतील ४६ भाषांतून रेडिओचे कार्यक्रम होतात, तर ३० परराष्ट्रीय भाषांतून रेडिओवर कार्यक्रम चालू ठेवण्याची सोय रशियांत करण्यांत आलेली आहे. याप्रमाणें टेलिव्हिजनचीं केन्द्रें तीन वर्षांपूर्वी फक्त मॉस्कोंत लेनिनग्राड येथेंच होतीं. पण आतां कीव्ह, खारकोव्ह, रिगा, तालीनीन, स्व्हानिव्हस्कमिन्स्क, ओमस्क, व्हलिडिव्होस्टाक, तोमास्क गॉर्की, जिफलीस, बाकू येथें केन्द्रें आहेत. आणखी कांहीं शहरांतून टेलिव्हिजन केन्द्रें उघडण्यांत येणार असून ही संख्या १९६० सालीं ७५ वर जाईल असा अंदाज आहे. टेम्प, अव्हनगार्ड व एकरन या तीन कंपन्यांच्या नांवानें रशियांत टेलिव्हिजन सेटस विकले जातात. त्या कंपन्या घरांत योग्य अशा प्रोजेक्टरचे टेलिव्हिजन सेट लागेल तेवढे बनवूं शकतात व त्याला रशियांत बरीच मागणी आहे.

रशियांत सिनेमा थिएटरांची संख्या ६०,००० वर आहे व त्यांतील ४६७०० शहराबाहेर निरनिराळ्या खेडेगांवांतून अगर सामुदाइक शेतीवर आहेत. या सर्व थिएटरांना पुरेसे बोलपट रशियन कंपन्या काढूं शकतात. मीं जे रशियन बोलपट पाहिले त्यांत रंगीत फोटोग्राफीबरोबर प्रचाराची जेवढी संधि मिळेल तेवढी साधण्याचे प्रयत्न रशियन बोलपटांतून झालेले असतात. आपल्या इकडील बोलपटापेक्षां ते थोडे जलद दाखविले जातात. कांहीं वेळ तर आपणांस त्यांतील गोष्टी अति वेगामुळें कळणें कठीण जातें. रशियन थिएटरें जनतेची आवड लक्षांत घेतां कमी पडतात व त्याबरोबर बोलपटांचा तुटवडाहि पडतो असा आक्षेप मॉस्कोंत तरी ऐकावयास मिळाला. कांहीं परराष्ट्रीय बोलपटहि दाखविण्याची सोय रशियांत आहे. मधून मधून भाषा कळत नसली तरी हिंदी बोलपट तेथें दाखवितात.

आवारा, किस्मत हे बोलपट तेथें फार गाजले. याशिवाय निरनिराळ्या छोट्या–मोठ्या खाजगी क्लबांतून बोलपट दाखविण्याची सोय रशियांत आहे. साधारणपणें वर्षात प्रत्येक रशियन मनुष्य कमींत कमी बारा तरी बोलपट पाहातो असा अनुभव आहे.

ज्याला ऑपेरा या नांवानें संबोधलें जातें. त्या गायकांच्या कंपन्या रशियांत बऱ्याच आहेत. गायनाचें परीपूर्ण शिक्षण घेतलेले पदवीधर ५ लक्ष गायक तेथें आहेत व हौशी गायकांच्या ७० कंपन्या निरनिराळ्या ठिकाणीं आपले गायनाचे प्रयोग करीत असतात. ज्याला आपण आपल्याकडे लोकनाट्य अगर तमाशे म्हणतों तसाहि एक प्रकार रशियन खेड्यांतून पाहावयास मिळतो व या कलाकारांची संख्या ३५००० च्या घरांत आहे, त्यांच्या प्रयोगालाहि रशियन खेड्यांतच नव्हे तर शहरची जनताहि चांगली जमते.

कला म्हटली कीं तिच्याकडे पाहण्याची सोव्हिएट नागरिकांची दृष्टि मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते. तेथें जात, वय, राष्ट्र हें ते जाणत नाहींत. भारतांतील बोलपटांत झळकणारे राजकपूर व नर्गीस हीं दोन नावें तेथें सर्वांच्या तोंडीं दिसलीं, तर हिंदी बोलपटांतील राजकपूरचीं गाणीं रशियन कारखान्यांतून सुट्टीचे वेळीं ग्रामोफोनवर लाविलेलीं आम्हीं ऐकलीं. रशियन नागरिकांचा जागतिक कलाकारांविषयींचा दृष्टिकोन व जगाचा त्यांच्याविषयींचा दृष्टिकोन आतां बदलूं लागला आहे. रशियांतील इंग्रजी नाटकें करणाऱ्या नाटक मंडळ्या आतां निरनिराळ्या देशांतून प्रवास करूं लागल्या आहेत. व्हायोलनिस्ट डी. ऑईस्ट्रा, पियानोवादक ई. गिलेल्स हे अमेरिका गाजवून आले. युगोस्लाव्हिया, ब्रिटन, फ्रान्स व नॉर्वेतहि रशियन नर्तक आतां जाऊं लागले असून रशियांत गाजलेल्या बोल्शेव्हिक थिएटर ग्रुप तर ब्रिटनसारख्या देशांत चांगलें नांव मिळवून आला. राजकीय क्षेत्रांत ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स हे रशियाला पाण्यांत पाहात असले तरी रशियन कलाकारांनीं मात्र हें शत्रुत्व त्यांना आपल्या कलेमुळें विसरावयास लाविलें आहे. १९५६ सालीं २२० परराष्ट्रीय खेळाडूंचे संघ रशियांत आले, तर रशियांतील १९१ संघटना परदेशांत निरनिराळे खेळ खेळण्यासाठीं गेल्या होत्या. बोल्शेव्हिक थिएटर्सचे नृत्यकार्यक्रम जगांतील सर्वच देशांतून नांवाजलें जात आहेत. रशियांत राज्यकर्त्यांइतकाच कवि,

ग्रंथकार, नाटककार आणि नट यांना मान मिळतो. याचें प्रतीक मॉस्को व लेनिनग्राडच्या रस्त्यांरस्त्यांतून पाहावयास मिळतें. मॉस्कोच्या बहुतेक चौकांतील पुतळे रशियन ग्रंथकार, कवि, नाटककाराचे व चांगले काम केलेल्या नगरपिते व नगराध्यक्ष यांचे आहेत. गोगाले, पुष्कीन, लर्मान्टोव्ह, चेकोव्ह, साल्दीकोव्ह, शेरड्रीन, ग्लिन्का, चेकोव्हस्की, सुरीकोव्ह, रिपीन वगैरे लेखक रशियन जनतेंत ज्याच्या त्याच्या तोंडीं इतके झाले आहेत कीं, सर्वसाधारण कामगारहि त्यांच्या पुस्तकाचें अवीट गोडीचें वर्णन मोठें रंगून करतो. पुष्कीन या लेखकाचीं पुस्तकें ८१ भाषांतून भाषांतरित झालीं असून त्याच्या आतांपर्यंत ७ कोटी ३० लक्ष प्रती खपल्या आहेत. १९१८ पासून १९५६ पर्यंतच्या काळांत मावि‍झम गॉर्की या रशियन ग्रंथकाराचीं पुस्तकें ७५ भाषांतून प्रसिद्ध झालीं व त्यांच्या ८ कोटी ५० लक्ष प्रती खपल्या असाव्या. रशियन लेखक व परक्या भाषा जाणणारे रशियन्स हे परक्या भाषेंतील सौन्दर्य आपल्या भाषेंत आणण्यासाठीं एवढें झटत असतात कीं त्यासाठीं ते वाटेल तें करतील. आंतरराष्ट्रीय कॉपीराइट नियमाची पर्वा त्यांना नसते. मिळेल तें पुस्तक आपल्या भाषेंत प्रथम आणावें एवढेंच त्यांच्यापुढें या वेळीं असतें. फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, अमेरिका, इटली, चीन व भारतांतील बहुतेक प्रमुख ग्रंथकारांचीं पुस्तकें यापूर्वीच रशियन भाषेंत भाषांतरित झालीं असून १७०० परराष्ट्रीय लेखकांचीं पुस्तकें रशियांतील ५३ भाषांतून आतांपर्यंत भाषांतरित केलीं गेलीं आहेत. नागरी लिपि तर रशियांत मोनोटाईपवर कंपोज करण्याची सोय नुकतीच झाली असून कित्येक रशियन लेखकांचीं पुस्तकें हिंदींत भाषांतरित करून तीं भारतांत पाठविण्याचे प्रयत्न होत आहेत.

नुसत्या नव्या ग्रंथकाराचेच ग्रंथ रशिया प्रसिद्ध करीत आहे असें नाहीं, तर शेक्सपियर, डॅनियल डेफो, चार्लस डिकन्स वगैरे गाजलेले युरोपियन् ग्रंथकारांचीं पुस्तकें आतां रशियन भाषेंतून भाषांतरित केलीं जात असून हे जुने वाङ्मयीन सौंदर्यहि आपल्या नागरिकापासून दूर राहूं नये अशी रशियन राज्यकर्त्यांची इच्छा दिसते, व त्यासाठीं परदेशांतील भाषातज्ञ भरपूर पैसे देऊन रशियांत आणण्यांत आले आहेत. महाराष्ट्रीय मंडळींपैकीं यशवन्त उमराणीकर व त्यांच्या पत्नी सौ. विजया उमराणीकर हीं

पतिपत्नी आज मॉस्कोंत हिंदी भाषांतरकार म्हणून राहात आहेत. सोळा पानांचा फॉर्म हिंदी भाषेचा रशियन अगर इंग्रजी भाषेंत भाषांतर करून दिला कीं, त्यांत त्यांना साधारणपणें ४०० ते ५०० रुबल्सपर्यंत मिळतात. यावरून भाषांतराला किती मान या ठिकाणीं आहे याची कल्पना येते.

रशियन वृत्तपत्रसृष्टि हा एक माझा आवडीचा विषय म्हणून मी जरा औत्सुक्यानें या गोष्टीकडे पाहिलें. रशियांत ५७ भाषांतून वृत्तपत्रें छापलीं जातात व त्या सर्वांची मालकी सरकारकडे असते. रशियासंबंधीं काय लिहावयाचें आणि जनतेपुढें व परकीयांपुढें या पत्रांतून काय ठेवावयाचें हें जरी ठरवून हीं पत्रें प्रकाशित केलीं जात असलीं तरी या वृत्तपत्रांच्या अंगीं जनतेचीं मनें ओढून घेण्याचें सामर्थ्य निश्चित आहे. रशियांत वयांत आलेला प्रत्येक मनुष्य वृत्तपत्र वाचतो, मग तो शेतकरी असो, कामगार असो अगर पुढारी असो. वृत्तपत्रांवरूनच आपल्या देशाच्या हालचाली त्याला कळत असतात. आपल्या देशांत पाहुणे कोण आले, आयसेनहोव्हर, पं. नेहरू यांचे रशियासंबंधीं काढलेले उद्‌गार या पत्रांतून वाचावयास मिळतात व त्याबरोबर रशियन पुढाऱ्यांचीं त्या उद्‌गाराबाबतचीं मतें दिलेलीं असतात. मॉस्कोंतील टास व इझवेस्तिया या दोन्हीं पत्रांच्या कचेरीला आम्ही मुद्दाम भेटी दिल्या. प्रवदा दैनिक– रशियांत या पत्राला प्रावदा म्हणतात– दरदिवशीं ५० लक्ष प्रती छापलें जातें तर इझवेस्तिया पत्र ३५ लाख निघतें. मॉस्कोंतील हीं दोन मोठीं वृत्तपत्रें म्हणजे रशियन राष्ट्राचें जीवन असतें. यांत येणाऱ्या विषयावर रशियन नागरिकांचीं हजारों पत्रें संपादकांना येतात व त्यावरून रशियन जनतेचीं खरीं मतें व तक्रारी वृत्तपत्रांना कळतात. तीं छापलीं जातात असें नाहीं. पण येणाऱ्या प्रत्येक पत्रांतील तक्रार अगर सूचना यांचा विचार संपादक नेहमीं करीत असतात. यांत अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारी असल्यास त्यांचीहि चौकशी त्यांच्या अधिकाऱ्यांमार्फत करतात. यामुळें रशियांत राज्यव्यवस्था कशीहि असली तरी जनतेला विचारस्वातंत्र्य पूर्णपणें या वृत्तपत्रांमुळें लाभत असतें. या पत्रांना गांवोगांव पाठविण्यासाठीं स्वतंत्र आवृत्त्या काढाव्या लागत नाहींत. प्रांतांप्रांतांतून वृत्तपत्रें घेऊन जाणारीं विमानें पहाटें मॉस्कोच्या तळावरून

रशियांत जाण्याची हौस परदेश पाहूं इच्छिणाऱ्या लोकांना फार असते, पण पांच वर्षांपूर्वीं तरी रशियांत परराष्ट्रीय मंडळींनीं फारसें यावें असें रशियन राज्यकर्त्यांना वाटत नसे. पण भारताचे व रशियाचे संबंध अलिकडे सुधारल्यापासून भारताशीं आपली मैत्री असावी, निदान नुकतेंच स्वतंत्र झालेलें हें राष्ट्र आपला मित्र व्हावा, चीनप्रमाणें त्याला आपल्याकडे ओढता आलें तर पाहावें असा हेतु स्टालिनच्या राजवटींत तरी रशियन राज्यकर्त्यांच्या मनांत होता व त्या दृष्टीनें भारतीय कम्युनिस्ट मंडळींच्या भेटीसाटीं रशियन कम्युनिस्ट येत. येथील पुढाऱ्यांना तेथें भरपूर मान मिळत असे, पण ही परिस्थिति क्रुश्चेव्ह व बुल्गानिन यांचे भारत-भेटीनंतर बरीच पालटली, भारताची राजकीय दोस्तीच नव्हे तर आपले मित्रांच्या गटांत भारत आला तर त्याला येईल तेवढा ओढून घ्यावा, त्याला तंत्रज्ञाचा पुरवठा करून मदत करावी अशा तऱ्हेचें धोरण आज रशियन राज्यकर्त्यांचें आहे व त्याचा फायदा जेवढा घेतां येईल तेवढा घेणें आवश्यक आहे, असें तेथें जाऊन आलेल्या मंडळींना तरी निश्चित वाटतें. रशियन राजकीय व्यवहार नेहमींच जरी बरेचसे पडद्याआड चालत असले, तरी सर्वसाधारण रशियन माणसाचें औत्सुक्य भारताविषयीं आज बरेंच वाढलें आहे. हिंदी मनुष्य समोर दिसला कीं, रशियन मनुष्य त्याला भेटूं इच्छितो. त्याच्याशीं बोलूं इच्छितो. आपल्या मित्रवर्गापैकीं तो आहे असें रशियन मनुष्य मानतो. ही भावना इतर कोणत्याहि युरोपियन राष्ट्रांत अजूनहि आढळत नाहीं. इटलीसारख्या राष्ट्रांत तुम्हीं रस्त्यावरून फिरूं लागला कीं, तेथील मुली तुमचेकडे औत्सुक्यानें पाहतील. पण तिचें औत्सुक्य व रशियन नागरिकाचें औत्सुक्य यांत फारच फरक आहे. आज रशियन कन्या तुमच्याकडे मैत्रीच्या भावनेनें पाहील, तर इटालियन मुलगी अगर फ्रेंच कन्या तुमचेकडे तुमचे दांत किती सुंदर दिसतात म्हणून तुमच्याकडे पाहील, तर ब्राउनी म्हणून फ्रेंच मुलगी तुमच्याविषयीं

औत्सुक्य दाखवील तर रशियन पुरुष तुमच्याकडे पाहतांना आमच्यासारखेच एक स्वतंत्र राष्ट्रांतील नागरिक म्हणून भारतियांकडे पाहतील. ह्या देशादशांतील दृष्टिकोनांतील फरक मॉस्कोमध्यें फिरतांना प्रामुख्यानें जाणवल्याशिवाय राहात नाहीं. इतर युरोपियन व अमेरिकन देशांतील लोक तुम्हांला मागसलेले समजतील, तर रशियन तुमच्या हिंदी संस्कृतींतहि घेण्यासारखें कांहीं आहे म्हणून तुमची विचारपूस करतील.

रशियांत विशेषतः डॉक्टर, इंजिनियर, यंत्रकार व सहकारी चळवळीच्या अभ्यासूंनीं प्रथम जावें असें माझें मत आहे. विद्यार्थिवर्गांतील गणितशास्त्र अगर विज्ञानशास्त्राच्या विद्यार्थ्यांनीं तेथें अभ्यासासाठीं जावें. पण जाण्यापूर्वी माध्यम म्हणून उपयोग करतां येईल एवढा चांगला रशियन भाषेचा अभ्यास करून तेथें जावें. त्याशिवाय गेल्यास तेथें भाषा शिकण्यासाठीं विनाकारण जास्त वेळ घालवावा लागतो. रशियन विद्यापीठांत राहण्याच्या सोयी वगैरे उत्तम आहेत. पण रशियन भाषा येत नसेल तर व्यर्थ आहे. कारण, तुमच्या इंग्रजी भाषेंतील पांडित्याला रशियांत बिलकुल मान नाहीं. ती भाषा तेथें कोणी जाणत नाहीं आणि जाणणारे जे थोडे-फार आहेत त्यांना आपण ती भाषा जाणतों हें सांगतांना मोठासा अभिमान वाटत नाहीं. रशियन भाषा जाणणारांनींच या देशांत कोणतीहि गोष्ट शिकण्यासाठीं जावें. पण तुम्हांला रशियन भाषा येत नाहीं म्हणून तुमची हेटाळणी अगर चेष्टा करण्याची संवय रशियन नागरिकांना नाहीं. हॉटेलमधील परिचारिकेपासून तों सर्वसाधारण दुकानांतील अगर शेतांतील नोकरवर्गापर्यंत सर्वजण अभिनयांनीं तुमचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करतील. याच्यामागें भारतीय नागरिकांना जवळ करावें हाच प्रमुख हेतु असतो. जें आपल्या राज्यकर्त्यांना आवडतें तें करणें रशियन नागरिक आपलें कर्तव्य समजतो. भारतीय नागरिक रशियांत कोठेंहि गेले तरी त्यांच्या मार्गांत अडचणी येण्याऐवजीं कोणताहि रशियन त्याला लागेल ती मदत करील.

रशियास जाण्याची उत्तम वेळ म्हणजे ऑगस्टपासून ऑक्टोबरपर्यंतचा काल होय. ज्यांना युरोपियन थंडीची संवय असेल त्यांनीं हिंवाळ्यांतहि जावयास हरकत नाहीं. पण सर्वसाधारण भारतीय माणसाला ऑगस्ट-

सप्टेम्बर-ऑक्टोबरची हवा जास्त सोयीची वाटेल. कमी वेळांत जावयाचें असेल तर विमानाचा प्रवास फारच सोयीचा वाटतो. भारतांतील एअर इंडिया इंटरनॅशनलचीं विमानें १२ तासांत रशियांत जातात व रशियाची एअर फ्लोट विमानें ७ तासांत भारतांत येतात. या विमानांचा वेग ताशीं ५०० मैलांपर्यंत आहे तर एअर इंडियाची सुपरकॉन्स्टिलेशन विमानें ताशीं २५० मैलांच्या वेगानें जातात. सुखसोयी व मजेशीर प्रवास या दृष्टीनें थोडा जास्त वेळ लागला तरी एअर इंडिया इंटरनॅशनलच्या विमानांतून प्रवास आल्हाददायक होतो. युरोपच्या प्रवासास जशी येथें जाण्याची बोटीनें व विमानानें अशी दुहेरी सोय आढळते, तशी सोय रशियांत नाहीं. नाहीं म्हणजे, ही सोय स्वस्त पडण्याऐवजीं आजच्या विमान प्रवासाइतकीच आर्थिकदृष्ट्या खर्चाची होईल. पूर्वीं युरोपांत प्रागपर्यन्त आगगाडीनें प्रवास करून बरेच लोक मॉस्कोला येत, पण आतां पाकिस्तान व अफगाणिस्तान मधून मॉस्कोला येण्याचा राजमार्ग उपलब्ध झाल्यामुळें रशियांत जाणाऱ्या हिंदी नागरिकांची संख्या वाढणार आहे, हें निश्चित होय. व त्याचा परिणाम या दोन्हीं देशांतील स्नेहसंबंध वाढण्यांत विशेष होणार आहे.

रशियांत देश पाहण्यासाठीं व तेथील माहिती मिळविण्यासाठीं जाणारानें विमानखर्चासाठीं ३००० रुपये—यांत २७०० रुपये भारत-रशियांतील विमानवाहतुकीस येण्याजाण्यासाठीं पडतात. रशियांत फिरण्यासाठीं येणारा खर्च आपल्याकडील मैलाला पडणाऱ्या दरापेक्षां फारसा महाग नाहीं. पण हॉटेलचा खर्च मात्र आपल्यापेक्षां जास्त येतो. सर्वसाधारणपणें चांगल्या हॉटेलांत उतरल्यास व दिवसांतील इतर खर्च जमेस धरतां ३० ते ४० रुपये दिवसाला, याप्रमाणें पैशाची तयारी करावयास हरकत नाहीं. साधारणपणें पेशानुसार रशिया आवडीच्या विषयाच्या अभ्यासासाठीं पाहावयाचा तर २ ते ३ हजारांची तरतूद आणखी करावी व दीड ते दोन महिन्यांचा काळ तेथें घालविण्याची तयारी असावी. वैद्यकीय पेशाच्या महिलांनीं तेथें अवश्य जावें, कारण रशियांत या पेशांत ७० टक्के महिला काम करीत असून त्यांनीं या शास्त्रांत फारच मोठी प्रगति केलेली आहे. सर्वसाधारण नागरिकाला मोफत औषधोपचार व इतर सर्व आधुनिक सुखसोयी देणारा हा देश किती पद्धतशीरपणें हें कार्य करतो हें पाहण्यासारखें

आहे. तसेंच स्थापत्यशास्त्रांतील रशियाची प्रगति वाखाणण्यासारखी आहे. अगदीं अवश्य तेवढी शोभिवंत घरें कशीं बांधावीं हें रशियनांपासून आपण शिकलें पाहिजे. 'आमचा कोणताहि मनुष्य रस्त्यावर राहात नाहीं. लहानमोठी सोयी-गैरसोयीची का होईना पण आवश्यक ती राहण्याची जागा मिळूं शकते' ही गोष्ट रशियन राज्यकर्ते मोठ्या अभिमानानें सांगतात व त्यांची घरबांधणी त्यांच्या उद्योगधंद्याप्रमाणें सारखी वाढती आहे. आज रशियांत राहावयास जावयाचें कोणीहि ठरविलें तर तेथें उतरल्याबरोबर तुमची राहाण्याची सोय करण्यांत आलेली असते. जागा कोणालाच शोधावी लागत नाहीं, कारण तेथें भाड्याची घासाघीस नसते अगर कोणत्याहि घरमालकाला पैसे मिळवावयाचे नसतात. कारण घरमालक कोणी नसतोच. साधारणपणें दोन ते तीन खोल्यांच्या घरांत बहुतेक कुटुंबें राहतात. नागरिकांना स्वतंत्र स्वयंपाकघर देण्याची तेथें पद्धति नाहीं. आपला स्वयंपाक इमारतीच्या सार्वजनिक स्वयंपाकघरांत शिजवून त्यांना आणावा लागतो व ती पद्धति एक मान्यता पावलेली पद्धति आहे. रशियन गृहिणी तेथून आपलीं शिजवलेल्या अन्नाचीं भांडीं घेऊन येतें. फार तर दूध वगैर गरम करण्यापुरती एक गॅसची शेगडी तिच्या घरांत असते. हिंदी अगर परराष्ट्रीय नागरिकांना राहावयास ज्या जागा दिल्या जातात तेथें मात्र स्वतंत्र स्वयंपाकघरांची सोय असते व त्यांत सर्व प्रकारच्या आधुनिक सोयी परिपूर्ण असतात. रशियांत शिक्षणाच्या खालोखाल घरबांधणीला महत्त्व आहे. शक्यतों लवकर घरें बांधण्यांत रशियन कारागीर फार कुशल आहेत. यंत्रावर काम करणाऱ्या हिंदी मेकॅनिकल इंजिनियरांच्या तुकड्या अलिकडे रशियांत बऱ्याच जात आहेत. त्यांनीं नुसती यंत्राची पाहाणी करून येण्यापेक्षां रशियन कारखानदार-( बहुतेक इंजिनियरच रशियन कारखान्यांत मुख्य असतो. ) आपल्या कामगारांशीं कसा वागतो, काळे कपडे घालून यंत्रालगत त्याला किती काम करावें लागतें याची पाहणी करून अवश्य यावें म्हणजे कारखाना यशस्वीपणें चालविण्याच्या दृष्टीनें आवश्यक असलेले गुण त्यांच्या अंगीं येऊं शकतील.

याशिवाय प्रदेश पाहावयास निघालेल्यांना रशिया हा देश इतर देशांइतकाच पाहण्यासारखा आहे. त्यांनीं मॉस्को, लेनिनग्राड, कीव्ह, गॉरकी,

स्टालिनग्राड एवढीं मोठीं शहरें तरी पाहिल्याशिवाय राहूं नये, रशियांतील पाहण्यासारखीं शहरें रशियाच्या पश्चिमेकडील एकचतुर्थांश भागांतच सामावलेलीं आहेत. या भागांत वस्ती दाट असून सर्व रशियन प्रगति व सुधारणा यांत दिसतात. एकत्रित झालेल्या कारखानदारीं व सामुदायिक शेतीची प्रसिद्ध शहरें जर पाहावयाची असतील तर पूर्वेकडील कांहीं कारखानदारीच्या शहारांना अवश्य भेट द्यावी. युरोपियन हॉटेलांतील सर्व सुखसोयी रशियांतहि मिळूं शकतील असें नाहीं. पाश्चिमात्यांचे कांटेतोल रीतिरिवाज येथें पाळले जातीलच असें नाहीं. रशियन मनुष्य कपड्या-विषयींहि मोठा कांटेतोल नसतो. कामगारांत बसून व कोणतेहि भेदाभेद न पाळतां नाटक-सिनेमाचे प्रयोग तेथें पाहावे लागतील. तेथें उच्च-नीच भेदाभेद सांपडणार नाहीं. हे भेदाभेद न पाळतां राहण्याची जर तयारी असेल तरच भारतांतील श्रीमंतांनीं रशियांत जावें. तेथें कोणतीहि अडचण आल्यास, आपल्या वकिलातीचा सल्ला घ्यावा. तो जास्त फायदेशीर असतो. कारण, रशियांत अजाणतेपणें निर्माण होणाऱ्या बऱ्याच अडचणींना तोंड देण्याची पाळी कधीं कधीं येते. तुमच्या मागें मागें येणाऱ्या पोलिसाशीं त्यांनीं विचारल्याशिवाय कांहीं बोलूं नये.

रशियांत परदेशीय मंडळींना सोयीचीं वाटणारीं हॉटेलें म्हणजे पेकिंग, मॉस्को, युक्रेन हीं होत. या हॉटेलच्या पद्धति इतर देशांतील हॉटेलपेक्षां निराळ्या आहेत. दर दिवशीं प्रत्येक दिवसाचें बिल हॉटेलमधील प्रत्येक मजल्यावरील गव्हर्नेसजवळ भरावें लागतें. उधारी व उसनवारी नाहीं, अगर एकदम बिल घेण्याचीहि पद्धत नाहीं. कपडे धुण्यासाठीं येणारी वेट्रेस सायंकाळीं तुमचे कपडे यंत्रावर धुऊन व इस्त्री करून तुम्हांला देईल, पण त्याचे पैसे या हॉटेलच्या बिलांत न येतां स्वतंत्रपणें द्यावें लागतील.

सर्वसाधारणपणें हिंदी नाणें रशियांतील कोणत्याहि बँकेमध्यें अगर हॉटेलमधील सर्व्हिस ब्यूरोमध्यें बदलून मिळतें. आपल्याकडील १०० रुपयाला परकीय पाहुण्यांना (सरकारी) २०७ रुबल्स तेथें मिळतात. पण हा खास पाहुण्यांचा दर असतो. बाजारांत रुबल व रुपयाचा दर सारखा असतो. या वेळीं आपण मोडलेल्या पैशाची पावती घेण्यास विसरूं नये. कारण या पावतीवर पुन्हां हिंदी पैसे देशांतून परततांना घेतां येतात.

रशियांत रस्त्यांत कोठेंहि बसून दुकानांत फराळ करूं अगर कॉफी घेऊं अशी सोय नाहीं. सर्वसाधारणपणें मोठमोठ्या हॉटेलांत ही सोय असते. विशेषतः पूर्ण शाकाहारी जेवण घेणाराचे रशियांत हाल होण्याचा संभव अधिक असतो. व्हेजिटेबल सालड, फळें, टामाटो सालड, काकडी हे त्यांना मिळूं शकते. उत्तम दही, बटाटे, बटाट्याचे तळलेले काप अगर सॅन्डविच, भाताचे खिमट याला पॉरिज म्हणतात. कॉलीफ्लावर व ब्रेड मिसळून केलेला एक पदार्थ. इतकेच पदार्थ रशियन हॉटेलांतून शाकाहारींना मिळूं शकतात. एवढ्यावर ज्याचें भागत असेल त्यांनीं रशियांत शाकाहारी आहार घ्यावा. याशिवाय सोडा, लेमन व कॉफी मिळते. पण ती मागावी लागते. आईस्क्रिमहि मिळूं शकतें.

मांसाहारी मंडळींना, गोमांस खाण्याची संवय नसेल तर कोंबडी व अंडीं यांवरच आपली भूक बऱ्याच वेळां भागवावी लागते. भात येतो पण त्यावर घ्यावयास करी अगर आमटीसारखा पदार्थ क्वचितच मिळतो. मटन करी मला रशियांत मागून मिळाली नाहीं. मटणाचे फारच थोडे प्रकार मला तेथें खावयास मिळाले. मासळी अगर मासे भरपूर असतात पण ते नुसते उकडून तुमचेपुढे ठेविलेले जातात. त्याला मसाले घालण्याची पद्धत नाहीं. चहा रोज नियमानें मिळत नाहीं. बेड टीची पद्धति रशियांत नाहीं. आम्हां खास पाहुण्यांसाठीं ती सोय करण्यांत आली होती, पण त्यांत दुधाऐवजीं लिंबाची फोड टाकून तो चहा आम्हांला दिला जात असे. रशियांत मात्र आपणाला हवें तें मागितलें कीं तयार करून देण्यास हॉटेलें तयार असतात. पण त्यांना तें नीट समजावून देणें कठीण पडते.

ज्यांना मद्यपानाची आवड असेल त्यांना रशियात व्हिस्की मिळणार नाहीं. व्होडका हें रशियाचें राष्ट्रीय पेय, पण मद्यपानाची संवय नसणारांनीं तें घेऊं नये, ती अंगावर येण्याचा फार संभव असतो. ब्रँडी व बियर रशियांत चांगली मिळते व थंडीपासून संरक्षण व्हावें म्हणून हेंच पेय बरेंचसें परराष्ट्रीय, रशियांत घेतात. सोडा व लेमन अगर निरनिराळ्या फळांचे रस तुम्हांला जेवण्याच्या टेबलावर जेवणाच्या दरांत नेहमींच मिळतात.

रशियांत सकाळची न्याहारी, दुपारचें जेवण व रात्रीचें जेवण एवढेंच

हॉटेलांत मिळूं शकतें. दोन्हीं वेळचा चहा तेथें नाहीं. कॉफी मागतांना दूध घालून कॉफी आणा असें सांगावयास कोणीहि कधीं विसरूं नये.

रशियांत सर्वांनाच पडणारी मोठी अडचण म्हणजे भाषेची होय. यासाठीं दुभाष्या मिळाल्याशिवाय कोठेंहि बाहेर पडूं नये. या दृष्टीनें "इंटुरिस्ट एजन्सी" चांगली मदत करूं शकते. प्रत्येक शब्द नीट लक्षांत ठेवून उच्चारणें फारसें कठीण जात नाहीं, व थोड्याच दिवसांत आवश्यक ते शब्द येऊं शकतात. रशियांत जर कोणची गोष्ट मोठी लक्षांत ठेवावयाची असेल तर सर्वसाधारण माणसांनीं राजकारणावर विशेषतः रशियन राजकारणासंबंधीं न बोलणें चांगलें. यावर परराष्ट्रीयांशीं मोकळेपणानें बोलावयास रशियन नागरिक कधींहि तयार नसतात. उलट, तुम्ही यासंबंधीं कांहीं प्रश्न विचारलेत तर तुमचा ते संशय घेतील. त्यांना याबाबत आग्रह करणें चांगलें नाहीं. त्यांना पसंत न पडणारा एक विषय म्हणून तो सोडून द्यावा.

मॉस्को शहरांतील क्रेमलिन युनिव्हर्सिटी, लेनिनग्राड युनिव्हर्सिटी, स्टालिन व लेनिनचा देह जपून ठेवलेला रेड स्क्वेअरमधील इमारत हें पाहिल्याशिवाय मात्र राहूं नये. आपले देशाविषयीं जेवढें येथें कमी बोलाल तेवढें चांगलें. सर्वसाधारण युरोपच्या प्रवासास लागणारे नेहमींचे गरम कपडे रशियांतील प्रवासास पुरेसे असतात. जातांना ग्रेट कोट घ्यावयास मात्र विसरूं नये. तेथें सर्वच महिन्यांत थंडी ही असतेच.

मराठी ... ग्रं. क्र. २०६०६९ ...

# कांहीं रशियन शब्द-प्रयोग

रशियांत प्रवासासाठीं जाणारांना खालील शब्द व सर्वसाधारण भाषा-प्रयोग येणें आवश्यक आहे. याशिवाय रशियन भाषेचा अधिक परिचय व्हावा असें वाटत असेल तर रशियन भाषाप्रयोग व त्याचे इंग्रजी अर्थ देणारें पुस्तक भारतांतील बहुतेक मोठ्या शहरांतील दुकानांत मिळूं शकतें.

रशियांत इंग्रजी जाणणाऱ्या प्रवाशाला रशियन भाषेंतील खालील शब्द-प्रयोग माहीत असणें आवश्यक आहे. पुढील यादींत इंग्रजी शब्द-प्रयोगाचें रशियन रूपांतर इंग्रजी उच्चारानुसार करतां यावें म्हणून रशियन शब्द इंग्रजी स्पेलिंगप्रमाणें दिले आहेत. सर्वसाधारण इंग्रजीच्या उच्चारपद्धतीनुसार ते उच्चारले तर फारसें कठीण जाणार नाहीं. 'टी' चा उच्चार मात्र ट ऐवजीं फ्रेंच पद्धतिनुसार 'त' करावयास विसरूं नये.

( शब्दसंग्रह पुढील पानांवर पाहावा. )

| इंग्रजी | | रशियन |
|---|---|---|
| Do you serve breakfast in the room? | ... | Podayo' tsya lee za' vtrak v no' mycrye |
| Please send my suit to the cleaners. | ... | Poshlee'tye pazha 'lsta moy kostyoom v cheestkoo |
| I must have another suit pressed. | ... | Mnye nyeobkhodeemo eemyet' droogoy kostyoom viglazhennim |
| Can you send something to eat to my room? | ... | Mozhetye lee vi poslat chto-neebood poyest ' v moy nomyer |
| Let me see the menu? | ... | Pokazheetye mnye menyoo |
| Send up some cold meat, bread, butter and an iced glass of beer. | ... | Poshleetye kholodnovo mya'sa, khle'ba, masla ee staka'n khalodnovo pceva |
| I am tired after the voyage. | ... | Ya oosta'l doro'gee |
| Can you recommend me a young man speaking good English to act as a guide? | ... | Mo' zyete lee vi porekomyendova't mnye molodo' vo chelovye'ka govoryashchevo po angleeskee vka' chestvye gee'da. |
| Here is your bill | ... | Vot vash schyo't |

| | |
|---|---|
| Will you take a traveller's cheque ? | ... Pri-nee-ma'ye-tye lee poo-tye-she'st- |
| Thank you. | ... Spaseebo |
| Farewell | ... Schastlee' vavo Pootee' |
| We hope that our visit to the Soviet Union will prove to be very fruitful. | ... Mi nadye'yemsya shto na'sh posyeshch-ye'nye Sovye'tskovo Soyoo a boo'dyet vyesma'plodotvo'rno |
| Coins | |
| One kopeck | ... Adna'kopye'yka |
| Two, three kopecks | ... Dvye, tree kopye'ykee |
| One rouble | ... Adee'n roo'bl' |
| Two, three roubles. | ... Dva, tree rooblya' |
| One hundred roubles | ... Sto rooblye'y |
| Please change a hundred rouble note | ... Pazha'lsta, razmyenya'yte storooblyo'viy beelye't |
| What does it cost ? | ... Sko'lko e'to sto'eet |
| I would like a glass of beer | ... Ya khate'l bi stakan piva |

| इंग्रजी | | रशियन |
|---|---|---|
| Bottle of wine, lemonade, mineral water | ... | Booti'lka veena', lyemona'da, meenera'lnoy vodi' |
| At what time is dinner served ? | ... | V kakee'ye chasi' podayotsya obye'd |
| Bring me the menu, please. | ... | Preenyesee'tye mnye myenyoo, pazha'lsta |
| Bill, please | ... | Schyot, pazha'lsta |
| Some more bread, please | ... | Yeshcho'khlye'ba, pazha'lsta |
| Smoked sausage, liver sausage | ... | Kopehyo'naya kolbasa', leevernaya kolbasa |
| Ham, ham and egg | ... | Vyetcheena, vyetcheena's yaytsom |
| Caviare—fresh, granular | ... | Eekra-svyezhaya, zyerneestaya |
| Fried eggs, scrambled eggs | ... | Yaee'chnitsa glazoo'nya, yaee' chnitsa boltoo'nya |
| Soft boiled egg | ... | Yaytso'v smya'tkoo |
| Poached egg | ... | Yaytso'v myesho'chkye |
| Hard boiled egg | ... | Yaytso'vkrootoo'yoo |
| Shashlick 'Caucasian dish | ... | Shashli'k |
| Dinner | ... | Obye'd |

| | |
|---|---|
| Tea | ... Chay |
| Supper | ... Oo'zhin |
| Lunch, midday meal | ... Vtoro'y za'vtrak |
| Breakfast | ... Za'vtrak |
| Vegetables | ... O'voshchi |
| Lettuce | ... Sala't |
| Tomatoes | ... toma'ti |
| Beetroot | ... svyo'kla |
| Radish | ... ryedsee'sk |
| Cucumber | ... Ogoorye'ts |
| Sweets, confectionery | ... knofe'ti |
| Cakes, pastry | . Peero'zhniye |
| Sandwich | ... Booterbro'd |
| Cabbage soup, beetroot soup | ... Shchee, borshch |
| Noddle soup | ... Lapsha' |
| Chicken broth | ... Kooree'niy soop |
| Chicken cutlets | ... Kooree'niye kotlye'ti |

| इंग्रजी | रशियन |
|---|---|
| Roast chicken, duck, goose, turkey. | ... Zha'renaya koo'ritsa, ootka, goos', indyeyeka |
| Mutton, veal | ... Bara'neena, tyelya'teena |
| Roast beef | ... Rost-beef |
| Fish pie | ... Peero'g s ri'boy |
| Cabbage pie | ... Peero'g s kapoo'stoy |
| Roast meat | ... Zharko'ye |
| Mashed potatoes | ... Karto'fyelnoye pyoorye' |
| Cauliflower | ... Tsvetna'ya kapoo'sta |
| Peas, carrots, beans | ... goro'shyek, morko'v, faso'l' |
| Fresh fruit | ... Svye'zhiye froo'ktt |
| Stewed fruit, tinned fruit. | ... Kompo't, konservee'rovanniye froo'kti |
| Orange | ... Apyelsee'n |
| Butter, cheese, milk | ... Ma'slo, sir, malako' |
| Strong, weak tea | ... Krye'pkee, sla'bíy chay |
| Coffee, cocoa | ... Kofye, kaka'o |
| Chocolate | ... Shokola'd |

| | |
|---|---|
| Sugar | ... Sa'khar |
| Jam, honey | ... Varye'nye, myo'd |
| Ice Cream | ... Moro'zhenoye |
| Tips | ... Chayevi'ye |
| Roll, bun | ... Kroo'glaya boo'lochka, sdo'bnaya boo' [illegible] |
| What would you like? | ... Shto vi zhela'yetye |
| I would like some soup first | ... Snacha'la preenyesee'tye mnyo soop |
| Afterwards I will have some meat with vegetables and potatoes. | ... Poto'm ya khochoo'mya'so ovoshcha'm [illegible] |
| I prefer fish | ... Ya pryedpochita'yoo ri'boo |
| Feefsteak | ... Beefsht'ks |
| Lamb, pork | ... Bara'neena, sveenee'na |
| Bacon and egg | ... Be'kon s yaytso'm |
| Salt, pepper, mustard. | ... Sol', pye'ryets, gorchee'tsa |
| Different kinds of sausage | ... Ra'znovo ro'da kolbasi' |
| Rye bread, brown bread | ... Cho' rniy khlye'b |
| White bread | ... Bye'liy khlye'b |
| Wholemeal bread | ... Poklye'vanniy khlye'b |

| इंग्रजी | | रशियन |
|---|---|---|
| Slice of bread | ... | Lo'mtik khlye'ba |
| Cold meat | ... | Khalo'dnoye mya'so |
| Red, white wine | ... | Krasnoye, byeloy veeno |
| Sweet wine | ... | Sla'dkoye veeno' |
| A glass of wine | ... | Staka'n veena' |
| A bottle of wine | ... | Boot'lka veena' |
| Brandy | ... | Konyak |
| Champagne | ... | Shampa'nskoye |
| Apple juice | ... | Ya'blochniy sok |
| Something to drink | ... | Ko-ye-shto vi-peet' |
| Excuse me, can you tell me the way to... ? | ... | Eezveenya'yoos, nye me'zhetye lee vi mnye ookaza't doro'gook...? |
| How far is it from here to...? | ... | Kak dalyeko'otsyoo'da nakho'deetsya ... |
| I am lost | ... | Ya potyerya'l doro'goo |
| What is the news | ... | [illegible] |
| May I have London daily papers ? | ... | Mogo'lee ya eeme't Londonskeeye yezhednye'vniya gazye'ti |

| | |
|---|---|
| What is the price? | ... Kaka'ya eem tzena' |
| Black and red ink | ... Tch'rniye ee krasniye tchernila |
| Letter Paper | ... Pachto'vaya boomaga |
| Envelopes | ... Konvyerti |
| Do you sell picture postcards? | ... Prodayotye lce vi otkritkee s veedamy |
| May I have a Moscow Guide Book? | ... Mogoo'lee ya eemyet'pootyevodcetel po Moskvye' |
| I am here as a tourist | ... Ya preey'khal syooda'kak tooreest |
| We want to look round the town | ... Mi khatee'm osmotry't go'rod |
| Where can I get something to eat, drink? | ... Gdye mozhno zakoosee't ee shto-neebood vipeet |
| What is on tonight at the...theatre? | ... Shto syevodnya dayoo't v... tyea'trye |
| Department Stores | ... Ooniverma'g |
| Confectioner's | ... Kondeeterskaya |
| Grocery and Provision shop. | ... Gastronomeechescee magazee'n |
| Pharmacy, Chemist's | ... Aptyeka |
| Cafe | ... Kafe' |
| Snack Bar | ... Zakoo' sochnaya |
| Books, Second-hand Bookdealer | ... Kneegee, Bookeenee'st |

| इंग्रजी | रशियन |
| --- | --- |
| Gramophone Records | ... Gramplastee'nki |
| Gifts | ... Padarkee |
| Toys | ... Eegrooshkee |
| Clothes | ... Odyezhda |
| Stamps | ... Markee |
| Camera | ... Fotoapara't |
| I want some films for my camera | ... Mnye tryebooyootsya plyonkee dlya moyevo'fntoapara'ta |
| My name is... | ... Mayo'eemya... |
| I live in Hotel... | ... Ya zhivoo' v gostee'neetsye... |
| I would like to see the puppet show. | ... Mnye khotyelos bi posmotryet' predstavlyenye maryonye maryonye'tok |
| Please send for the doctor | ... Poshlee'tzye za do'ktorom ( vrachom ) |
| He has a temperature | ... Oo nyevo'povi'shennaya tyempyeratoora |
| I am hungry, thirsty, tired. | ... Ya galodna, ya khochoo pee't, ya oostala |
| I have got a headache. | ... Oo myenya baleet galava |
| Take two aspirin tablets | ... Preemee'tye dvye tablye'tkee aspeereena |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 27621 वि:
नों. दि:

| | |
|---|---|
| Please | ... Pazha'lsta |
| I do not speak Russian | ... Ya nye gavaryoo'pa-roo'sskee |
| All the best | ... Vsyevo'kharo'shevo |
| Could you help me ? | ... Mo'zhetye lee vi mnye pamo'ch |
| What is the Russian for...? | ... Kak po-roo'sskee...? |
| I am so glad to see you | ... Ya tak rad vas vee'dyet' |
| Interpreter | ... Pyeryevo'dchik |
| I am glad to see you | ... Ya rad vas vee'dyet' |
| We wish to visit theatres, cinemas, museums. | Mi khatee'm posyetee't tyea'tri, ... Keeno', moozye'i |
| What would you advise me to buy as souvenirs ? | Shto vi pasavye'tooyetye mnye ... koopi't kak soovyenee'ri |
| Good | ... Kharo'shee |
| Indian | ... Indoo's |
| Moscow time | ... Mosko'vskoye vrye'mya |
| Today | ... Syevo'dnya |
| Tomorrow | ... Zaftra |
| Yesterday | ... Vchyera |

| इंग्रजी | रशियन |
|---|---|
| I want to take two aspirin tablets. | ... Ya khochoo preenya't dvye tablye'tkee aspeeree'na |
| Porter | ... Nosee'lshchik |
| Here is my luggage | ... Vot moy baga'zh |
| Inquiry Office | ... Spra'vochnoye byooro |
| Travelling bureau "In-tourist" | Byooro'pooteshe'stvee, ... Intourist' |
| Tell me, where is the Telegraph Office? | ... Skazhee'tye gdye tyelyegraf |

अनुक्रम ... दि ...
क्रमांक ... नौ. दि. ...

REFBK 0010788

REFBK-0010788

◆ ◆ ◆

## आमचीं कांहीं आगामी प्रकाशनें

* **बालगंधर्व**—व्यक्ति आणि कला

  — व. शां. देसाई

* **मी युरोपांत काय पाहिलें ?**

  — म. म. द. वा. पोतदार

* **बालचंद्र**

  — डॉ. चिं. श्री. कर्वे

◆ ◆ ◆